




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार १४ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







# इराणच्या पाणबुडी तळावर अमेरिकेचा भीषण हल्ला



## अमेरिकेकडून सागरी ड्रोनचा वापर

**तेल अवीव/तेहरान/वॉशिंग्टन**-अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा चिघळला असून, दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ले करण्यास सुरु वात केली आहे. अमेरिकी सैन्याने इराणच्या पाणबुडी आणि जहाज देखभाल केंद्रावर हल्ला केला आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने सोमवारी याबाबत माहिती दिली आहे. ड्रोनच्या माध्यमातून अमेरिकडून या केंद्रावर अचूक हल्ला करण्यात आला, असे सेंट्रल कमांडने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

**पाणबुडी आणि जहाज देखभाल केंद्रावर हल्ला-** काल, ड्रोनचा वापर करू न, अमेरिकेच्या सुरक्षा दलांनी इराणमधील पाणबुडी आणि जहाज देखभाल केंद्रावर हल्ला केला, असे त्या पोस्टमध्ये म्हटले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात संघर्ष चिघळला असताना हा हल्ला झाला आहे. अमेरिकेने इराणच्या अनेक ठिकाणांना लक्ष्य केले. प्रत्युत्तरदाखल इराणने देखील मध्य पूर्वेतील कतार, बहारीन, जॉर्डन आणि ओमान येथील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ले केले. अमेरिकेच्या मानवरहित सागरी जहाजांनी बंदर अब्बास बंदरावर हा हल्ला केला. अमेरिकेकडून पहिल्यांदाच सागरी ड्रोनचा वापर करण्यात आला. अमेरिकेने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, अमेरिकेच्या लष्कराने सोमवारी हवाई संरक्षण प्रणाली, रडार, क्षेपणास्त्र आणि ड्रोन, बोटींसह विविध ठिकाणांवर हल्ले केले. डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर बॉम्ब हल्ला करण्याची धमकी दिली होती. यानंतर अमेरिकी सुरक्षा दलाने इराणमध्ये विविध ठिकाणी हल्ले केले.




### भारतीय जहाज 'GFS गॅलेक्सी'वर हल्ला

'GFS गॅलेक्सी' जहाजावरील हल्ल्यात ११ भारतीय होते. १० जणांना सुरक्षित वाचवण्यात आले, तर एक भारतीय अजूनही बेपत्ता आहे. भारताने या हल्ल्याचा निषेध करत, नागरिक जहाजांवरील हल्ले तात्काळ थांबवण्याचे आवाहन केले. अमेरिका म्हणाला- इराणच्या ३०० ठिकाणांवर हल्ला केला: अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनुसार, अमेरिकेने या आठवड्यात ३ दिवसांत इराणच्या ३०० हून अधिक लष्करी ठिकाणांना लक्ष्य केले आहे. लेबनॉनवर इस्त्रायलने पुन्हा हल्ले केले: इस्त्रायली सैन्याने दक्षिण लेबनॉनमधील नबातियेह जिल्ह्यातील कफर तेबनित शहरावर गोळीबार केला. सध्या या हल्ल्यांमध्ये कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही.

## होर्मुझमध्ये सुरक्षा पुरवू, पण पैसेही घेवू

## जहाजांवरील मालावर 20% कर आकारला जाईल-अमेरिका



**तेल अवीव/तेहरान/वॉशिंग्टन-**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, होर्मुझची सामुद्रधुनी खुली राहील आणि तिच्या सुरक्षेची जबाबदारी अमेरिकेची असेल. स्वतःला 'होर्मुझ सामुद्रधुनीचा संरक्षक' संबोधत त्यांनी सांगितले की, या कामाचा खर्च भागवण्यासाठी सामुद्रधुनीतून जाणा-या सर्व मालावर २०% कर आकारला जाईल. ट्रम्प यांनी असेही सांगितले की, इराणी जहाजे आणि त्यांच्या ग्राहकांवरील बंदी कायम राहील, परंतु इतर सर्व देशांची जहाजे कोणत्याही अडथळ्याशिवाय होर्मुझमधून जाउ शकतील. त्यांनी सांगितले की, या नवीन व्यवस्थेवरील काम तात्काळ सुरू केले जाईल. ट्रम्प यांच्या घोषणेचा इराणने तीव्र निषेध केला. इराणी लष्कराच्या खातम अल-अंबिया मुख्यालयाच्या प्रवक्त्याने सांगितले की, होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अमेरिकेचा कोणताही हस्तक्षेप स्वीकारार्ह नाही. त्यांनी सांगितले की, या सागरी मार्गाचे संरक्षण आणि व्यवस्थापन करण्याचा अधिकार इराणला आहे आणि त्याचे संरक्षण करण्यासाठी इराण प्रत्येक पाउल उचलेल.

# नफ्याच्या हव्यासापोटी दुस-याचा जीव जाणार नाही याची काळजी घ्या

## तुकाराम मुंढेंचा भेसळखोरांना इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईसह राज्यभरात तुकाराम मुंढे हे चर्चेत आले आहेत. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे त्यांनी भेसळयुक्त पदार्थ, त्याचे उत्पादक आणि विक्रेते यांच्या विरोधात घेतलेली धडक कारवाईची भूमिका. तुकाराम मुंढे हे [illegible]चे आयुक्त म्हणून काम करत आहेत. त्यांच्या धडक कारवाईचा धसका अनेकांनी घेतला आहे. कुठल्याही परिस्थितीत लोकांनी भेसळयुक्तपदार्थ खायला नको ही भूमिका तुकाराम मुंढेंनी घेतली आहे. इतकंच नाही तर लोकांनीही त्यांची जबाबदारी ओळखून वागलं पाहिजे असंही ते म्हणाले आहेत. शिवाय भेसळखोरांनाही त्यांनी विनंतीवजा सूचना केली आहे.

**समाजाकडे कुटुंब म्हणून पाहा, तुकाराम मुंढेंचं आवाहन-**[illegible]चा आयुक्तम्हणून काही मिळवायचं आहे तर ते हेच आहे की नागरिकांनी सजग राहून भेसळीच्या विरोधात एक चळवळ उभी केली पाहिजे. चांगले पदार्थ खाण्याची सवय लागली पाहिजे असं मत तुकाराम मुंढे यांनी मांडलं आहे. भेसळयुक्त पदार्थ विक्री रोखायची असेल तर महाराष्ट्रातल्या १३ कोटी लोकांनी ही जबाबदारी घेतली पाहिजे. आम्ही कारवाई करायची आहे ती करु च. समाजाकडे कुटुंब म्हणून बघा, सगळ्या गोष्टी सुरळीत व्हायला वेळ लागणार नाही. आपल्या कुटुंबाकडे जसं आपण जबाबदारीने पाहतो तसं समाजाकडे कुटुंब म्हणून पाहावं असं मला वाटतं अशी अपेक्षा तुकाराम मुंढेंनी व्यक्त केली आहे.


माझं इतकंच म्हणणं आहे [illegible] म्हणजेच फूड बिझनेस ऑपरेटरमध्ये आपण उत्पादक असाल, साठवणूक करणारे असाल, माल वाहतूक करणारे असाल, विक्रेते असाल, डिलर असाल, सेमी डिलर असाल कुणीही असूद्या सगळ्यांना मी हे सांगू इच्छितो की आपण या जनतेमुळे आहोत. तुमचं उत्पादन कुणीतरी ग्राहक विकत घेतो. त्यामुळे तुमचा व्यवसाय चालतो. हा व्यवसाय करताना जी नियमावली घालून दिली आहे, अन्न सुरक्षेबाबतचे जे नियम आहेत, अन्न सुरक्षा, त्याचा दर्जा याबाबतचे जे नियम आहेत त्यात कुठलीही तडजोड करु नका. अन्यथा याचा परिणाम समाजावर तर होणारच आहे, पण तुमच्यावरही एक ग्राहक म्हणून याचा परिणाम होईल. कदाचित तुमच्या भागात तो पदार्थ तुम्ही सगळ्या नियमांनुसार काटेकोर पद्धतीने विकत असाल, उत्पादन करत असाल पण बाकीच्या गोष्टी जेव्हा तुम्ही खाता त्या भेसळयुक्त किंवा दर्जा नसलेल्या या तुम्हालाही मिळू शकतात. शिवाय आम्ही कुठल्याही परिस्थितीत तडजोड करणार नाही. भेसळखोरांना कठोरातली कठोर शिक्षा करणार, कुठल्याही बाबतीत दयामाया दाखवणार नाही. त्यामुळे सावधगिरी बाळगा असं तुकाराम मुंढे म्हणाले.



## ऑटोचालकाच्या खात्यात आले

# 7 अब्ज 59 कोटी


**पाटणा/वृत्तसंस्था :** बिहारमधील गयाजी येथे एका ई-रिक्षा चालकाच्या बँक खात्यात अचानक ७.६० अब्ज रु पयांचा बॅलन्स दिसल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे. पेन्शनची रक्कम काढण्यासाठी गेलेल्या या रिक्षा चालकाला जेव्हा मोबाईलवर बँकेचा मेसेज आला, तेव्हा तो स्वतःही खूप घाबरला. बँकेने ही तांत्रिक चूक असण्याची शक्यता वर्तवली असून सध्या कोणत्याही प्रकारचा व्यवहार न करण्याचा सल्ला दिला आहे. आता या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल.गयाजी शहरातील डेल्हा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बागेश्वरी गल्लीत राहणारे शिव कुमार पटेल यांच्यासोबत ही घटना घडली आहे. शिव कुमार हे ई-रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. ते सामाजिक सुरक्षा पेन्शन योजनेचे लाभार्थी देखील आहेत. शनिवारी ते आपली पेन्शन काढण्यासाठी बागेश्वरी येथील बँक ऑफ इंडियाच्या



ग्राहक सेवा केंद्रात गेले होते. तेथे त्यांनी आधार-आधारित बँकिंग सेवेद्वारे आपल्या खात्यातून ११०० रु पये काढले. ➪(पान २ वर)


## मान्सून 7 दिवसांत पुन्हा जोर धरणार

**नवी दिल्ली :** राजस्थान, गुजरात आणि वायव्य भारतातील काही भागांत गेल्या ३-४ दिवसांत मंदावलेला मान्सून २० जुलैपासून पुन्हा जोर धरण्याची शक्यता आहे. उपग्रहाद्वारे मिळालेल्या छायाचित्रांवरून पूर्व, मध्य आणि ईशान्य भारतावर दाट ढगांचे आच्छादन असल्याचे दिसून येत आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, बांगलादेश आणि ईशान्य भारतावर तयार होत असलेली चक्रीवादळाची प्रणाली (सायक्लोनिक सिस्टीम) आणि वेस्टर्न डिस्टर्बन्स (पश्चिमेकडील विक्षोभ) यांच्या प्रभावामुळे पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढणार आहे. हवामान विभागाने आज उत्तर प्रदेश आणि बिहारसह १८ राज्यांमध्ये पावसासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. दरम्यान, पुढील ६-७ दिवसांत उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, ईशान्येकडील राज्ये आणि पूर्व उत्तर प्रदेशातील अनेक ठिकाणी चांगला ते मुसळधार पाउस पडण्याची शक्यता आहे. उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे अनेक भागांत ➪(पान २ वर)



## मराठी येत नसल्याने ओडिशातील आरोपीला न्यायालयाकडून जामीन

**नागपूर/प्रतिनिधी :** अटकेची कारणे आरोपीला समजणा-या भाषेत लेखी स्वरू पात न देणे हा घटनात्मक हक्कांचा भंग असल्याचे स्पष्ट करत, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ओडिशातील एका आरोपीला गांजाच्या व्यावसायिक प्रमाणातील जप्तीच्या एनडीपीएस प्रकरणात जामीन मंजूर केला. अटकच बेकायदेशीर ठरत असेल तर एनडीपीएस



कायद्यातील कलम ३७ अंतर्गत असलेले कठोर निर्बंध लागू होत नाहीत, ➪(पान २ वर)

## नीट पेपरफुटी : सोनम वांगचूक यांच्या उपोषणाला ठाकरेंचा पाठिंबा

**मुंबई -**नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर सुरू असलेल्या सोनम वांगचूक यांच्या प्राणांतिक उपोषणाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. सोनम वांगचूक यांच्या उपोषणाला १६ दिवस पूर्ण झाल्यानंतर त्यांची प्रकृती खालावल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी सोमवारी मुंबईत पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे म्हणाले की, काही दिवसांपूर्वी आपण सोनम वांगचूक यांच्याशी फोनवरू न संवाद साधला होता. त्यावेळी त्यांना प्राणांतिक उपोषण करू नका, अशी विनंती केली होती. मात्र, सोनम वांगचूक यांनी देशाच्या हितासाठी आपले काहीही झाले तरी चालेल, अशी भूमिका घेतली. मेरा कुछ भी होने दो, देश का भला होना चाहिए, असे त्यांनी सांगितले. अशा विचारांच्या व्यक्तीसमोर आणखी काय बोलणार, असे उद्धव ठाकरे म्हणाले. केंद्र सरकारवर टीका ➪(पान २ वर)



## बेरोजगारीविरुध्द नेपाळमध्ये आंदोलन

**काठमांडू :** नेपाळमध्ये पुन्हा तरु णाईच्या आंदोलनाची ठिणगी पडली आहे. बेरोजगारीविरु द्ध जेन-झी पुन्हा रस्त्यांवर उतरली आहे. गेल्या तीन दिवसांत तीन तरु णांनी स्वतःवर पेट्रोल शिंपडून आत्मदहनाचा प्रयत्न केला. यापैकी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर एक तरु ण गंभीर भाजलेल्या अवस्थेत रु ग्णालयात दाखल आहे. आंदोलनकर्त्यांकडून पंतप्रधान बालेन शाह यांच्या राजीनाम्याची मागणी तीव्र झाली आहे. राजधानी काठमांडूमध्ये तरु णांची निदर्शने सुरू आहेत. यावरू न विरोधी पक्षाने नेपाळी काँग्रेसने सरकारवर तरु णांमध्ये आशा आणि विश्वास निर्माण करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला आहे. जेन-झी नेपाळ संघटनेने पंतप्रधान बालेन शाह यांच्यावर जनविरोधी आणि निरंकुश पद्धतीने शासन चालवल्याचा आरोप केला आहे. संघटनेचे म्हणणे आहे की अर्थसंकल्प आणि धोरणांमध्ये तरु णांचा रोजगार आणि उत्पन्न वाढवण्यासाठी कोणतेही ठोस पाउल उचलले गेले नाही. नेपाळमध्ये अशा घटना सातत्याने घडत आहेत. यावरू न तरु णांची मानसिक स्थिती, ➪(पान २ वर)




# काशी, मथुरा, संभलमध्ये मध्यस्थीला सर्वोच्च न्यायालयाच्या नकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**यूपीमधील तीन मंदिर-मशीद वादांबाबत हिंदू आणि मुस्लिम पक्षांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयाच्या मध्यस्थीचा प्रस्ताव फेटाळला आहे. हे तीन वाद वाराणसीतील ज्ञानवापी मशीद, मथुरेतील श्रीकृष्ण जन्मभूमी-शाही ईदगाह आणि संभलमधील शाही जामा मशिदीशी संबंधित आहेत.

वाराणसीतील ज्ञानवापी मशीद वाद, मथुरेतील श्री कृष्ण जन्मभूमी-शाही ईदगाह जमीन वाद आणि उत्तर प्रदेशातील संभल येथील जामा मशीद वाद या प्रकरणांमधील हिंदू आणि मुस्लिम दोन्ही पक्षांनी सर्वोच्च न्यायालयाच्या प्रस्तावित सहमतीने वाद निवारण प्रक्रियेत सहभागी होण्यास नकार दिला असून त्याऐवजी या विवादास्पद खटल्यांवर त्यांच्या कायदेशीर गुणवत्तेनुसार निर्णय व्हावा, असा पर्याय निवडला आहे. एचटीला असे समजले आहे की, सर्वोच्च न्यायालय प्रशासनाने अलीकडेच तीन मंदिर-मस्जिद वादांमधील सर्व विरोधी पक्षांना पत्र लिहून, सर्वोच्च न्यायालयाच्या सुप्रीम कोर्ट ॲक्शन फॉर मेडिएटेड ॲडज्युडिकेशन अँड डिस्प्युट्स हार्मोनायझेशन अक्रॉस नेशन (समाधान समारोह) २०२६ या देशव्यापी मध्यस्थी उपक्रमांतर्गत सामंजस्यपूर्ण तोडगा काढण्यासाठी आमंत्रित केले आहे, ज्याची सांगता २१ ते २३ ऑगस्ट दरम्यान होणा-या विशेष लोक अदालतीने होईल.

तथापि, हिंदू पक्षकारांचे प्रतिनिधित्व करणा-या पक्षांनी आणि तीन मशिदींचे व्यवस्थापन करणा-या संस्थांनी सर्वोच्च न्यायालयाला, तसेच संबंधित राज्य आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांना कळवले आहे की, ➪(पान २ वर)



## राम मंदिरात देणगी घोटाळा प्रकरण

### सुप्रीम कोर्टाकडून दखल

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-**सर्वोच्च न्यायालयाने अयोध्या राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणात उत्तर प्रदेश सरकार, केंद्र सरकार आणि श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट यांना नोटीस बजावली. उत्तर प्रदेश सरकारला सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले असून, त्यात एसआयटीच्या तपास अधिका-यांचा तपशील समाविष्ट करण्यास सांगितले आहे. न्यायालयाने या प्रकरणाशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज जतन करण्याचे निर्देशही दिले.राम मंदिरातील चोरीच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन झाल्याचे वृत्त आहे. त्यामुळे आम्ही उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या एसआयटीला सद्यस्थितीचा अहवाल सादर ➪(पान २ वर)





### मोठी नावेही उघड होणार, कोणालाही सोडणार नाही

**अयोध्या :** अयोध्येतील राम मंदिरातील देणगी घोटाळाप्रकरणी एसआयटी तपास करत आहे. श्री राम जन्मभूमी ट्रस्टचे माजी महासचिव चंपत राय यांचे निकटवर्ती टिंनू यादव यांच्यासह आठ आरोपी देणगी घोटाळा प्रकरणात तुरुंगात आहेत. या प्रकरणाचा तपास करणारी एसआयटी पैशांच्या व्यवहारांचा तपास करत असून माजी कारसेवक संतोष दुबे यांनी सोमवारी राम मंदिरातील देणगी चोरीसंदर्भात नवीन पुरावे एसआयटीला सादर केले. या प्रकरणात मोठी नावेही उघड होतील, कोणालाही सोडले जाणार नाही असे सांगत संतोष दुबे यांनी देणगी घोटाळा प्रकरणी एसआयटीकडे कागदपत्रे सादर केली. राम मंदिरातील देणगी घोटाळाप्रकरणी तपास करणा-या एसआयटीने आता तपासाला गती दिली आहे. एसआयटीने देणगी घोटाळा मुद्द्यावर आवाज ➪(पान २ वर)






# खाउँगा, खाने दूँगा और खिलाउँगा मोदींचे धोरण-जयराम रमेश

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर भ्रष्टाचाराच्या विविध कथित प्रकरणांवरू न जोरदार हल्लाबोल केला आहे. एक्सवरील एका विस्तृत पोस्टमध्ये त्यांनी २०१४ मध्ये पंतप्रधान मोदी यांनी दिलेल्या ना खाउँगा, ना खाने दूँगा या घोषणेचा उल्लेख करत, ती प्रत्यक्षात फोल ठरल्याचा आरोप केला.

रमेश यांनी म्हटले की, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नोटाबंदीला संघटित लूट आणि कायदेशीर दरोडा असे संबोधले होते. त्यानंतर गुजरातचे मुख्यमंत्री असताना झालेला २०,००० कोटींचा कथित घोटाळा लपवण्यासाठी जीएसपीसीचे ओएनजीसीमध्ये विलीनीकरण करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच, इलेक्टोरल बाँड योजना ही पुढे जाउन चंदा दो, धंदा लो असा ४ लाख कोटींचा कथित घोटाळा ठरल्याचा दावाही त्यांनी केला. याशिवाय, उद्योगपती गौतम अदानी यांच्या व्यावसायिक साम्राज्याचा झालेला विस्तार हा मोदी सरकारच्या कारभाराचे वास्तव दर्शवतो, असा आरोप करत काँग्रेसने हम अडानी के हैं कौन या मोहिमेद्वारे पंतप्रधानांना विचारलेल्या १०० प्रश्नांची आठवण त्यांनी करू न दिली. राफेल लढाउ विमान खरेदी व्यवहाराबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांची अद्याप समाधानकारक उत्तरे मिळालेली नसल्याचेही त्यांनी म्हटले. पंतप्रधान केअर्स निधी पूर्णपणे अपारदर्शक असून [illegible] उत्तरदायित्वाचा अभाव असल्याचा आरोप करत रमेश म्हणाले की, नियंत्रक आणि महालेखापरीक्षक संस्थेला कमकुवत करण्यात आले. मात्र, तरीही आयुष्मान भारत आणि प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेतील कथित बनावट खर्चांबाबतचे अहवाल समोर आले आहेत. जयराम रमेश यांनी अलीकडील काही घटनांचा उल्लेख करत केंद्र सरकारवर आणखी गंभीर आरोप केले. अयोध्येतील राम मंदिरातील कथित देणगी चोरीला त्यांनी चंदा चोरी, श्रद्धेचा विश्वासघात असे संबोधत हा प्रकार देशाच्या श्रद्धेला धक्का देणारा असल्याचे म्हटले. तसेच, ६ एप्रिल २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या कार्यकाळातील काही निर्णयांची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश दिल्यानंतरही अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पदावर कायम असल्याचा आरोप त्यांनी केला..



## सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडीला पक्षातूनच आक्षेप

**मुंबई :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पक्षातील राष्ट्रीय अध्यक्ष पदावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील जेष्ठ नेते आणि राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी थेट वकिलांमार्फत नोटीस पाठवून प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पक्षाच्या अध्यक्षांसह वरिष्ठ नेत्यांना ९ जुलै रोजी त्यांनी ही नोटीस बजावली असून राष्ट्रीय अध्यक्ष पदाची निवडणूक पुन्हा घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने सुनेत्रा पवार, कार्यकारी अध्यक्ष म्हणून प्रफुल्ल पटेल आणि पक्षाचे सचिव म्हणून ब्रिजमोहन श्रीवास्तव यांना ही नोटीस बजावण्यात आली आहे. त्यात, २६ फेब्रुवारी २६ रोजी घेण्यात आलेली पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवडणूक ही अवैध असल्याचे म्हणत ती रद्द करू न पुन्हा निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. याबाबत स्वतंत्र आणि निःपक्षपाती असा निवडणूक ➪(पान २ वर)



## खामगावाचे पॅथॉलॉजिस्ट डॉ. गोपाल सोनी यांचा संशयास्पद मृत्यू!

**बुलढाणा/प्रतिनिधी :** खामगाव शहरातील प्रसिद्ध पॅथालाजिस्ट आणि सोनी रक्तपेढीचे संचालक डॉक्टर गोपाल सोनी यांचा रविवारी सायंकाळी त्यांच्याच शेतात संशयास्पद स्थितीत मृतदेह आढळून आला. या घटनेने खामगाव सह जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. डाक्टर सोनी यांच्या शरीरावर जखमांच्या खुणा आढळून आल्याने हा घातपाताचा प्रकार असावा, असा संशय बळावला आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेउन खामगाव ग्रामीण पोलिसांनी तातडीने तपास चक्र फिरवत रविवारी रात्री उशिरा ३ संशयितांची कसून चौकशी केली आहे. दरम्यान डाक्टर सोनी यांच्या मृतदेहाचे सोमवारी, १३ जुलै रोजी दुपारी विच्छेदन करण्यात आले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता शव विच्छेदनासाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या फारेन्सिक टीम ला बोलवण्यात आले होते. आता ➪(पान २ वर)



पान १ व १० वरून

## तिवसा येथे ५५ लाखांचा

ट्रक अडविण्यात आला. झडतीदरम्यान ट्रकमध्ये 'बाजीराव' सुगंधित पानमसाला आणि 'मस्तानी' सुगंधित तंबाखू भरलेली १३० मोठी नायलॉन पोती आढळून आली. पोलिसांनी तत्काळ संपूर्ण माल आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला ट्रक जप्त केला. या कारवाईत अब्दुल रफिक अब्दुल शब्बीर (३५, रा. महेंद्र कॉलनी, अमरावती) आणि अर्शद खान रहमत खान (३०, रा. ताजनगर, पठाण चौक, अमरावती) या दोघांना अटक करण्यात आली आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून तिवसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. अमरावती जिल्ह्यात प्रतिबंधित गुटख्याच्या अवैध व्यापाराविरोधात पोलिसांनी गेल्या काही महिन्यांत सातत्याने कारवाया सुरू ठेवल्या आहेत. राज्यात गुटखाबंदी लागू असतानाही विविध मार्गांनी गुटख्याची तस्करी होत असल्याचे वारंवार उघड होत आहे. त्यामुळे या अवैध साखळीतील मुख्य सूत्रधार, पुरवठादार आणि वितरण जाळ्याचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून सखोल तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार, रविंद्र बावणे, बळवंत दाभणे, भूषण पेठे, निलेश डांगोरे, पंकज फाटे आणि चालक प्रशिक वानखडे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## गोपालनगरातील इटालियस कॅफेवर

संबंधित कॅफेमध्ये युवक-युवतींना तासाच्या आधारावर स्वतंत्र केबिन उपलब्ध करून दिली जात असल्याच्या तक्रारी येत होत्या. प्राथमिक माहितीनुसार, एका तासासाठी २५० रुपये आकारले जात असून त्यामध्ये चहा-पाण्याची सुविधाही दिली जात होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर भरोसा सेलच्या पथकाने कॅफेवर अचानक छापा टाकला.

कारवाईदरम्यान पाच प्रेमी युगुले आक्षेपार्ह अवस्थेत आढळून आल्याने सर्व १० युवक-युवतींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तसेच अशा प्रकारच्या कृत्यांसाठी जागा उपलब्ध करून दिल्याप्रकरणी कॅफेचालकाविरुद्धही कारवाई करण्यात आली. या कारवाईत ताब्यात घेण्यात आलेल्या काही युवक-युवती अल्पवयीन असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, त्याबाबत पोलिसांकडून पडताळणी सुरू आहे. प्रकरणाचा पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहेत.

ही धडक कारवाई भरोसा (महिला) सेलच्या पोलीस निरीक्षक ज्योती विल्हेकर आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक मेघाली गावंडे यांच्या नेतृत्वाखाली महिला पोलीस कर्मचारी पूजा सपकाळ, नंदिनी वरठे, रजनी घावले तसेच पोलीस कर्मचारी गजानन सातंगे यांच्या पथकाने केली.

## 'बोगस बियाणे कंपन्यांनवर शासनाने

रद्द करून त्यांना कायद्याप्रमाणे कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी भूमिका बच्चू कडू यांनी मांडली.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांनी शासनाला सादर केलेल्या अहवालात बूस्टर प्लांट जेनेटिक्स प्रा. लि., छत्रपती संभाजीनगर या कंपनीच्या सोयाबीन बियाण्यांमध्ये अत्यंत गंभीर अनियमितता आढळून आल्या आहेत. बीज कायदा, १९६६ तसेच भारतीय बीज प्रमाणीकरण किमान मानकांचे उल्लंघन, एकाच बीजोत्पादन क्षेत्रातील वेगवेगळे लॉट क्रमांक, बॅग व टॅग संख्येतील तफावत, दिशाभूल करणाऱ्या हमी, नमुने अप्रमाणित असतानाही विक्री, तपासणीवेळी कागदपत्रे न देणे आणि शासनाला आवश्यक माहिती न सादर करणे अशा अनेक गंभीर बाबी अहवालात नमूद आहेत.

या प्रकरणात केवळ नोटीस देणे किंवा दंड आकारणे पुरेसे नाही. बूस्टर प्लांट जेनेटिक्स प्रा. लि.सह शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सर्व कंपन्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात यावेत. संबंधित उत्पादक, वितरक, विक्रेते आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. राज्यभर या कंपनीच्या विक्री झालेल्या बियाण्यांची विशेष तपासणी मोहीम राबवून दोषी साठा जप्त करण्यात यावा.

बच्चू कडू यांनी बियाणे अधिनियमात आमूलाग्र बदल करण्याची मागणीही केली आहे. बोगस किंवा निकृष्ट बियाणे आढळताच संबंधित कंपनीने तात्काळ मोफत दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देणे बंधनकारक करावे. बियाण्यामुळे हंगाम उद्ध्वस्त झाल्यास पेरणी, मशागत, खते, औषधे, मजुरी, सिंचन, उत्पादनातील नुकसान आणि वर्षभराच्या आर्थिक नुकसानीची संपूर्ण भरपाई कंपनीकडून सक्तीने वसूल करण्याची स्पष्ट कायदेशीर तरतूद करण्यात यावी. नव्या बियाणे अधिनियमात प्रति एकर किमान २ लाख नुकसानभरपाई देणे बंधनकारक करण्यात यावे. तसेच बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्या, वितरक आणि विक्रेत्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्याची स्पष्ट तरतूद करण्यात यावी."

## अमरावतीच्या मुलीचा सेलूमध्ये

लाथा मारण्यात आल्या, ज्यामुळे तिचा गर्भपात झाला. या घटनेनंतर ती तीन महिने माहेरी राहिली, परंतु संसार वाचवण्याच्या आशेने महिना भरापूर्वीच ती पुन्हा सासरी परतली होती. मात्र, तिथे गेल्यावरही तिचा छळ थांबला नाही.

**वडिलांना केला होता शेवटचा फोन -** मनिषाचे वडील राजेश श्रावण जाधव यांनी सांगितले की, मृत्यूच्या अवघ्या एक दिवस आधी मनिषाने फोन करून रडत सांगितले होते की, सासरचे लोक मला खूप मारहाण करत आहेत आणि ते मला जीवे मारू शकतात.' तिने आपल्या अंगावरील जखमांचे फोटो आणि व्हिडिओ देखील माहेरच्यांना पाठवले होते. त्यानंतर ११ जुलै रोजी संध्याकाळी ६ वाजता पती विनोदने फोन करून मनिषाने आत्महत्या केल्याचे सांगितले. जेव्हा नातेवाईक रुग्णालयात पोहोचले, तेव्हा मनिषाच्या हातावर आणि शरीरावर मारहाणीच्या अनेक जखमा दिसून आल्या.

**नातेवाईकांचा रुग्णालयात आक्रोश-** मनिषाचा मृतदेह शनिवारी दुपारी हेलोडी येथील घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला होता. तिला आधी सेलडोह ग्रामीण रुग्णालय आणि नंतर सेलू येथे नेण्यात आले, जेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. रविवारी १२ जुलै रोजी तिचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वर्धा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला. यावेळी मनिषाच्या संतप्त नातेवाईकांनी रुग्णालयात मोठी गर्दी करत न्यायाची मागणी केली आणि गोंधळ घातला.

## साईनगरातील ड्रकॅफे बर्गर ब्रँडय्वर

पोलीस आयुक्त (राजापेठ विभाग) संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पार पडली. या कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे, पोलीस कर्मचारी मनीष करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवि लिखीतकर, अकुंश काळे, प्रशांत बेलोकर, मंगेश कपीले, आकाश यादव, अमोल खंडेझोड, अर्जुन कदम तसेच महिला पोलीस अंमलदार पुनम कुंबलकर यांनी सहभाग घेतला.

शहरातील कॅफे व तत्सम व्यावसायिक आस्थापनांमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर प्रकारांवर पोलिसांकडून पुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## ४५ वर्षीय व्यक्तीची गळफास घेऊन

घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## निवडणुकीच्या कामात हलगर्जीपणा

आहे. बीएलओ यांचे काम अतिशय संवेदनशील व महत्त्वाचे असून आरोपी हे त्यांच्या कामामध्ये हलगर्जीपणा आणि दुर्लक्ष करीत असून मतदार संघाच्या ईएफ फॉर्मचे जाणीवपूर्वक वाटप करीत नाही आहेत. तसेच विधानसभा निवडणूक आयोगाच्या एसआयआर, ईआरओ आणि एईआरओ यांच्या आदेशाचे पालन करीत नसून शासकीय कामात अडचण निर्माण करत आहेत. निवडणूक आयोगाचे ई एफ फॉर्म जाणीवपूर्वक वाटप केलेले नाही, असे तक्रारी मध्ये म्हटले आहे. या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेत मतदार नोंदणी अधिकारी आणि शिक्षण विभागाने त्यांना तीन दिवसांपूर्वी कारणे दाखवा नोटीस देखील बजावली होती. ९ जुलै रोजी नोटीस बजावूनही शिक्षक सुनील काळे हे सातत्याने संपर्क क्षेत्रा बाहेर राहिले आणि त्यांनी कर्तव्यावर हजर न राहता प्रशासनाला सहकार्य केले नाही. सुनील काळे यांच्या या गैरहजेरीमुळे चोपण गावातील मतदार नोंदणी मोहिमेचा वेग कमालीचा मंदावला होता.

## निकृष्ट बियाण्यांनी शेतकऱ्यांचे

शेतकऱ्यांनी आता न्यायासाठी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाकडे धाव घेतली आहे.

बूस्टर कंपनीचे 'हुतुतु' सोयाबीन, महादेव इन्व्हेज, रोहित सिड्स तसेच इतर कंपन्यांच्या बियाण्यांची पेरणी करूनही अपेक्षित उगवण न झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. पेरणीसाठी घेतलेले कर्ज, वाढलेला खर्च आणि पुन्हा दुबार पेरणीचे संकट यामुळे शेतकरी आर्थिक व मानसिक तणावाखाली आले आहेत. अशातच सोमवारी (१३ जुलै) शेतकऱ्यांनी चांदूर रेल्वे येथील उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी संचित ढाकरे ही उपस्थित होते. राजुरा येथील शेतकरी तथा ग्रामपंचायत सदस्य भूषण काळे यांनी निकृष्ट बियाण्यांच्या रिकाम्या थैल्या अंगात घालून अनोख्या पद्धतीने निषेध नोंदविला. हा निषेध उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. एसडीओ कार्यालय परिसरात शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत दोषी कंपन्यांवर कठोर कारवाई, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची भरपाई आणि बोगस बियाण्यांच्या कंपनीवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. निवेदन देतेवेळी शेतकरी तथा ग्रामपंचायत सदस्य भूषण शिवदासराव काळे, शेतकरी विठ्ठल बावनकुळे, प्रीतम चव्हाण, पवन देशमुख, भाऊराव चौधरी, नितीन पाचपोर, मंगेश सोळंके, प्रशांत कोल्हे, विनोद काळमेघ, प्रमोद काळे, अमोल अजमिरे, अभिजीत पाचपोर, अक्षय अजमिरे, नीरज फाळे, रवी पाचपोर, निलेश जुनघरे, दिनेश जगताप, प्रवीण कदम, रोहीत राऊत, भूषण राजनेकर, राहुल निंबर्ते, वासुदेव अजमिरे, शुभम कुर्जेदार, सौरभ वाघमारे, राजेंद्र सोळंके, संजय कोकरे, श्रीराम आयनर, चेतन बेलसरे, प्रथमेश अजमिरे यांच्यासह तालुक्यातील अनेकांची उपस्थिती होती.

## सातनूर छ्ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराची

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली होती. त्यानंतर चौकशीसाठी समितीही गठीत करण्यात आली होती. चौकशी दरम्यान अनेक गंभीर अनियमितता समोर आल्या आहेत. निवेदन देणाऱ्यांमध्ये पवन चौधरी, नितेश अडमाची, मारोती धुर्वे, निलेश पाटील, गोपाल युवनाते, हर्षल कुमरे, आदिल कुमरे, उमेश युवनाते, अनिल सिरसाम, सुरेश कुमरे, रोहित तुसराम, चंद्रशेखर धुर्वे, गौरव उइके यांचा समावेश होता.

## डॉआंबेडकर स्मारकाला हायकोर्टाची

निकाल आल्याने लवकरच भव्य स्मारक उभे राहण्याची शक्यता आहे. जमीन मालक चंद्रशेखर उर्फ किशोर गट्टाणी यांनी २०१६ मध्ये जमीन अधिग्रहणाला आव्हान देणारी रिट याचिका दाखल केली होती. ती याचिका न्यायालयाने संपूर्णपणे फेटाळून लावली. त्यामुळे इर्विन चौकातील स्मारकाच्या भूसंपादनाला असलेले सर्व कायदेशीर अडथळे दूर झाले आहेत. या निर्णयानंतर आता अमरावती महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाला इर्विन चौकात भव्य स्मारकासह सौंदर्यीकरणाचे काम हाती घेता येणार आहे. स्मारक समितीचे समन्वयक किशोर बोरकर यांनी म्हटले की आंबेडकरीं संघटनांनी केलेल्या संघर्षाला शेवटी यश आले. राजकीय पक्षांनीही एकत्रित येऊन यासाठी प्रयत्न केले होते. शेवटी सर्वांचे प्रयत्नाला यश आले. त्यांनी हायकोर्टाचे आभार मानले.

आंबेडकरी अनुयायांचा जल्लोष-

निकालाची बातमी येताच इर्विन चौकात मोठा जल्लोष करण्यात आला. अनुयायांनी फटाके फोडले आणि एकमेकांना पेढे भरवून आनंद साजरा केला. यावेळी कमलताई गवई, प्रकाश बनसोड, रमेश कटके, प्रा. जगदीश गोवर्धन, आनंद इंगळे, ॲड. सुनील गजभिये, बंटी रामटेके, शेषनाग गजभिये, राजेश वानखडे, सुनील रामटेके, प्रा. प्रफुल्ल गवई, नगरसेवक इस्माईल लालुवाले, ॲड. शुभम कांबळे, बाबाराव धाकटे, जयदेव पाटील, नाना रंगारी, सेवानंद वाकोडे यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.

## 7 अब्ज 59 कोटी

**मोबाईलवरील बॅलन्स पाहून झाले हैराण-** पैसे काढल्यानंतर काही वेळातच शिव कुमार यांच्या मोबाईलवर बँकेचा एसएमएस आला. जेव्हा त्यांनी आणि सीएसपी चालकाने मेसेजमधील शिल्लक रक्कम पाहिली, तेव्हा दोघेही अवाक झाले. त्या मेसेजमध्ये खात्यात तब्बल ७ अब्ज ६० कोटी रु पयांचा बॅलन्स दिसत होता. सुरु वातीला हा एखादा जोक वाटला, पण जेव्हा मेसेज पुन्हा नीट वाचला तेव्हा सर्वांनाच मोठा धक्का बसला.

## मान्सून 7 दिवसांत पुन्हा

दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. दोन राष्ट्रीय महामार्गांसह एकूण १२६ रस्ते सध्या बंद आहेत. स्यानचट्टीजवळील ऋषिकेश-यमुनोत्री महामार्ग रविवारी सलग तिस-या दिवशीही बंद राहिला.हरियाणात, हिमाचल प्रदेशातून येणा-या पाण्यामुळे यमुना आणि मार्कंडा नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली असून अनेक गावांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, पावसामुळे दिल्लीतील यमुनेच्या पाणी पातळीतही वाढ झाली आहे; रविवारी नदीत अंघोळ करताना प्रवाहाच्या तीव्र वेगामुळे चार मुले वाहून गेली. हवामान विभागाने, राज्यातील बहुतांश भागांत हलक्या ते मध्यम स्वरू पाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच मराठवाडा व विदर्भातील काही भागांत पावसाचा अंदाजही वर्तवला आहे. याशिवाय धुळे, नंदुरबार, नाशिक व रत्नागिरी जिल्ह्यातही पावसाची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मराठी येत नसल्याने ओडिशातील

असे निरीक्षण न्या. एम. नेर्लीकर यांच्या खंडपीठाने नोंदवले.

**३३.६ किलो गांजा जप्त-** नागपूरमधील काटोल पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या गुन्ह्यात आरोपी शिवराज उर्फ राहुल मलिक याला ३३.६ किलो गांजा जप्ती प्रकरणात अटक करण्यात आली होती. तपास यंत्रणेने तो ओडिशातून गांजाचा पुरवठा करत असल्याचा आरोप केला होता. तसेच बँक व्यवहारांच्या आधारे त्याचा या रॅकेटशी संबंध असल्याचे सांगितले होते. या प्रकरणात ओडिशातील रहिवासी असलेल्या आरोपीला अटकेची कारणे केवळ मराठीत लेखी स्वरू पात देण्यात आली होती. त्याला मराठी समजत असल्याचा किंवा ती वाचता येत असल्याचा कोणताही पुरावा तपास यंत्रणेकडे नव्हता.

**मराठीत आरोपाची माहिती दिली-** आरोपीच्या वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, आरोपी हा ओडिशाचा कायमस्वरू पी रहिवासी असून तेथे ह?टेल व्यवसाय करतो. त्यामुळे त्याला मराठी समजत नसताना अटकेची कारणे केवळ मराठीत देण्यात आली, ही घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन करणारी बाब आहे. राज्य सरकारनेही अटकेची कारणे मराठीत दिल्याची कबुली दिली. मात्र ती आरोपीला हिंदीत तोंडी समजावून सांगण्यात आल्याने कायद्याचे पालन झाले, असा दावा केला. मात्र हा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला. आरोपीला मराठी समजत असल्याचा किंवा अटकेची कारणे त्याच्या मातृभाषा ओरिया (ओडिया)मध्ये लेखी स्वरू पात भाषांतरित करू न देण्यात आल्याचा कोणताही पुरावा नसल्याचे न्यायालयाने नमूद केले.

## काशी, मथुरा, संभलमध्ये

ते मध्यस्थी प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक नाहीत. तिन्ही विवादांशी संबंधित वकील आणि पक्षकारांनी एचटीला सांगितले की, प्रार्थनास्थळांवरील परस्परविरोधी दावे, मालकी हक्काचे प्रश्न, घटनात्मक मुद्दे आणि अत्यंत सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींचा समावेश असलेले खटले लोक अदालत किंवा मध्यस्थीद्वारे सोडवण्याऐवजी न्यायालयांनी निकाली काढावेत, असे त्यांचे मत आहे.

## सुप्रीम कोर्टाकडून दखल

करण्याचे निर्देश देतो. हे प्रकरण पुढील सोमवारी पुढील विचारार्थ सूचीबद्ध केले जावे. सॉलिसिटर जनरल म्हणाले की, आम्ही तो एका सीलबंद लिफाफ यात सादर करू. न्यायालयाने म्हटले की, सद्यस्थितीच्या अहवालात एसआयटीच्या स्थापनेचा संपूर्ण तपशील असावा. याचिकाकर्त्यांच्या वकिलाने सुचवले की, सद्यस्थितीचा अहवाल याचिकाकर्त्यांना दिला जाउ शकतो. यावर सरन्यायाधीश म्हणाले की, आम्ही त्यावर नंतर विचार करू. तपास सुरू आहे.

सुनावणी सुरू होताच याचिकाकर्त्यांच्या वकिलाने सांगितले की, एक एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. काही घडामोडी झाल्या आहेत. सीसीटीव्ही फुटेज आणि इतर साहित्य नष्ट केले जाउ शकते. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी उत्तर दिले की, तुमची उर्जा वाचवा. तुम्हाला तिची बाहेरही गरज लागेल. केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणारे स?लिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आम्ही राज्याचे प्रतिनिधित्व करत आहोत. नोटीस आवश्यक नसेल किंवा ती केवळ राज्य अधिकायांपुरती मर्यादित ठेवली जाउ शकते.

**सीलबंद लिफाफ यात अहवाल सादर करणार-**सरकारचे प्रतिनिधित्व करणारे स?लिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, सद्यस्थितीचा अहवाल एका सीलबंद लिफाफ यात सादर केला जाईल. अहवालात एसआयटीची स्थापना आणि रचनेचा संपूर्ण तपशील असावा, असे न्यायालयाने स्पष्ट केले. यानंतर न्यायालयाने पुढील सुनावणी २० जुलै रोजी निश्चित केली आहे.

**३ स्वतंत्र याचिकांवर सुप्रीम कोर्टात सुनावणी-**सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ तीन स्वतंत्र याचिकांवर सुनावणी करत होते. या याचिकांमध्ये तपास सीबीआयकडे हस्तांतरित करण्याची, तसेच मंदिरातील देणग्यांच्या व्यवस्थापनाशी संबंधित विविध बाबींचा आढावा घेण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्याची मागणी करण्यात आली होती.

**८ आरोपींच्या कोठडीत वाढ-**अयोध्येतील राम मंदिर देणगी चोरी प्रकरणात अटक केलेल्या सर्व ८ आरोपींना व्हीडिओ क?न्फरन्सिंगद्वारे न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्यांची पोलिस कोठडी आज संपल्याने हजर केले. यावेळी व्हीडीओ क?न्फरन्सिंगद्वारे सुनावणी होउन आठही आरोपींना २७ जुलैपर्यंत कोठडीत वाढ केली. आरोपींमध्ये मंदिर ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय यांचे निकटवर्तीय रामशंकर यादव उर्फ ??टिन्नू आणि नैवेद्याची मोजणी करण्याची जबाबदारी असलेले सुभाष श्रीवास्तव याच्यासह आठही आरोपींच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी पोलिसांनी केली. त्यावर कोर्टाने २७ जुलैपर्यंत पोलिस कोठडी वाढविली आहे.

## मोठी नावेही उघड होणार

उळवणा-या माजी कारसेवक संतोष दुबे यांची चौकशी केली. संतोष दुबे सोमवारी अयोध्या सीओच्या कार्यालयात पोहोचले आणि त्यांनी राम मंदिरातील देणगी घोटाळ्याबाबत पुरावे सादर केले. संतोष दुबे यांनी सांगितले की, या पुराव्यांमुळे देणगी चोरणा-यांच्या अडचणी वाढतील. संतोष दुबे यांनी सांगितले की, एसआयटीने एक दिवस आधी व्हीडीओ क?न्फरन्सिंगद्वारे देणगी चोरीसंदर्भात त्यांची चौकशी केली होती. त्यांनी पुढे सांगितले की, एसआयटी त्यांच्या जबाबांचा आणि पुराव्यांचाही तपासात समावेश करत आहे. एसआयटीने सर्व पुरावे सीओच्या कार्यालयात सादर करण्यास सांगितले होते. त्यामुळेच ते पुरावे सादर करण्यासाठी सीओच्या कार्यालयात गेले होते. सीओच्या कार्यालयातून एसआयटीकडे पुरावे सुपूर्द केले जातील. त्यांनी दावा केला की, यात अनेक मोठी नावेही उघड होणार आहेत. कोणालाही सोडले जाणार नाही.

## खामगावाचे पॅथॉलॉजिस्ट डॉ. गोपाल

या विच्छेदनाच्या अहवालाची पोलीस विभागासह खामगावच नव्हे तर जिल्ह्यातील वैद्यकीय वर्तुळाला प्रतीक्षा लागून आहे. या घटनेच्या तपासात शव विच्छेदन अहवाल निर्णायक ठरला आहे. या अहवाला नंतर डाक्टर सोनी यांच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे.

**घातपाताचा संशय-** सोनी हे मागील अनेक वर्षांपासून खामगाव येथे एकमेव रक्तपेढी चालवत होते. त्याच बरोबर ते सामाजिक कार्यातही अग्रेसर होते. रविवार सुट्टीचा दिवस असल्याने ते संध्याकाळच्या सुमारास एकटेच आपल्या शेतात गेले होते. मात्र, तिथे गेल्यानंतर दीड ते दोन तासांतच ते शेतात मृतावस्थेत आढळून आले. त्यांच्या निधनाची बातमी वा-यासारखी पसरताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. डा. सोनी यांच्या शरीरावर काही ठिकाणी जखमांच्या खुणा दिसून आल्या आहेत, त्यामुळे हा घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सोनी यांच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरू न खामगाव ग्रामीण पोलिसांनी तपासाला गती दिली आहे. या प्रकरणाबाबत बोलताना उप विभागीय पोलीस अधिकारी संदीप पाटील यांनी सांगितले की, घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. आहे. डा. सोनी यांच्या मृत्यूचे नेमके कारण काय? हा घात पात आहे की नैसर्गिक मृत्यू याचा अधिकृत खुलासा शवविच्छेदनाचा अंतिम अहवाल आल्यानंतरच होईल. पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहे. दरम्यान नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. असे आवाहन ठाणेदार तावडे यांनी केले आहे .

## नीट पेपरफुटी : सोनम वांगचूक

करताना उद्धव ठाकरे यांनी हे सरकार संवेदनशील नसल्याचा आरोप केला. सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले जात असून त्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे त्यांनी सांगितले. येत्या २० तारखेला दिल्लीतील जंतरमंतर येथे होणा-या आंदोलनात देशातील सर्व राजकीय पक्षांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. देशातील खासदारांनीही या आंदोलनात उपस्थित राहून तरु णांच्या भवितव्यासाठी आवाज उठवावा, असे ठाकरे म्हणाले.

नीट परीक्षेतील पेपरफुटीचा मुद्दा महिनाभरापासून चर्चेत असल्याचे सांगत उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. जंतरमंतर येथे अभिजीत दिपके यांनी हा विषय उपस्थित करून आंदोलन सुरू केले. हा केवळ राजकीय मुद्दा नसून देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न असल्याचे त्यांनी म्हटले. पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांवर परिणाम झाला, काहींनी टोकाचे पाउल उचलले, मात्र सरकारने त्याकडे पुरेसे लक्ष दिले नाही, असा आरोप त्यांनी केला.

सोनम वांगचूक यांच्या कार्याचा आणि बुद्धिमत्तेचा आदर केला पाहिजे, असे सांगत उद्धव ठाकरे म्हणाले की, अशा व्यक्तींनाही देशद्रोही ठरवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. त्यांचे उपोषण १६ दिवस सुरू असतानाही केंद्र सरकारकडे लक्ष देण्यासाठी वेळ नसल्याची टीका त्यांनी केली.

येत्या २० तारखेच्या आंदोलनाआधी जंतरमंतरवर काही गुंड पाठवून हिंसाचार घडवून आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न होउ शकतो, असा आरोपही उद्धव ठाकरे यांनी केला. अभिजीत दिपके हे देशातील युवकांचा आवाज उठवत आहेत. युवक आणि पालकांनी आता जागे होण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

अण्णा हजारे यांच्या आंदोलनाचा संदर्भ देताना उद्धव ठाकरे



## 'आओ गांव चले' अभियानांतर्गत आयएमए चे पिंपरी यादगिरे येथे बहुविशेषज्ञ आरोग्य शिबीर

**अमरावती/प्रतिनिधीः-**इंडियन मेडिकल असोसिएशन, अमरावती शाखेच्या वतीने रविवार, १२ जुलै २०२६ रोजी 'आओ गांव चले' अभियानांतर्गत उप आरोग्यवर्धिनी केंद्र, पिंपरी यादगिरे येथे बहुविशेषज्ञ आरोग्य तपासणी शिबीराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या शिबिरात IMA अमरावतीचे अध्यक्ष डॉ. दिनेश वाघाडे (वैद्यरोग तज्ञ), सचिव डॉ. विक्रम वानखडे (मानसोपचार तज्ञ), डॉ. संदीप दानखडे (बालरोग तज्ञ), डॉ. रुतिका खडसे (नेत्ररोग तज्ञ), डॉ. अक्षय हातवरे (हाडांचे शल्यचिकित्सक), डॉ. अनिल दारोकर (शल्यचिकित्सक), डॉ. अतुल यादगिरे (कर्करोग शल्यचिकित्सक), डॉ. सुनील साकरकर (त्वचारोग तज्ञ) व डॉ. मोनाली कलंबे (स्त्रीरोग तज्ञ) यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून रुग्णांची तपासणी व मार्गदर्शन केले. या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या दारातच दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा आहे. 'Let's give health to every Indian' या IMA च्या राष्ट्रीय अभियानाचा भाग म्हणून हे शिबीर घेण्यात आले. शिबिरात एकूण ९५ रुग्णांची मोफत सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान उच्च रक्तदाब (HT) आणि मधुमेह (DM) चे अनेक नवीन रुग्ण आढळून आले. त्यांना नियमित पाठपुरावा व उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. गावकऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. IMA अमरावतीने असे उपक्रम सातत्याने राबवून आरोग्य सेवा वंचित गावांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.



यांनी सांगितले की, त्यावेळी सरकारने संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. एखाद्या व्यक्तीकडून जबाबदारी पार पाडली जात नसेल तर त्या व्यक्तीमध्ये बदल करण्यात काय गैर आहे, असा सवाल करत त्यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेऊन सक्षम व्यक्तीची नियुक्ती करण्याची मागणी केली. नीट परीक्षेतील गैरप्रकारांवर कठोर कारवाई करून विद्यार्थ्यांना न्याय देण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## बेरोजगारीविरुद्ध नेपाळमध्ये

बेरोजगारी आणि सरकारी धोरणांबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. जर सरकारने लवकर प्रभावी पावले उचलली नाहीत तर विरोध अधिक तीव्र होउ शकतो, असे राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांचे मत आहे. ५ मार्च रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बालेन शाह यांच्या पक्षाने मोठा विजय मिळवला. त्यामुळे नेपाळच्या पारंपरिक राजकारणाला मोठा धक्का बसला. बालेन शाह यांनी झापा-५ मतदारसंघातून माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली यांचा पराभव करू न आपली राजकीय ताकद सिद्ध केली. ३५ वर्षांच्या वयात पंतप्रधानपद स्वीकारताच ते नेपाळचे सर्वात तरु ण पंतप्रधान बनले आहेत.

**सरकारचे अपयश-** २०२३ साली नेपाळमध्ये ज्-ेन-झींचे मोठे आंदोलन झाले होते. आंदोलनकर्त्यांनी ९ सप्टेंबर रोजी संसद भवनावर कब्जा केला होता. त्यांनी सुरक्षा कर्मचा-यांची शस्त्रही लुटली होती. या निदर्शनांमध्ये ७७ लोकांचा मृत्यू झाला होता आणि यामागे सोशल मीडियावर बंदी, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि मंद अर्थव्यवस्था याबद्दल लोकांचा संताप होता. त्यावेळी काठमांडूचे महापौर असलेले बालेन शाह यांनी याला राज्याचे मोठे अपयश म्हटले होते, मात्र आता सध्याच्या घटनांवर त्यांनी मौन पाळले आहे. ते विरोधक आणि आंदोलकांच्या निशाण्यावर आले आहेत.

## सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय

अधिकारी नेमून त्यांच्या मार्फत निवडणूक घेण्यात यावी. तोपर्यंत राष्ट्रीय अध्यक्ष आणि सुधारीत ऑफिस बेअररची यादी देखील रद्द समजावी, असेही नोटीसमध्ये बजावण्यात आले आहे.

२६ फेब्रु वारी रोजी राष्ट्रवादीच्या सर्वसाधारण सभेत प्रफुल पटेल यांच्याकडूनच ही घोषणा करण्यात आली होती. मात्र, आता या निवडीला आक्षेप घेत सुनेत्रा पवार यांना नोटीस बजावण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले होते. मात्र, २८ जानेवारी रोजी विमान अपघातात अजित पवारांचे निधन झाले, त्यानंतर, राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणा केली. पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्यास सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. त्यामुळे, सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपदासह पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, आता याच निवडीला राष्ट्रवादी पक्षातूनच आक्षेप घेण्यात आला आहे.

MAHATRANSCO

**SRM E-Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tenders) from registered Suppliers/agencies on Mahatransco SRM portal for following tenders.

| Tender No. | Estimated cost | EMD in Rs. | Tender fees in Rs. (To be paid Online only) | Date of downloading | Due date of submission |
|---|---|---|---|---|---|
| CE/EHV/PCO&M/Zone/Amt/Tech/2026-27/T-08 (1st Call) (RFx - 7000040684 (1st Call) | Balanced work of Supply, Erection, Testing and Commissioning of additional 1x25MVA, 132/33 kV T/F along with Bay equipments and all allied equipments with Civil works at 132kV Arni substation, under EHV O&M Division Yavatmal on turnkey basis under MSKVY 2.0 on the Risk & Cost of M/s. Electromech Services, Nashik (T/F will be provided by MSETCL) | | | | |
| | Rs. 2,17,53,530/- | Rs. 2,17,535.30/- | Rs. 5000/- + GST (as applicable.) Non- refundable. | 08.07.2026 to 23.07.2026 | 23.07.2026, 24:00 Hrs. |

**Contact Person :-** The Executive Engineer (Adm), EHV PCO&M Zone, "A" Wing, "Prakash Sarita", 220KV S/stn Amravati Campus, Welcome Point, Morshi Road, Amravati - 444603.
**Contact No :-** (0721) 2663030 (O) / 8554959575 E-mail ID:- ceamravati@mahatransco.in

**Note:** Vendors are requested to check our Mahatransco site i.e. https://www.mahatransco.in/ for further tender refloating/updating, time to time.

For further details, please visit our website: https://srmetender.mahatransco.in

The tender notice for tender no. T-08/2026-27 (RFx - 7000040684 (1st Call)) is already published on MSETCL's website.

Sd/-
Chief Engineer

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १४ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# बायोमायनिंग प्रकरणी माजी आरोग्य सभापती मंगेश चिखले मैदानात

## २.०७ कोटींच्या प्रकल्पावर सवालांचा मारा / काउंटडाऊन सुरू / 'डम्पिंग ग्राऊंडवर कचरा किती होता?'

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोट :** अकोट नगर परिषदेने राबविलेल्या सुमारे २.०७ कोटी रुपयांच्या बायोमायनिंग प्रकल्पावर आता गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. नगर परिषदेचे माजी आरोग्य सभापती मंगेश चिखले यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे सविस्तर तक्रार अर्ज सादर करून संपूर्ण प्रकल्पाची तांत्रिक, प्रशासकीय आणि आर्थिक चौकशी करण्याची मागणी केली आहे. या प्रकल्पाशी संबंधित सर्व कागदपत्रे नागरिकांसाठी सार्वजनिक करावीत, तृतीय पक्षामार्फत फेरतपासणी करावी आणि चौकशीत अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



संग्रहित छायाचित्र

### 'आरडीएफ कुठे गेला?', 'कोट्यवधींची देयके कोणत्या आधारावर?' नगर परिषदेकडे केली संपूर्ण कागदपत्रांची मागणी



चिखले यांनी आपल्या तक्रार अर्जात स्पष्ट नमूद केले आहे की, कोणावरही निष्कर्षात्मक आरोप करण्याचा त्यांचा हेतू नाही. मात्र, सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पात संपूर्ण पारदर्शकता असणे आवश्यक असून, नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांची अधिकृत कागदपत्रांच्या आधारे उत्तरे मिळाली पाहिजेत, अशी त्यांची भूमिका आहे.

सर्वात महत्त्वाचा प्रश्न त्यांनी डम्पिंग ग्राऊंडवरील लेगसी वेस्टच्या प्रमाणावर उपस्थित केला आहे. बायोमायनिंग प्रकल्प मंजूर करताना प्रत्यक्षात किती मेट्रिक टन जुना कचरा उपलब्ध होता? त्याबाबतचा अधिकृत सर्व्हे, पंचनामा, तांत्रिक प्रमाणपत्र आणि मोजणी अहवाल कोणता? जर आवश्यक प्रमाणात जुना कचरा उपलब्ध नव्हता, तर एवढ्या मोठ्या खर्चाचा प्रकल्प मंजूर करण्याची गरजच काय होती? असा थेट सवाल त्यांनी केला आहे.

तक्रार अर्जात त्यांनी संपूर्ण निविदा प्रक्रिया तपासण्याची मागणी केली आहे. प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक मंजुरी, कार्यादेश, करारनामा, अंदाजपत्रक आणि निविदेशी संबंधित सर्व अधिकृत कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती सार्वजनिक कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. बायोमायनिंग प्रक्रियेत वापरण्यात आलेल्या बायो-कल्चरच्या खरेदीवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. कोणते बायो-कल्चर वापरण्यात आले? त्याचा उत्पादक कोण? खरेदी बिले, जीएसटी चलने, ई-वे बिल, वाहतूक कागदपत्रे आणि वापराचा तपशील कुठे आहे? याची माहिती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच, प्रक्रियेतून तयार झालेल्या आरडीएफ (Refuse Derived Fuel) संदर्भातही अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. एकूण किती आरडीएफ तयार झाला? तो कोणत्या सिमेंट कारखान्यात किंवा अधिकृत उद्योगाकडे सुपूर्द करण्यात आला? त्यासंबंधी करार, वाहतूक चलने, ई-वे बिल, स्वीकार प्रमाणपत्र आणि प्राप्ती नोंदी उपलब्ध आहेत का? या सर्व बाबींचा खुलासा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

चिखले यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानग्यांबाबतही माहिती मागितली आहे. निरीक्षण अहवाल, अनुपालन अहवाल, पर्यावरणीय अटींचे पालन झाल्याचे दस्तऐवज तसेच प्रक्रियेतून तयार झालेल्या खताची प्रयोगशाळा तपासणी झाली असल्यास त्याचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

कोट्यवधी रुपयांची देयके नेमक्या कोणत्या आधारावर मंजूर करण्यात आली, हाही त्यांच्या तक्रारीतील महत्त्वाचा मुद्दा आहे. कामाची मोजमाप पुस्तिका (Measurement Book), तृतीय पक्ष तपासणी अहवाल, ड्रोन सर्व्हे, जीपीएस नोंदी, छायाचित्रे आणि प्रयोगशाळा अहवाल यांच्या आधारेच देयके अदा करण्यात आली का? यासंबंधी सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

डम्पिंग ग्राऊंडवर यापूर्वी लागलेल्या आगींच्या घटनांचाही त्यांनी उल्लेख केला आहे. त्या घटनांची अधिकृत नोंद काय आहे? त्या आगींचा बायोमायनिंग प्रकल्पावर काही परिणाम झाला होता का? याबाबतचा अधिकृत अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तक्रार अर्जात त्यांनी पाच प्रमुख मागण्या केल्या आहेत. बायोमायनिंग प्रकल्पाशी संबंधित सर्व प्रशासकीय, तांत्रिक आणि आर्थिक कागदपत्रे सार्वजनिक करावीत, संपूर्ण प्रकल्पाची स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक चौकशी करावी, तृतीय पक्षामार्फत फेरपडताळणी करावी, चौकशीत अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार अथवा जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी आणि या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीची लेखी माहिती द्यावी.

माजी आरोग्य सभापती मंगेश चिखले यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नांमुळे अकोट नगर परिषदेच्या बायोमायनिंग प्रकल्पाबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. कोट्यवधी रुपयांच्या या प्रकल्पातील सर्व व्यवहार, कागदपत्रे आणि प्रक्रिया आता प्रशासन सार्वजनिक करणार का? स्वतंत्र चौकशी होणार का? आणि नागरिकांच्या प्रश्नांना अधिकृत उत्तरे मिळणार का? याकडे अकोटसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**'कचरा किती होता?' – मूळ प्रश्नावरच बोट**

बायोमायनिंग प्रकल्प मंजूर करताना डम्पिंग ग्राऊंडवर प्रत्यक्षात किती लेगसी वेस्ट (जुना कचरा) उपलब्ध होता? त्याचा अधिकृत सर्व्हे, पंचनामा, तांत्रिक प्रमाणपत्र आणि मोजणी अहवाल कोणता? हे सर्व दस्तऐवज सार्वजनिक करण्याची मागणी चिखले यांनी केली आहे. यापुढे जात त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, जर आवश्यक प्रमाणात जुना कचराच उपलब्ध नव्हता, तर कोट्यवधी रुपयांचा बायोमायनिंग प्रकल्प मंजूर करण्यामागील तांत्रिक आधार नेमका कोणता होता? अशा मूळ प्रश्नावरच बोट ठेवल्याने नगर पालिका प्रशासनाची चांगलीच कोंडी झाली असल्याची चर्चा खुद्द नगर परिषद वर्तुळात सोमवारी दिवसभर रंगली होती.

**प्रशासन मौनात; प्रश्न मात्र अनुत्तरित**

या संपूर्ण प्रकरणात नगराध्यक्षा माया धुळे यांच्याशी संपर्क साधून प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांनी प्रतिक्रिया देणे टाळले. तर मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळू शकला नाही. त्यामुळे आता प्रशासन संबंधित कागदपत्रे सार्वजनिक करणार का? स्वतंत्र चौकशी होणार का? आणि नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांची अधिकृत उत्तरे मिळणार का? याकडे अकोटसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

## जिल्हा न्यायालय परिसरात वृक्षारोपण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा न्यायालय, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, आणि जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. १२ जुलै रोजी जिल्हा न्यायालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम होते. यावेळी जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. पी. झपाटे आणि जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष अनूप बाकलीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व न्यायिक अधिकारी, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे सदस्य तसेच न्यायालयीन कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत जिल्हा न्यायालय परिसरात सुमारे ७५ वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

## उपवर्गीकरणाच्या विरोधात २७ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा




**वाशिम :** अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) करण्याच्या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शवत व आरक्षण व्यवस्थेचे संरक्षण करण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील विविध सामाजिक, राजकीय व आंबेडकरी संघटनांनी एकत्र येत २७ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचा निर्धार केला आहे. या मोर्चाची रूपरेषा निश्चित करण्यासाठी १२ जुलै रोजी स्थानिक विश्राम भवन, सिव्हिल लाईन, वाशिम येथे 'आरक्षण बचाव बैठक' आयोजित करण्यात आली होती. बैठकीत उपस्थितांनी उपवर्गीकरणाला तीव्र विरोध नोंदवत आरक्षण वाचविण्यासाठी एकजुटीची हाक दिली. बैठकीत वक्त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, 'आरक्षण हा दयेचा विषय नसून शतकानुशतके झालेल्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक अन्यायाची घटनात्मक भरपाई आहे. त्यामुळे आरक्षणात कोणत्याही प्रकारचे विभाजन अथवा उपवर्गीकरण स्वीकारले जाणार नाही.' आरक्षणामुळे समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली असून, त्यात विभागणी केल्यास आरक्षण व्यवस्थेचा मूळ उद्देशच धोक्यात येईल, अशी भूमिका उपस्थितांनी मांडली. यावेळी वक्त्यांनी समाज बांधवांना इशारा देत सांगितले की, आज उपवर्गीकरणाच्या नावाखाली समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असून, उद्या याच माध्यमातून संपूर्ण आरक्षण व्यवस्थेलाच कमकुवत करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी मतभेद बाजूला ठेवून संविधानाने दिलेल्या हक्कांच्या संरक्षणासाठी एकत्र उभे राहणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. बैठकीत सर्वानुमते सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

## पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत

**मालेगाव :** मालेगाव तालुक्यात यंदा मान्सूनचे आगमन उशिरा झाले. पावसाने सुरुवातीला समाधानकारक हजेरी लावल्यानंतर शेतकऱ्यांनी गेल्या पंधरा दिवसांत सोयाबीन, तूर, उडीद, मूग आदी खरीप पिकांच्या पेरण्या मोठ्या प्रमाणात पूर्ण केल्या. मात्र मागील पाच दिवसांपासून पावसाने अचानक पाठ फिरवल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पेरणीनंतर वेळेवर पाऊस पडणे अत्यंत आवश्यक असते. सध्या उगवलेल्या कोवळ्या पिकांना तीव्र उन्हाचा तडाखा बसण्याची शक्यता निर्माण झाली असून, जमिनीतील ओल झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दररोज आकाशाकडे नजर लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या मनात आता एकच प्रश्न घोंगावत आहे.

## गुरुचरणी सेवाभावाची अनोखी आदरांजली; १२१ नेत्ररुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया



■ प्रतिनिधी | अकोट ■

गुरुवर्य श्री संत वासुदेव महाराज यांच्या पुण्यतिथी आणि श्री संत हरिराम बाप्पा यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक श्री संत हरिराम बाप्पा सत्संग सेवा समितीने समाजसेवेचा आदर्शवत उपक्रम राबवत १२१ गरजू नेत्ररुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करून गुरुचरणी अनोखी भावांजली अर्पण केली. गेल्या २५ वर्षांपासून समिती सातत्याने रुग्णसेवा, आरोग्य जनजागृती आणि गरजूंना वैद्यकीय मदत देण्याचे कार्य करत असून, यंदाचाही उपक्रम त्याच सेवाभावी परंपरेचा भाग ठरला.

'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' हा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवत समितीने नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरातून निवड करण्यात आलेल्या १२१ गरजू रुग्णांवर अकोला येथील शासकीय सर्वोपचार रुग्णालय आणि दमानिया आय हॉस्पिटलमध्ये पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. शस्त्रक्रियेसह औषधे, नाश्ता, आवश्यक प्रमाणपत्रे तसेच रुग्णांच्या भरतीपासून उपचारांपर्यंतची संपूर्ण व्यवस्था समितीने केली. या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांच्या आयुष्यात नव्या दृष्टीची पहाट उगवली असून, विशेषतः ग्रामीण व वंचित घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा समितीचा प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. या सेवाकार्यात शासकीय जिल्हा रुग्णालय आणि दमानिया आय हॉस्पिटलचेही मोलाचे सहकार्य लाभले.

सेवा उपक्रमात हरिषभाई शहा (लेबेन), उमेश कोठारी, श्याम आपोतीकर, नेत्रतज्ज्ञ डॉ. शुक्ला, डॉ. बी. गुरुदासानी, शांतीकुमार चौरसिया, अश्विन पोपट, सुभाष ठक्कर, ललितभाई पोपट तसेच सेवा समितीच्या सेवाधाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

**रुग्णांची आस्थेने विचारपूस; डॉक्टरांचा सत्कार**

शनिवार, ११ जुलै रोजी अकोला येथील शासकीय सर्वोपचार रुग्णालयात उपचार घेत असलेल्या नेत्ररुग्णांची समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी रुग्णांना आय ड्रॉप्स व फराळाचे वाटप करण्यात आले. रुग्णसेवेत उल्लेखनीय योगदानाबद्दल नेत्र विभाग प्रमुख डॉ. बी. गुरुदासानी आणि डॉ. निखिल यांचा समितीचे अध्यक्ष सुरेशभाई सेदाणी व सचिव बाबाभाई शेजपाल यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे विश्वस्त नंदकिशोर हिंगणकर, आसिफ खान, किर्ती ठक्कर पहेलवान तसेच अन्य सेवाभावी कार्यकर्ते उपस्थित होते.

समाजातील गरजूंच्या डोळ्यांत प्रकाश फुलविण्याचा आणि कोणताही बडेजाव न करता सेवेतून गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

### मोफत चष्मे, औषधांचे वितरण



■ प्रतिनिधी | पातूर ■

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. नलिनीताई राऊत आयुर्वेद रुग्णालय व अनुसंधान केंद्र, पातूर येथे मुख्यमंत्री सहायता कक्ष, मंत्रालय, मुंबई आणि रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. साजिद शेख यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी प्राचार्य डॉ. अभय भुस्कडे, वैद्यकीय अधीक्षिका डॉ. जयश्री काटोले, डॉ. आशिष केचे, डॉ. भोळे, डॉ. विक्रम चव्हाण, डॉ. लांडकर, डॉ. तोंचार, रुग्णालय अधीक्षक धनंजय मिश्रा, प्रशासकीय अधिकारी संतोष सोमानी, उपअधीक्षक डॉ. वसीम यांच्यासह वैद्यकीय शिक्षक, निवासी वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात परिसरातील नागरिकांची विविध आजारांवर आरोग्य तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी मोफत आरोग्य सल्ला व उपचार दिले. तसेच गरजू रुग्णांना महाविद्यालयाच्या वतीने मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले. आवश्यक औषधांचाही मोफत पुरवठा करण्यात आला. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. लाभार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत महाविद्यालय, रुग्णालय प्रशासन आणि मुख्यमंत्री सहायता कक्षाचे आभार मानले.

मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या जनकल्याणकारी उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना थेट आरोग्यसेवेचा लाभ मिळाल्याने समाजाभिमुख आरोग्यसेवेचा आदर्श निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.


**Change In Name**

My old name is
**SHAIKH ALTAMASH SHAIKH JAWED**
Which now I am changing as new name
**SHAIKH ALTAMASH SHAIKH JAVEED**
hence for my all correspondence will be done as per my new name please consider the same
Residential address:
NABI SAHAB MASJID KE PECHE, INAMDAR PURA WASHIM DIST WASHIM MAHARASHTRA 444505
Mobile no.9730379744

**Change In Name**

My old name is
**YASMEEN PARVEEN MOHAMMAD SAJID KHATIK**
Which now I am changing as new name
**YASMEEN PARVEEN SHAIKH SAJID**
hence for my all correspondence will be done as per my new name please consider the same
Residential address:
KHATIK PURA WASHIM DIST WASHIM MAHARASHTRA 444505
Mobile no.9325313245


## कामरगाव अप्पर तहसील कार्यालयाच्या मागणीसाठी ५२ गावांची एकजूट; नागरिकांचा एल्गार

### तहसीलदारामार्फत जिल्हाधिका-यांना निवेदन सादर

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कामरगाव येथे अप्पर तहसील कार्यालय तातडीने सुरू करण्यात यावे, या दीर्घकालीन आणि जनहिताच्या मागणीसाठी परिसरातील ५२ गावांतील नागरिक सोमवारी एकवटले. कामरगाव तालुका कृती समितीच्या नेतृत्वाखाली तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकारी, वाशिम यांना निवेदन सादर करण्यात आले. या मागणीला शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, महिला, सामाजिक संस्था तसेच सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचा व्यापक पाठिंबा लाभल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

कामरगाव हे परिसरातील अनेक गावांचे प्रमुख व्यापारी, शैक्षणिक आणि प्रशासकीय केंद्र म्हणून ओळखले जाते. मात्र महसूल विभागाशी संबंधित विविध कामांसाठी नागरिकांना ३० ते ५० किलोमीटर अंतर पार करून कारंजा तहसील कार्यालयात जावे लागते. यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असून शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्र, वारस नोंद, फेरफार, जमीन महसूल, ई-पीक नोंदणी, नैसर्गिक आपत्ती पंचनामे तसेच विविध शासकीय योजनांच्या प्रस्तावांसाठी नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागतात. अनेकदा एका कामासाठी दोन ते तीन वेळा तहसील कार्यालयात जावे लागत असल्याने नागरिकांवर आर्थिक व मानसिक ताण वाढत असल्याची खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली.

कामरगाव परिसरात मोठी लोकसंख्या असून अनेक महसुली गावे या केंद्राशी जोडलेली आहेत. भविष्यातील प्रशासकीय गरजा आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता येथे अप्पर तहसील कार्यालय स्थापन करणे ही काळाची गरज असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास शासनाच्या सेवा नागरिकांच्या दारात पोहोचतील, महसुली कामांचा वेग वाढेल, कारंजा तहसील कार्यालयावरील ताण कमी होईल आणि शासनाच्या 'प्रशासन आपल्या दारी' या संकल्पनेला अधिक बळ मिळेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

कामरगाव येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून सातत्याने होत असून शासनाने या जनभावनेचा आदर करून आवश्यक प्रस्तावास तातडीने मंजुरी द्यावी व सकारात्मक निर्णयासाठी विशेष पाठपुरावा करावा, अशी मागणी कृती समितीने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

यावेळी कामरगाव तालुका कृती समितीचे पदाधिकारी, विविध गावांचे ग्रामस्थ, शेतकरी, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २२७ ■ मंगळवार १४ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# शिक्षकांशिवाय शिक्षण नकोच सोनेगावात शाळेलाच ठोकले कुलूप

## आठ दिवसांत चार शिक्षक देण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

**देवळी जनमाध्यम-** सोनेगाव बाई येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या तीव्र टंचाईविरोधात सोमवारी विद्यार्थी आणि पालकांनी संतापाचा स्फोट करत थेट शाळेलाच कुलूप ठोकले. दर्जेदार शिक्षण हा विद्यार्थ्यांचा मूलभूत हक्क असून तो हिरावून घेणाऱ्या शिक्षण व्यवस्थेविरोधात संतप्त ग्रामस्थांनी शाळेसमोर ठिय्या आंदोलन छेडत कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती होईपर्यंत माघार घेणार नसल्याचा इशारा दिला. नगराध्यक्ष किरण ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाने शिक्षण विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले.

सोनेगाव बाई येथील शाळेत पहिली ते सातवीपर्यंत सुमारे ७५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र या विद्यार्थ्यांसाठी केवळ दोनच शिक्षक कार्यरत आहेत. त्यातील एका शिक्षकाची बीएलओ म्हणून नियुक्ती झाल्याने प्रत्यक्षात संपूर्ण शाळेची जबाबदारी एका शिक्षकावर येऊन पडली आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शासन विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी तातडीने चार कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी अशी ठाम मागणी करत आंदोलनकर्त्यांनी शाळेच्या प्रवेशद्वाराला कुलूप ठोकले. शाळेसमोरच ठिय्या आंदोलन करत शिक्षण विभागाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. शिक्षक मिळाल्याशिवाय



कुलूप उघडणार नाही असा निर्धार विद्यार्थी आणि पालकांनी व्यक्त केला.

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन विस्तार अधिकारी पारडे घटनास्थळी दाखल झाले. संतप्त पालक आणि ग्रामस्थांशी चर्चा केल्यानंतर वरिष्ठांशी बोलून आठ दिवसांच्या आत चार शिक्षक उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यापैकी दोन शिक्षक तत्काळ रुजू होतील तर उर्वरित शिक्षकही आठ दिवसांत नियुक्त केले जातील असे स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी तात्पुरती माघार घेत शाळेचे कुलूप उघडले. मात्र आश्वासनाची अंमलबजावणी न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

पोलिसांची धाव अन् तणावानंतर तोडगा

आंदोलनाची माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक जाधव सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलनकर्त्यांना संयम बाळगण्याचे आवाहन केले. प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर विस्तार अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्याने वातावरण निवळले आणि आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

आंदोलनात आयशा वाघमारे, नीरज कोंबे, नितीन फुके, दुर्योधन वैद्य, वैशाली काचोळे, अरुणा शेंद्रे, प्रियंका आडकिने, संदीप बेंडे, नारायण राऊत, शरद कांबळे, मोरेश्वर वानखेडे, सुभाष व्यवहारे, भूपेंद्र होरे, संतोष भोयर, विपुल रघाटाटे, प्रवीण कात्रे, प्रवीण खाडे, भरत फटिंग यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि पालक सहभागी झाले.

# रामभक्तांच्या श्रद्धेचा हिशेब द्या काँग्रेसचा भजन सत्याग्रह

## अयोध्या राम मंदिर देणगी निधी अपहाराच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करा दोषींवर कठोर कारवाईची मागणी



**वर्धा जनमाध्यम** अयोध्या येथील श्रीराम मंदिराच्या देणगी निधीत कथित अपहार झाल्याच्या आरोपांवरून वर्ध्यात सोमवारी काँग्रेसने धार्मिक आणि गांधीवादी पद्धतीने आक्रमक सत्याग्रह छेडला. भजन कीर्तनाच्या माध्यमातून रामभक्तांच्या श्रद्धेचा प्रश्न उपस्थित करत संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने हा सत्याग्रह पार पडला. आंदोलनाची सुरुवात केसरीमल कन्या विद्यालय परिसरातील काळा मारुती मंदिरात सामूहिक भजनाने झाली. रघुपती राघव राजा राम आणि वैष्णव जन तो तेणे कहिये या भजनांच्या सुरावटीत कार्यकर्त्यांनी महात्मा गांधी यांच्या सत्याग्रहाच्या विचारांना उजाळा दिला. त्यानंतर काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी वर्धा शहर पोलिस ठाणे गाठून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी भगवान श्रीराम हे सत्य न्याय मर्यादा आणि लोकविश्वासाचे प्रतीक असल्याचे सांगत देशभरातील कोट्यवधी रामभक्तांनी श्रद्धेने दिलेल्या देणगीचा प्रत्येक पैशाचा पारदर्शक हिशेब जनतेसमोर ठेवला गेला पाहिजे अशी ठाम भूमिका मांडली. श्रद्धेच्या नावावर कोणताही गैरव्यवहार सहन केला जाणार नाही असा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे शहराध्यक्ष तथा नगराध्यक्ष सुधीर पांगुळ डॉ अभ्युदय मेघे बाळकृष्ण माऊस्कर आणि राजेश शर्मा, इक्राम हुसेन, यांनी केले. सत्याग्रहात काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## स्मार्ट मीटरमध्ये कॅमेरा असल्याचा खोटा आरोप ; ग्राहक प्रतिनिधी व यूट्यूब संपादकावर गुन्हा

**मुंबई जनमाध्यम** : महावितरणच्या स्मार्ट मीटरमध्ये कॅमेरा असल्याचा खोटा आरोप करून सोशल मीडियावर दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्याप्रकरणी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्राहक संघटनेचे नंदन मेघश्याम वेंगुर्लेकर आणि कोकणसाद यूट्यूब न्यूज चॅनेलचे संपादक सागर चव्हाण यांच्याविरुद्ध सावंतवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेअंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, स्मार्ट मीटरमध्ये कॅमेरा असल्याचा दावा पूर्णपणे खोटा असून अशा अफवांमुळे नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण होत आहे. या प्रकरणात जनतेत भीती निर्माण करणे, गुन्ह्यास चिथावणी देणे, शांततेचा भंग करण्यासाठी अपमान करणे आणि बदनामी करणे आदी आरोपांखाली भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५३(१)(बी), ३५१(३), ३५२ व ३५६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सावंतवाडी पोलीस करीत आहेत.

# धनोडी (नांदपूर) प्राथमिक शाळेचा स्लॅब कोसळला बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**आर्वी जनमाध्यम** : आर्वी तालुक्यातील धनोडी (नांदपूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्गखोलीचा स्लॅब ११ जुलैच्या रात्री कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने घटना रात्री घडल्याने आणि शाळा बंद असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून नवीन शाळा इमारत तातडीने उभारावी, अशी मागणी ग्रामस्थ अरविंद लिल्लोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भातील निवेदन उपविभागीय अधिकारी, आर्वी यांच्या मार्फत सोमवारी मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शाळेची



इमारत धोकादायक झाल्याची माहिती तब्बल वर्षभरापूर्वी मुख्याध्यापिका रेखा हिवाळे आणि ग्रामपंचायत सरपंच कोमल सागर कोल्हे यांनी पंचायत समिती, आर्वी आणि जिल्हा परिषद, वर्धा यांना पत्राद्वारे दिली होती. जुनी इमारत पाडून नवीन इमारत उभारण्याची विनंतीही करण्यात आली होती. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. धनोडी (नांदपूर) येथील शाळेत एकच वर्गखोली असून इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. दोन शिक्षिका कार्यरत असून इमारत असुरक्षित असल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या केवळ २४ वर आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेच्या इमारतीची दुरवस्था लक्षात घेता संबंधित बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व सुसज्ज नवीन शाळा इमारत तातडीने मंजूर करून बांधण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुरक्षित शिक्षणाचे वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही अरविंद लिल्लोरे यांनी व्यक्त केली आहे.

# ट्रॅक्टर बॅटरी चोर जेरबंद ७१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

***हिंगणघाट जनमाध्यम-*** शहरात ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या चोरून दहशत माजविणाऱ्या चोरट्याला स्थानिक पोलिसांनी अखेर जेरबंद केले.

गोपनीय माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत आरोपीकडून चोरीच्या तीन बॅटऱ्या आणि एक दुचाकी असा एकूण ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अंकीत मोगरे रा. स्विपर कॉलनी हिंगणघाट असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

संत तुकडोजी वॉर्ड येथील इंद्रजीत शाहू यांच्या घरासमोर उभ्या असलेल्या ट्रॅक्टरची बॅटरी




तसेच त्याच परिसरातील जगदीश कांबळे आणि सतीश वरटकर यांच्या ट्रॅक्टरमधील बॅटऱ्याही अज्ञात चोरट्याने लंपास केल्या होत्या. या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल होताच पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अंकीत मोगरे याला ताब्यात घेतले. कसून चौकशीत त्याने चोरीची कबुली दिली. त्यानंतर त्याच्या ताब्यातून चोरीच्या तीन बॅटऱ्या आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी असा एकूण ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अनिल राऊत, सहाय्यक पोलिस निरीक्षक अतुल स्थूल तसेच प्रशांत ठोंबरे, राजेश शेंडे, आशिष नेवारे, मंगेश वाघमारे आणि रोहित साठे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## पैशांसाठी विवाहितेचा छळ;

# गणेशपूरातील नववधूला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह आठ जणांवर गुन्हा

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील गणेशपूर (देलोडी) येथे विवाहितेच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी धक्कादायक माहिती समोर आली आहे. लग्नानंतर सतत मानसिक व शारीरिक छळ, पाच लाख रुपयांची मागणी, मारहाण, जबरदस्तीने गर्भपात आणि सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या अमानुष वागणुकीला कंटाळून २१ वर्षीय रोशनी विनोद मोहिते हिने गळफास घेतल्याचा आरोप तिच्या माहेरच्या नातेवाईकांनी केला आहे. या प्रकरणी सिंदी रेल्वे पोलिसांनी पतीसह आठ जणांविरुद्ध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी सुभाष श्रवण जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, रोशनीचे लग्न २७ मार्च २०२४ रोजी विनोद मोहिते याच्यासोबत झाले होते. लग्नानंतर काही महिने सर्व काही सुरळीत होते. मात्र त्यानंतर पतीचे दुसऱ्या युवतीशी प्रेमसंबंध असल्याने त्याने रोशनीला 'तू मला आवडत नाहीस, मला सोडून जा' असे म्हणत सातत्याने मानसिक त्रास दिला. त्याचबरोबर दुचाकी घेण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केली जात होती. पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकीही देण्यात येत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, रोशनीला आजारी असतानाही उपचारासाठी दवाखान्यात नेले जात नव्हते. तिच्या दैनंदिन गरजांकडेही दुर्लक्ष करण्यात आले. चार महिन्यांपूर्वी तिचा जबरदस्तीने गर्भपात घडवून आणल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. पती नोकरीवर बाहेर असताना रोशनीला सासू, सासरे, दीर आणि इतर नातेवाईक शेतातील कामे करण्यास भाग पाडत होते. तिच्यावर घरातील सर्व कामांचा भार टाकून सतत अपमानित केले जात असल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

## दारू कारवाईला गेलेल्या पोलिसांवर प्राणघातक हल्ला

**वर्धा जनमाध्यम** दारूबंदी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी गेलेल्या पोलिस पथकावरच प्राणघातक हल्ला झाल्याने वर्धा जिल्हा हादरला आहे.

पुलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वायफड येथील पारधी बेड्यावर गावठी दारूविरोधातील कारवाईदरम्यान संतप्त जमावाने पोलिसांवर दगडफेक, लाकडांनी मारहाण आणि धारदार शस्त्रांनी हल्ला केला. या थरारक प्रकारात तीन पोलिस कर्मचारी जखमी झाले, तर पुलगावचे पोलिस निरीक्षक ढाकणे यांच्यावर सत्तूर फेकण्यात आला. मात्र त्यांनी प्रसंगावधान राखल्याने मोठी दुर्घटना टळली.

११ जुलै रोजी उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक मल्हारी ताळीकोटे, पोलिस उपनिरीक्षक मधुकर सामलवार तसेच अन्य कर्मचारी वायफड येथे दारूविरोधी कारवाईसाठी गेले होते. यावेळी गावठी दारूची वाहतूक करणाऱ्या अंजित आणि त्याच्या पत्नीला दुचाकीसह ताब्यात घेण्यात आले. पंचनामा सुरू असतानाच महिलेने मोबाईलवरून साथीदारांना बोलावले. काही क्षणांतच ३० ते ४० जणांचा जमाव घटनास्थळी धडकला. गोंधळाचा फायदा घेत दोन्ही आरोपी पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक ढाकणे अतिरिक्त फौजफाट्यासह घटनास्थळी पोहोचले. आरोपींचा शोध सुरू असताना ५० ते ६० जणांच्या जमावाने पोलिसांवर हल्ला चढविला.

दगडफेक, लाकडांनी मारहाण आणि धारदार शस्त्रांचा वापर करण्यात आला. या हल्ल्यात मल्हारी ताळीकोटे, मधुकर सामलवार आणि सोनी नगराळे जखमी झाले.

या प्रकरणी सुमारे ६० महिला व पुरुषांविरुद्ध पुलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात दंगल नियंत्रण पथक तैनात करण्यात आले आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.

# जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविणे बंद करा

## पालिकेच्या विरोधी नगरसेवकांनी दिले महावितरणला निवेदन

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** महावितरणने जबरदस्तीने शहरात स्मार्ट मीटर बसविणे तत्काळ बंद करावे आणि घरी नसतांना लावलेली अव्वाच्या सव्वा बील येणारी स्मार्ट मीटर काढुन जुनेच मीटर लावुन द्यावेत या प्रमुख मागणीसाठी सिंदी नगरपालीकेतील विरोधी नगरसेवकांच्या नेतृत्वात सोमवारी (ता.१३)ला नागरिकांनी महावितरणला निवेदन दिले.

बसविण्यात आलेले स्मार्ट मीटर काढून पूर्वीप्रमाणे जुने वीज मीटर बसवावेत, वीज ग्राहकांसाठी स्वतंत्र तक्रार केंद्र व विशेष तक्रार निवारण चमू स्थापन करावा, वीजेचे प्रति युनिट दर कमी करावेत तसेच मीटर, डेटा आणि बिलिंग प्रक्रियेत संपूर्ण पारदर्शकता ठेवावी, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.

सिंदी रेल्वे नगरपालीका क्षेत्रातील हजारो वीज ग्राहकांना वारंवार वीज खंडित होणे, कमी-जास्त दाबाचा वीजपुरवठा, चुकीची वीजबिले, जळालेले ट्रान्सफॉर्मर, नवीन वीज जोडणीतील विलंब, तुटलेल्या तारा, खांबांची दुरवस्था अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या सर्व तक्रारींचे जलद आणि प्रभावी निवारण व्हावे यासाठी स्वतंत्र वीज ग्राहक तक्रार केंद्र स्थापन करून अभियंते, तांत्रिक कर्मचारी आणि ग्राहक सेवा प्रतिनिधींचा विशेष तक्रार निवारण चमू नियुक्त करण्याची मागणी करण्यात आली. या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास तसेच

जनतेची लुट करणारा कोणताही निर्णय सिंदी नगर परिषद क्षेत्रातील नागरिक कदापि सहन करणार नाही. सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कासाठी आम्ही रस्त्यावर उतरून संघर्ष करण्यास तयार आहोत. त्यामुळे प्रशासनाने वेळेत निर्णय घेऊन जनतेच्या भावना लक्षात घ्याव्यात, अन्यथा उसणाळ्या जनआक्रोशाला प्रशासन जबाबदार राहील असा



निवेदणातुन गर्भरीत इशारा देण्यात आला.निवेदन देतेवेळी सिंदी रेल्वे नगरपालिकेचे विरोधी नगरसेवक गंगाधर कलोडे,गटनेता अजय कलोडे, आशिष देवतळे, सुरज कोपरकर, जगदीश बोरकर, तुषार हिंगणेकर, वर्षा बोंबले, दुर्गा बेलखोडे, ज्योत्सना तडस, जयश्री मडावी, मोहन सुरकार,खुशाल बोरकर,अजय कुंभारे,शुभम महाजन बंटी बेलखोडे आदीची तसेच शहरातील वीज ग्राहकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती


## जाहिर नोटीस

**प्रोसेस क - ४६/२/२०२६**
**एम.जे.सी.कं. ९७/२०२६,**
**नंदिनी विजय उके व ३ वि. निरंक,**
**पेशी ता. ०१/०८/२०२६**

वर्धा येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात, एम.जे.सी.कं. ९७/२०२६, नंदिनी विजय उके व ३ वि. निरंक, पेशी ता. ०१/०८/२०२६, सदरहू केसमध्ये विजय आत्माराम उके हे मयत असुन त्यांचा मृत्यू दि. १२/०४/२०२२ रोजी झालेला आहे. अर्जदार कं ०१. नंदिनी विजय उके, ०२. पवन विजय उके, ०३. राहूल विजय उके व ०४. मिनाक्षी विशाल महाजन हे मयत यांचे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदार यांनी मयत विजय आत्माराम उके यांचा मृत्यू पश्चात या न्यायालयात मुंबई रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अंतर्गत क्लॉज ०३ नुसार वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

सदरहू केसमध्ये कोणासही काही आपत्ती असल्यास अथवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महीन्याचे आत ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहु कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यास कायदेशीर वारसहक्क कायद्या अन्वये प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारिख१३/०७/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले

**आदेशावये**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
वर्धा दि. १३/०७/२०२६



## जाहिर नोटीस

**प्रोसेस क-४६/०/२०२६**
**एम.जे.सी.कं. १०६/२०२६,**
**नंदकुमार सत्यनारायनजी अग्रवाल व १ वि. निरंक,**
**पेशी ता. ३१/०७/२०२६,**

वर्धा येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात, एम.जे.सी.कं. १०६/२०२६, नंदकुमार सत्यनारायनजी अग्रवाल व १ वि. निरंक, पेशी ता. ३१/०७/२०२६, सदरहु केसमध्ये सीता सत्यनारायन देंगला हे मयत असुन त्यांचा मृत्यू दि. ०५/०६/२०१० रोजी झालेला आहे. अर्जदार कं ०१. नंदकुमार सत्यनारायनजी अग्रावाल व ०२. गीता सत्यनारायणजी अग्रवाल हे मयत यांचे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदार यांनी मयत सीता सत्यनारायन देंगला यांचा मृत्यू पश्चात या न्यायालयात मुंबई रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अंतर्गत क्लॉज ०३ नुसार

वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. सदरहू केसमध्ये कोणासही काही आपत्ती असल्यास अथवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महीन्याचे आत ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यास कायदेशीर वारसहक्क कायद्या अन्वये प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारिख १३/०७/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले.

**आदेशान्वये**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
वर्धा दि.१३/०७/२०२६

# भरधाव ट्रकने वारक-यांना चिरडले, ३ ठार

**पुणे /प्रतिनिधी-** पुणे जिल्ह्यातील जेजुरी परिसरात वारक-यांना घेउन जाणा-या वाहनाचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेत तीन महिला वारक-यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. हा भीषण अपघात सोमवारी सकाळी सासवड-जेजुरी मार्गावरील बेलसर टोल नाक्याजवळ शिपदीप लाजिंगसमोर घडला. या प्रकरणी स्थानिक पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात नांदेड जिल्ह्यातील लोहा येथील रंगनाथ महाराज पोखरबिसीकर दिंडीचा ट्रक आणि सांगली जिल्ह्यातील कसबे डिग्रज येथील दिंडीतील महिला वारकरी यांच्यात झाला. या अपघातात सात महिला वारकरी ट्रकखाली चिडरल्या गेल्या. यातील तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला. तर, चार महिला गंभीर जखमी झाल्या आहे. जखमींना जेजुरी येथील आयसीयू रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासनातील अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस तपास सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे वारकरी संप्रदायात हळहळ व्यक्त केली जात असून मृत महिला वारक-यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.






# मृत वारक-यांच्या वारसांना पाच लाखांची मदत

## जखमींवर मोफत उपचार,पवारांचे निर्देश

**मुंबई, १३ जुलै (हिं.स.)** - संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यादरम्यान आज सकाळी सासवड जेजुरी मार्गावरील जेजुरी-बेलसर परिसरात झालेल्या अपघातात



तीन वारक-यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर काही वारकरी जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी तातडीने जेजुरी ग्रामीण रुग्णालयाला भेट देउन जखमी वारक-यांची विचारपूस केली.यावेळी त्यांनी उपचाराधीन वारक-यांच्या प्रकृतीची माहिती वैद्यकीय अधिका-यांकडून घेतली तसेच जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित प्रशासनाला दिल्या. अपघातात मृत्यू झालेल्या वारक-यांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार असून जखमी वारक-यांवर शासनाच्या वतीने मोफत उपचार करण्यात येतील. तसेच आवश्यकतेनुसार आर्थिक मदतही उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.यावेळी जेजुरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष जयदीप दिलीप बारभाई, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ, श्री. भावार्थ देखणे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या की, जखमी वारक-यांच्या उपचारामध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासन अपघातग्रस्त वारकरी व त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे.आषाढी वारीच्या पूर्वतयारीचा नियमित आढावा घेउन वारी मार्गावरील आवश्यक कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. पंढरपूरच्या दिशेने पायी निघालेल्या वारक-यांची सुरक्षितता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून वाहनचालकांनी अत्यंत सावधगिरीने वाहन चालवून वारक-यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहनही उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

# वारक-यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

## यंत्रणांना अधिक दक्षतेच्या उपमुख्यमंत्री शिंदेंच्या सूचना

**मुंबई, १३ जुलै (हिं.स.)** - विठुरायाच्या दर्शनासाठी भागवतधर्माची पताका खांद्यावर घेउन पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या वारक-यांच्या वाहनाला पुणे जिल्ह्यातील जेजुरी परिसरात झालेल्या भीषण अपघाताबद्दल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या दुर्घटनेत तीन महिला वारक-यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून काही वारकरी गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.



या घटनेनंतर जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू करण्यात आले आहेत. प्रशासनाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे तसेच जखमींना आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले. त्यासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेची गंभीर दखल घेतली असून मृतांच्या कुटुंबियांना पाच लाखांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

तसेच या घटनेत जखमी झालेल्या वारक-यांवर शासकीय खर्चाने उपचार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले आहे. वारी ही महाराष्ट्राच्या संतपरंपरेचे श्रद्धास्थान असून लाखो भाविक या सोहळ्यात सहभागी होतात. त्यामुळे वारक-यांच्या सुरक्षिततेला राज्य सरकार सर्वोच्च प्राधान्य देत असून संपूर्ण वारी मार्गावर सुरक्षा, वाहतूक व्यवस्थापन आणि आपत्कालीन यंत्रणा अधिक प्रभावीपणे कार्यरत ठेवण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

या दुःखद दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या वारक-यांना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी असल्याची भावना व्यक्त करत, दिवंगत आत्म्यांना सद्गती लाभो आणि जखमी वारकरी लवकरात लवकर पूर्णपणे बरे व्हावेत, अशी प्रार्थना त्यांनी श्री विठ्ठलाच्या चरणी केली आहे.


# 'हनिमून कोच'नंतर आता धावत्या ट्रेनमध्ये रुद्राभिषेक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सोशल मीडियावर सध्या रेल्वेच्या एका सलून कोचचा व्हिडीओ जोरदार व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये ट्रेनच्या आत पूर्ण विधीवत रुद्राभिषेक आणि पूजा-अर्चा केल्याचे दिसत आहे. हनिमूनसाठी कोच सजवल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आता या व्हिडीओची चर्चा रंगली आहे. धावत्या ट्रेनमध्ये धार्मिक विधी करता येउ शकतात का? रेल्वेने याची परवानगी दिली होती की हे नियमांचे उल्लंघन आहे? असे प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत.

वाद वाढल्यानंतर रेल्वेने यावर स्पष्टीकरण दिले आहे. रेल्वेने स्पष्ट केले की, व्हायरल झालेला व्हिडीओ कोणत्याही सामान्य प्रवासी डब्याचा नसून व्यावसायिक दृष्टिकोनातून बुक केलेल्या एका विशेष सॅलून कोचचा आहे. संबंधित पक्षाने हा कोच आयआरसीटीसी च्या माध्यमातून तब्बल ३.०८ लाख रुपयांचे पेमेंट करून रीतसर बुक केला होता. रेल्वेने हे देखील सांगितले की, या संपूर्ण घटनेत सुरक्षेशी कोणतीही तडजोड करण्यात आलेली नाही आणि कोणत्याही प्रवाशाचं नुकसान झालेलं नाही.

व्हायरल व्हिडिओमध्ये एक पुजारी विशेष



पूजा आणि रुद्राभिषेक करताना दिसत आहेत. कोचच्या आत धार्मिक विधीची संपूर्ण व्यवस्था केल्याचे दिसून येत आहे. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर लोकांनी प्रश्न विचारण्यास सुरुवात केली की, रेल्वेने ट्रेनच्या आत अशा प्रकारच्या धार्मिक आयोजनाची परवानगी दिली आहे का? काही लोकांनी याकडे आस्थेच्या नजरेतून पाहिलं, तर काहींनी रेल्वेच्या नियमांवर आणि सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले. वाद वाढल्यानंतर रेल्वेने या संपूर्ण प्रकरणावर आपली बाजू जाहीर केली.

**बुक केलेले सलून-**रेल्वेने स्पष्ट केलं की, व्हिडिओमध्ये दिसणारा कोच कोणताही सामान्य कोच नव्हता. हा एक विशेष सलून कोच होता, जो ८ जुलै २०२६ रोजी आयआरसीटीसीच्या माध्यमातून व्यावसायिक तत्त्वावर बुक करण्यात आला होता. या बुकिंगसाठी ३,०८,५८० रुपयांचं ?डव्हान्स पेमेंट केलं होतं. सर्व औपचारिकता पूर्ण केल्यानंतरच हा सलून कोच उपलब्ध करून देण्यात आला होता. हा सलून कोच १० जुलै २०२६ रोजी ट्रेन क्रमांक १२९२६पश्चिम एक्सप्रेसला जोडला जाणार होता.

**रेल्वेने सुरक्षेवर दिला भर-** रेल्वेने आपल्या निवेदनात स्पष्ट केलं की, प्रवाशांची सुरक्षा, संरक्षण, वेळ आणि सोयी-सुविधा सुनिश्चित करणं ही त्यांची पहिली प्राथमिकता आहे. कोणत्याही व्यावसायिक बुकिंगनंतरही सुरक्षा मानकांशी कोणतीही तडजोड केली जात नाही. निवेदनात हेही स्पष्ट करण्यात आलं की, व्हायरल व्हिडिओमध्ये दिसणारा रुद्राभिषेक संबंधित पक्षाने बुक केलेल्या सलून कोचच्या आतच करण्यात आला होता आणि या संपूर्ण घटनेत कोणत्याही व्यक्तीला दुखापत झालेली नाही.

# सियापेक्षा क्रुर निघाली सुनिता, पतीचे केले ३ तुकडे

**नवी मुंबई / प्रतिनिधी-** ऐरोलीत एका महिलेने आपल्या प्रियकराच्या मदतीने पतीची निर्घृण हत्या केली. तिने पतीचे तीन तुकडे करत विविध ठिकाणी फेकून दिले होते. तिने तब्बल अकरा महिने हा खून पचवला होता. मात्र आता अखेर तिचे बिंग फुटले आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी महिलेसह तिच्या प्रियकराला बेड्या ठोकल्या आहेत.

मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रासह संपूर्ण देशात केतन अग्रवाल खून प्रकरण गाजत आहे. अशातच केतनची होणारी पत्नी सिया गोयलने आपला प्रियकर चेतन चौधरीशी संगनमत करून केतनला लोहगडावरून धक्का देउन मारल्याचे तपासातून समोर आले आहे. हे प्रकरण ताजे असताना आता नवी मुंबईच्या ऐरोली परिसरातून धक्कादायक मर्डर मिस्ट्री समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मयत बलीराम कुशवाह हे ऐरोलीच्या यादव नगर परिसरात आपली पत्नी आणि दोन मुलांसह राहत होते. दरम्यान, सुनिता हिचे घणसोली येथे राहणारा रिक्षाचालक राहुल प्रजापती याच्याशी अनैतिक संबंध जुळले होते. या संबंधांची माहिती बलीराम यांना मिळाल्यानंतर त्यांनी त्याला तीव्र विरोध केला. त्यामुळे पतीला कायमचा मार्गातून



दूर करण्याचा कट सुनिता आणि राहुल यांनी रचला होता. हा कट यशस्वी करण्यासाठी सुनिताने आधी दोन्ही मुलांना दोन दिवसांसाठी मावशीकडे पाठवले.

त्यानंतर ९ ऑगस्ट २०२५ च्या रात्री बलीराम गाढ झोपेत असताना सुनिता आणि राहुल यांनी प्रथम त्यांचा गळा आवळला. त्यानंतर धारदार चाकूने गळ्यावर वार करून त्यांची हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. हत्येनंतर पुरावे नष्ट करण्यासाठी आरोपींनी घरातच बलीरामच्या मृतदेहाचे तीन तुकडे केले. त्यांनी मुंडके, धड आणि पाय कापून तिन्ही तुकडे वेगवेगळ्या गोण्या आणि चादरीत गुंडाळून राहुलच्या रिक्षातून रात्रीच्या अंधारात गवळी देव परिसरातील दाट झाडीमध्ये तीन वेगवेगळ्या ठिकाणी फेकून दिले.हत्येनंतर सुनिताने यादव नगरमधील आपले घर भाड्याने देउन मुलांसह राहुलसोबत घणसोली येथे वास्तव्यास सुरुवात केली. जवळपास आठ महिन्यांनंतर बलीराम यांचा भाउ गावाहून आल्यानंतर त्याने भावाबाबत चौकशी केली. तेव्हा सुनिताने भांडण करून घर सोडून गेला, असं सांगून वेळ मारून नेली. मात्र संशय वाढल्याने त्यांनी एप्रिल २०२६ मध्ये रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात बलीराम बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला असता सुनिता व तिच्या प्रियकरानेबलीराम कुशवाह यांचा खून केल्याचे उघडकीस आले आहे. सुनिता कुशवाह (४०) आणि तिचा प्रियकर राहुल दशरथ प्रजापती (३०) असं अटक केलेल्या आरोपींची नावं आहेत. तर बलीराम सूर्यनाथ कुशवाह (५०) असं हत्या झालेल्या व्यक्तीचं नाव आहे.

# 'लाडकी बहीण' योजनेतून 92 लाख महिला अपात्र

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत मोठ्या प्रमाणावर लाभार्थ्यांची छाटणी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. ताज्या आकडेवारीनुसार आतापर्यंत ९२ लाख महिलांची नावे योजनेतून वगळण्यात आली आहेत. काही दिवसांपूर्वी ही संख्या सुमारे ८० लाख आसपास होती.

केवळ तांत्रिक त्रुटीच नव्हे, तर सरकारच्या निकषांमध्ये न बसणा-या लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने यादीतून बाहेर काढण्यात आले आहे. राज्य सरकारने ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी जवळपास आठ महिन्यांची मुदत दिली होती.मात्र, वेळेत ही प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे सर्वाधिक म्हणजेच ५० ते ५५ लाख महिला या योजनेतून थेट बाद झाल्या आहेत. योजनेच्या नियमानुसार अडीच लाखांपेक्षा कमी कौटुंबिक उत्पन्न असणे आवश्यक होते. मात्र, तपासणीत तब्बल १२ लाख महिला या प्राप्तिकर भरणा-या आणि उत्पन्नाची मर्यादा ओलांडणा-या असल्याचे उघड झाल्याने त्यांचे अर्ज फेटाळण्यात आले. या योजनेसाठी निर्धारित केलेली ६५ वर्षांची वयोमर्यादा ओलांडलेल्या ४.५ लाखांहून अधिक महिलांनाही वगळण्यात आले आहे.आधीपासूनच नमो शेतकरी योजनेचा आर्थिक लाभ घेत असलेल्या सुमारे ५ लाख महिलांना लाडकी बहीण योजनेच्या यादीतून कमी करण्यात आले आहे.



या छाटणी प्रक्रियेदरम्यान एक अत्यंत रंजक आणि धक्कादायक प्रकार समोर आला. या महिला सन्मान योजनेचा लाभ घेण्यासाठी चक्क १४ हजार पुरुषांनी अर्ज करून लाडकी बहीण बनण्याचा प्रयत्न केला होता. पडताळणीदरम्यान हा प्रकार उघडकीस आल्यानंतर या सर्व पुरुषांचे अर्ज तत्काळ रद्द करण्यात आले.

राज्याच्या महिला कल्याणावरील खर्चात अवघ्या वर्षभरात झालेली वाढ चक्रावून टाकणारी आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये हा खर्च केवळ २६१.७८ कोटी रुपये इतका होता. मात्र, २८ जून २०२४ रोजी लाडकी बहीण योजनेला मंजुरी मिळाल्यानंतर, २०२४-२५ या आर्थिक वर्षात हा खर्च थेट ३३,५१४.३६ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. याच अफाट वाढीवर कॅगने बोट ठेवले आहे.

**कॅगच्या अहवालाने अर्थव्यवस्थेवर ताण-** एकीकडे लाभार्थ्यांची छाटणी सुरू असतानाच, शुक्रवारी कॅगने प्रसिद्ध केलेल्या अहवालाने सरकारची चिंता वाढवली आहे. या योजनेवर होणा-या वारेमाप खर्चामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीवर मोठा ताण येउ शकतो, असा स्पष्ट इशारा कॅगने दिला आहे. तसेच, योजनेअंतर्गत झालेल्या ३,५४२ कोटी रुपयांच्या खर्चाचे ठोस समर्थन करता येत नसल्याचेही अहवालात नमूद आहे.

**बीड जिल्ह्याला छाटणीचा सर्वाधिक फटका-**अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांच्या यादीत बीड जिल्ह्याचा क्रमांक सर्वात वर आहे. संपूर्ण राज्यातून सर्वाधिक छाटणी याच जिल्ह्यात झाली असून, एकट्या बीडमधून तब्बल २८ लाख महिलांची नावे अपात्र ठरवून यादीतून वगळण्यात आली आहेत.

# कामगार कायद्यांमधील सुधारित बदलांनुसार व्यापक कामगार हिताला प्राधान्य द्यावे

**मुंबई /प्रतिनिधी-**कामगारांसंबंधी विविध कायद्यांमध्ये कामगार विभागाच्या माध्यमातून सुधारणा करण्यात येत आहेत. या सुधारणांमधून व्यापक 'कामगार हित' जपण्याला प्राधान्य



द्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी कामगार कायद्यांच्या सुधारणा सादरीकरण बैठकीत दिले. केंद्रीय कामगार कायद्यांना सुसंगत राज्याची नियमावली बनविताना राज्याच्या हितासाठी काही सुधारणा करणे आवश्यक असल्यास त्या करण्यात याव्यात, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. बैठकीस कामगार मंत्री ?ड. आकाश फुंडकर उपस्थित होते. तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे कामगार राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल यांनी बैठकीत सहभाग घेतला. कायद्यातील सुधारणा करण्यात येणारी प्रत्येक बाब तपासून पाहण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कामगार न्यायालयांऐवजी मुख्य न्याय दंडाधिकारी ही तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीच्या अनुषंगाने मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्याकडे कामगारांच्या संबंधित असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा जिल्हानिहाय अहवाल सादर करावा. मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्याकडे कामगारांच्या संबंधित प्रकरणांच्या निपटा-याचा दबाव येणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. केंद्राच्या नवीन कामगार कायद्यांमध्ये या बाबीची तपासणी करावी. याबाबत वस्तुस्थितीवर आधारित तरतुदीची पडताळणी करून निर्णय घ्यावा.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार कायद्यामध्ये सुधारणा करताना बांधकाम क्षेत्राशी संबंधित कामगार सदस्यत्वाचे दुहेरीकरण टाळण्यासाठी बांधकाम कामगार कल्याण मंडळ किंवा माथाडी मंडळांपैकी एका मंडळाच्या सदस्यत्वाची सुनिश्चिती करावी. असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी केंद्रीय नवीन कामगार कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने प्रत्येक घटकासाठी योजना तयार कराव्यात. त्यामध्ये घरेलू कामगारांचाही समावेश असावा. कामगार कायद्यांमध्ये सुधारणा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्यात यावा.

# राज्यातील धरणात अवघा ४३.७० टक्के साठा

**मुंबई /प्रतिनिधी-**मुंबई महानगरासह पुणे, नाशिक आणि रायगड पट्ट्यातील अतिवृष्टीने जलसाठ्यात किंचित वाढ झाली असली तरी राज्यातील बहुतांश भागात पावसाची प्रतीक्षा कायम आहे. त्यातच गेल्या वर्षीच्या तुलनेत राज्याच्या विविध भागातील पाणीसाठा कमीच आहे. रविवारी सकाळपर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु अशा एकूण ३ हजार २९ धरणांमध्ये ४३.७० टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून, गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा ५७.७३ टक्के होता. गेल्यावर्षीच्या तुलनेत ही घट १४ टक्के आहे.

राज्यातील मोठ्या प्रकल्पांचा विचार केला असता १३८ मोठ्या धरणांमध्ये ४७.२५ टक्के, मध्यम प्रकल्पांमध्ये ४१.७२ टक्के, तर लघु प्रकल्पांमध्ये २८.५९ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. कोकणातील मोठ्या धरणांमध्ये जवळपास ६० टक्के, मध्यम प्रकल्पांमध्ये ७२.५५ टक्के पाणीसाठा आहे. पुणे विभागातील मोठ्या धरणांमध्ये ५३.५९ टक्के साठा नोंदविण्यात आला आहे. मात्र मराठवाड्यातील अनेक मोठे आणि लघु



प्रकल्प अजूनही क्षमतेच्या निम्म्यापेक्षाही कमी भरले आहेत. राज्यातील प्रमुख धरणांमध्ये पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरण शंभर टक्के भरले असून, येडगाव, चासकमान, भामा आसखेड, वडज यांसारख्या धरणांतील साठाही लक्षणीय वाढला आहे. सातारा जिल्ह्यातील कोयना धरणात सुमारे ४८.८५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. हवामान विभागाने काही दिवसांच्या विश्रांतीनंतर राज्याच्या विविध भागांत पावसाची शक्यता वर्तविली आहे. या महिन्यात आणखी काही दिवस जोरदार सरी कोसळल्यास जुलैअखेरपर्यंत धरणांतील पाणीसाठ्यात वाढ होण्याची शक्यता आहे.

**मराठवाड्यावर जलसंकट-** मागील आठवड्यातील अतिवृष्टीने राज्यातील सहा महसुली विभागांपैकी केवळ कोकण विभागातील जलसाठा काहीसा दिलासादायक आहे. कोकण विभागात सर्वाधिक ६२.९९ टक्के पाणीसाठा असून पुणे विभागात ५०.८६ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे; तर अमरावतीत ४२.२३ टक्के, नाशिकमध्ये ४०.६३ टक्के आणि नागपूर विभागात ३९.८० टक्के साठा नोंदविण्यात आला आहे. मात्र, छत्रपती संभाजीनगर विभागात केवळ २४.८८ टक्के साठा असल्याने मराठवाड्यावरील जल संकटाची टांगती तलवार कायम आहे.

## पश्चिम बंगालमध्ये समुद्रात बेपत्ता झालेला ट्रालर सापडला

# ९ मच्छीमारांचे मृतदेह आढळले, सहा जणांचा शोध सुरू

**कोलकाता, १३ जुलै (हिं.स.)।** पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील बकखाली किना-याजवळ बेपत्ता झालेला 'मा काली' हा मासेमारीचा ट्रालर शोधण्यात आला आहे. ट्रालरमधून रविवारी उशिरा रात्री आणखी चार मच्छीमारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. यापूर्वी रविवारी पाच मृतदेह सापडले होते. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांची संख्या नउवर पोहोचली असून, सहा मच्छीमार अद्याप बेपत्ता आहेत. त्यांचा शोध सुरू आहे.प्रशासकीय अधिकारी आणि मच्छीमारांनी संपूर्ण रात्र ट्रालरच्या आत आणि परिसरात सघन शोधमोहीम राबवली. दुर्घटनेच्या वेळी काही मच्छीमार समुद्रातील उंच लाटांमध्ये वाहून गेले असावेत, अशी शक्यता व्यक्तकरण्यात येत आहे. या घटनेची माहिती मुख्यमंत्री यांना देण्यात आली असून, पुढील कारवाईबाबत विचार सुरू आहे.

रविवारी रात्री सुंदरबन विकास विभागाचे राज्यमंत्री दीपंकर जाना घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पाथरप्रतिमा येथील गोवर्धनपूर कोस्टल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सीतारामपूर घाटावर सुरू असलेल्या मदत आणि बचावकार्यावर संपूर्ण रात्र देखरेख ठेवली. यावेळी काकद्वीप उपविभागीय प्रशासन, सुंदरबन पोलीस, गोवर्धनपूर कोस्टल पोलीस ठाणे, वन विभाग तसेच मच्छीमार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.मिळालेल्या माहितीनुसार, दीघा येथील शंकरपूर बंदरातून २ जुलै रोजी 'मा काली' हा ट्रालर मासेमारीसाठी समुद्रात रवाना झाला होता. ५ जुलैनंतर ट्रालरशी संपर्क तुटला. त्यानंतर पोलीस, तटरक्षक दल, नौदल, वन विभाग आणि मच्छीमार संघटनांनी संयुक्तपणे शोधमोहीम सुरू केली.उल्लेखनीय म्हणजे, गेल्या रविवारी दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील बकखाली किना-यापासून सुमारे ३५ किलोमीटर अंतरावर चुलकाठी जंगलाजवळील बाघेरचर परिसरात हा ट्रालर उलटलेल्या अवस्थेत आढळला. संयुक्त शोधमोहीमेनंतर ट्रालरला सीतारामपूर घाटावर आणण्यात आले. तेथे तपासणीदरम्यान एकामागून एक नउ मच्छीमारांचे मृतदेह सापडले. सध्या बेपत्ता असलेल्या सहा मच्छीमारांचा शोध सुरू आहे.

# पबला भीषण आग; २७ जणांचा मृत्यू

**बँकॉक/वृत्तसंस्था :** थायलंडची राजधानी बँकाक येथे सोमवारी पहाटे एका पबमध्ये भीषण आग लागलंताची घटना घडली. या दुर्घटनेत किमान २७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत.अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, अग्निशमन दलाने सुमारे अर्धा तास प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. बचाव पथकांनी सांगितले की, उशिरा रात्री आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओंमध्ये उत्तर बँकाकमधील या पबच्या मुख्य प्रवेशद्वारातून प्रचंड ज्वाळा उसळताना दिसत आहेत. जीव वाचवण्यासाठी नागरिक बाहेर पळताना दिसले, तर परिसरात काळ्या धुराचे दाट ढग पसरले होते.अधिका-यांच्या मते, आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाला जवळपास ३० मिनिटे लागली. दुर्घटनेनंतर समोर आलेल्या छायाचित्रांमध्ये पबमधील जळालेल्या खुर्च्या, टेबल आणि मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले बांधकाम दिसून येत आहे. सध्या अधिकारी या दुर्घटनेची सविस्तर चौकशी करत असून मृत आणि जखमींची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.दरम्यान थायलंडचे पंतप्रधान अनुतिन चार्नवीराकुल यांनी घटनास्थळी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, या दुर्घटनेत २७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आगीमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून त्याची सखोल चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वीही २०२२ मध्ये देशाच्या पूर्वेकडील भागातील एका म्युझिक पबमध्ये लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यू झाला होता. याआधी १ जानेवारी २००९ रोजी बँकाकमधील सॅन्टिका नाईटक्लबमध्ये नववर्ष स्वागत समारंभादरम्यान लागलेल्या आगीत ६६ जणांचा मृत्यू झाला होता, तर २०० हून अधिक जण जखमी झाले होते. त्या दुर्घटनेचे कारण बंदिस्त जागेत करण्यात आलेली फटाकेबाजी असल्याचे सांगितले गेले होते.

# शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्बन चॅलेंज फंड निर्माण करावा -मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**शहरी विकासात सृजनशील बदल घडवून आणण्यासाठी शहरांना विकासाचे केंद्र मानून त्यांच्या प्रगतीतील अडथळे दूर करण्यासाठी अर्बन चॅलेंज फंडच्या माध्यमातून विकास करण्यात यावा. शहरांच्या सर्जनशील विकासासाठी या अभिनव अभियानामुळे नागरी पायाभूत सुविधा आणि सेवा वितरणात लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्तकेला.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी नगर विकास विभागाच्या आढावा बैठकीत अर्बन चॅलेंज फंड अभियानाच्या आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, वित्त व नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव ड?. के. एच. गोविंदराज, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करताना महाराष्ट्राने या दृष्टीने पावले टाकली असून यापूर्वी नाशिक आणि पुणे महानगरपालिकेत या धर्तीवर निधी उभारणी करून पाणी पुरवठा व स्वच्छता यासाठी निधी उभारले आहेत. या महानगरपालिकांच्या निधी उभारणीसाठी राष्ट्रीय सर्वोच्च समितीची (एनएससी) मंजुरी देखील मिळाली आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि नागपूर महानगरपालिका येथील काही प्रकल्पांना या पद्धतीने निधी उपलब्ध होणार आहे असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

कर्ज रोखे आणि खासगी सार्वजनिक भागीदारीतून निधी उभारणी शक्य

यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाधारित शहरी योजनांसोबत शहरांच्या संस्थात्मक, आर्थिक व प्रशासकीय मर्यादांमुळे पायाभूत प्रकल्पांच्या अंमलबजावणीत येणारे अडथळे दूर करण्यासाठी अर्बन चॅलेंज फंड महत्त्वपूर्ण ठरेल, यासाठी कर्ज रोखे आणि खासगी सार्वजनिक भागीदारीतून निधी उभारणी करणे शक्य होईल असे नमूद करण्यात आले. या अभियानांतर्गत सुमारे २२ प्रमुख घटकांचा समावेश करण्यात येणार असून त्यामध्ये डिजिटल प्रशासन, मुख्य नागरी पायाभूत सुविधांचा विकास, चक्रीय अर्थव्यवस्था वाहतूक कोंडी कमी करणारे प्रकल्प, शेवटच्या टप्प्यातील जोडणी, ५ ते २० चौ.कि.मी. क्षेत्रातील शहर भागांचे पुनरुज्जीवन, लहान व मध्यम शहरे हे विकासाची केंद्र, परपेठांचे पुनर्विकास, पायी चालणारे व सायकलस्नेही वाहतूक प्रकल्प, निदर्शक प्रकल्प, ट्रान्झिट हब उन्नतीकरण, ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट पायाभूत सुविधा विकास, शहर-विकास केंद्र, शहरांचे सृजनशील पुनर्विकास तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता प्रकल्पांचा समावेश आहे.अर्बन चॅलेंज फंडासाठीच्या वित्तीय आकृतीबंधाबाबत चर्चा करण्यात आली. अभियानात ९० हजार कोटींचा प्रकल्प निधी प्रस्तावित आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# विरोधकांची भूमिका

महाराष्ट्र विधिमंडळाचे तीन आठवड्यांचे पावसाळी अधिवेशन संस्थगित झाले. विधानसभा आणि विधान परिषदेत सत्ताधारी महायुतीच्या तुलनेने विरोधी पक्ष संख्येने बराच कमी असला, तरी जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठविण्यात विरोधक कमी पडले. विरोधी पक्ष विस्कळीत होतेच; पण समन्वय नसल्याने ते दिशाहीन दिसले. जनतेचा आवाज आपण उठवतो, असा भास त्यांनी निर्माण केला, तरी त्यात जोश दिसला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टीकेचे लक्ष्य बनविण्याचे प्रयत्न विरोधकांनी केले; पण फडणवीस यांनी आपल्या राजकीय अनुभवाचे, चातुर्याचे दर्शन घडवत आक्रमकपणे प्रत्युत्तर दिलेच, विरोधकांच्या शिडातील हवाही काढून घेतली. त्यांच्या वक्तव्यावर सभागृहाबाहेर टीका झाली खरी; पण प्रसंगी कोणता 'अवतार' धारण करू शकतो याची त्यांनी जी झलक दाखवली त्याचीच चर्चा अधिक झाली. शेतकऱ्यांना विनाअट दोन लाखांपर्यंत सरसकट कर्जमाफी सरकारकडून मंजूर करून घेण्यात विरोधी पक्षाला यश मिळाले, हे उल्लेखनीय आणि अधिवेशनाचे फलित म्हणावे लागेल. अधिवेशन काळातच मुंबई, कोकणाला अतिवृष्टीने झोडपून काढले. चार दिवस रोज दोनशे ते अडीचशे मिलिमीटर पडलेल्या मुसळधार पावसाने मुंबईची तुंबई झाली. लोणावळा-खंडाळा परिसरात साडेचारशे मिमी. पेक्षा जास्त पावसाने थैमान घातले व वेगवान वाऱ्याने घाटात दरडी कोसळल्या. निसर्गाने रौद्रावतार धारण केल्यावर काहीच करता येत नाही, याचा अनुभव यापूर्वीही अनेकदा आला आहे. २६ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीने मुंबापुरी कित्येक दिवस विस्कळीत होती. मुंबई-पुणे मार्गावर बोर घाटात पावसाळ्यात दरडी कोसळून रस्ता व रेल्वे मार्ग बंद पडल्याची अनेक उदाहरणे आहेत; मात्र यंदाच्या अतिवृष्टीत शंभर टनांची दरड मिसिंग लिंकवर कोसळून मार्ग काही काळ बंद झाला. त्यावर विरोधकांनी सात हजार कोटी पाण्यात गेले म्हणून आक्रोश करत राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न केला. आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान वापरून, सात ते आठ देशांतील तज्ज्ञांचा सल्ला घेऊन उभारलेला मिसिंग लिंक देशाच्या पायाभूत सोयी-सुविधांत मोलाची भर घालणारा ठरला आहे. जगातील सर्वांत मोठा बोगदा या पुलावर आहे. मुंबई-पुणे अंतर अर्ध्या तासाने कमी झालेच, शिवाय वाहतुकीची वारंवार होणारी कोंडी व अपघातही कमी झाले. मिसिंग लिंक हा तंत्रज्ञानाने घडवलेला चमत्कार आहे. या नैसर्गिक दुर्घटनेचे भांडवल केले गेले. बोगद्याच्या तोंडावर दरड कोसळून साचलेला शंभर टनांचा मलबा, माती, दगड यांचा ढिगारा युद्धपातळीवर काम करून हटविण्यात आला आणि १८ तासांत मिसिंग लिंकवरून वाहतूक पूर्ववत सुरू झाली. रस्ता, बोगदा कशालाच तडा गेला नाही, तरी मिसिंग लिंक कोसळला असा अपप्रचार सोशल मीडियातून केला गेला. म्हणूनच मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षाची चांगलीच खरडपट्टी काढलेली दिसते. सात हजार कोटी पाण्यात, असा खोटा प्रचार करून आपला नाही, महाराष्ट्राचा अपमान झाला, अशा शब्दांत विरोधकांना त्यांनी फटकारले. अगोदरच्या भाषणात मुख्यमंत्र्यांनी 'भाडे के टट्टू' म्हणून विरोधकांना सुनावले होते. त्याचा राग विरोधी पक्षांना आला. सुसंस्कृत भाषेत 'भाटक गदर्भ' म्हणता, तुम्हाला समजले नसेल तर 'सुपारीबाज' म्हणतात, असा टोला मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना लगावला. विधिमंडळाच्या अधिवेशनात जनतेचे प्रश्न मांडण्यापेक्षा किंवा विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यापेक्षा सरकारची आणि विशेषतः मुख्यमंत्र्यांची बदनामी करण्यातच विरोधी पक्षाला रस आहे, असे दिसले. सभागृहात विजय वडेट्टीवार, नाना पटोले, जयंत पाटील, सतेज पाटील, रोहित पवार, भास्कर जाधव, वरिष्ठ सभागृहात अंबादास दानवे विरोधी बाकांवरून सक्रिय असतात. देवेंद्र फडणवीस किंवा एकनाथ शिंदे यांनी आरोपांवर सडेतोड उत्तर दिले. सभागृहात उत्तम चर्चा घडविण्याऐवजी विधान भवनाच्या प्रवेशद्वारावरील पायऱ्यांवर घोषणा द्यायच्या, हे वारंवार घडत आहे. केवळ न्यूज चॅनेलच्या कॅमेऱ्यांपुढे प्रसिद्धीसाठी असे वारंवार करण्याने त्यातले गांभीर्यही कमी होते. विधानसभेचे अध्यक्ष व विधान परिषदेचे सभापती हे उदार मनाने दोन्ही सभागृहांत विरोधी सदस्यांना भरपूर संधी देत असतात; पण त्याचा लाभ घेऊन सरकारकडून जनतेला न्याय मिळवून दिला, असे क्वचितच बघायला मिळते.

# 'पॅरामेट्रिक' पीकविमा योजना राबवा

**सध्याच्या पीकविमा योजनेवरून शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. गेल्या खरिपात मोठे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना तोकडी भरपाई मिळाली. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना आधार देणारी विमा योजना उरलेली नाही. त्यामुळे सरकारने नेमलेल्या परदेशी समितीने विमा योजनेतही बदल करण्याची शिफारस केली आहे. पंचनामे किंवा पीक कापणी प्रयोगाच्या भानगडीत न पडता जोखीम बाबी, अर्थात ट्रिगर लागू झाल्यानंतर ठरलेली ठरावीक रक्कम शेतकऱ्यांच्या थेट खात्यात जमा करणारी विमा योजना राबविण्याची शिफारस आहे.**




शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी शिफारशी सुचविण्यासाठी सरकारने नेमलेल्या परदेशी समितीने सध्याच्या पीकविमा योजनेत बदल करून नव्याने राबविण्याची शिफारस केली आहे. याचाच अर्थ असा, की सध्याची विमा योजना शेतकऱ्यांना संकटाच्या काळात आधार देण्यास कुचकामी ठरत आहे. समितीने समितीने खरीप पिकांसाठी 'हवामान आधारित पीक विमा योजने' अंतर्गत 'पॅरामेट्रिक विमा मॉडेल' राबविण्याच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा केली. यामध्ये उपग्रहाद्वारे मिळणारी चित्रे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित साधनांचा वापर करून, पूर्वनिर्धारित हवामान मानकांनुसार ठरावीक कालमर्यादेत विमा परतावा देण्याचा समावेश आहे. ही योजना राबविण्यासाठी सखोल चर्चा करून अंमलबजावणी करावी, अशी शिफारस केली आहे. थोडक्यात, हवामानविषयक जोखीम बाबी ठरवल्यानंतर या बाबी लागू झाल्यानंतर मानवी हस्तक्षेपाशिवाय ठरलेली भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची शिफारस समितीने केली आहे. सध्याच्या विमा योजनेतील सर्वात मोठी उणीव म्हणजे अपुरे संरक्षण हेच आहे.

### शेतकऱ्यांच्या माथी कुचकामी योजना

गेल्या खरिपापासून सरकारने राबविलेली योजना शेतकऱ्यांना योग्य भरपाई देण्यास असमर्थ ठरली आहे. त्यामुळे पीकविमा योजनेविषयी शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी वाढली आहे. पीक कापणी प्रयोगावर आधारित म्हणजेच उत्पादकता आधारित विमा योजनेतून नुकसान जास्त होऊन शेतकऱ्यांना भरपाई खूपच कमी मिळाली आहे. शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटात पीक नुकसान झाल्यानंतर योग्य भरपाईच्या माध्यमातून आधार हवा असतो. पण खरीप २०२५ मध्ये राज्यात गेल्या नऊ वर्षांतील विक्रमी पीक नुकसान होऊनही शेतकऱ्यांना भरपाई केवळ १,६३० कोटी रुपये मिळाली.

त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये या योजनेविषयी नाराजी आहे. शेतकऱ्यांना उत्पन्न कमी मिळाले आणि भरपाईही कमी मिळाली. सरकारने विमा योजनेत बदल केल्यानंतर सरकारचा पाच हजार कोटींचा विमा हप्ता वाचला आहे. लाडकी बहीण योजनेमुळे सरकारची तिजोरी रिकामी झालेली आहे. या योजनेचा खर्च सरकारला इतर योजनांवरील खर्च कमी करून भागवावा लागत आहे. यासाठी पीकविमा योजनेतून पाच हजार कोटी रुपये बाजूला काढला गेले. सरकारने कृषी समृद्धी योजनेचे गाजर दाखवले असले तरी लाडकी बहीण योजना खरे कारण असल्याचे स्पष्टच आहे.

मागील चार वर्षांत ज्या ट्रिगरमधून सर्वाधिक पीकविमा भरपाई शेतकऱ्यांना मिळत असे तेच ट्रिगर आता पीकविमा योजनेत नाहीत. स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती आणि काढणीपश्चात नुकसान हे ट्रिगर विमा योजनेतून काढले आहेत. याचा काय परिणाम झाला हे मागील खरिपात शेतकऱ्यांनी अनुभवले आहे. त्यामुळे एकतर सध्याची योजना बदला किंवा काढलेले ट्रिगर पुन्हा सुरू करा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती.

कृषिमंत्र्यांनीही शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती हे ट्रिगर पुन्हा सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी त्यांनी पाठपुरावाही केला होता. कृषी विभागानेही तसा अहवाल दिला होता. पण ट्रिगर सुरु करायचे म्हणजे जास्त पैसा लागणार, त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी ज्यांकडे अर्थखाते आहे हा प्रस्ताव फेटाळून लावला. त्यामुळे यंदाही कुचकामी विमा योजना शेतकऱ्यांच्या माथी मारण्यात आली आहे.

### शेतकऱ्यांचा विरोध का ?

पीकविमा योजनेतून ट्रिगर काढण्याच्या आधी म्हणजेच २०२४ च्या खरिपात शेतकऱ्यांना जवळपास ४ हजार ७२७ कोटी रुपये भरपाई मिळाली होती. त्यापैकी केवळ ४२ कोटी रुपये भरपाई पीक कापणी प्रयोगावर आधारित होती. इतर सर्व भरपाई काढून टाकलेल्या स्थानिक नैसर्गिक आपत्ती हंगामातील प्रतिकूल परिस्थिती आणि काढणीपश्चात नुकसान या ट्रिगरमधून मिळालेली होती. त्यातही स्थानिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या ट्रिगरमधून मिळणारी भरपाई जास्त होती.

किमान दोन ट्रिगर लागू करण्याची मागणी शेतकरी करत आहेत. पण सरकारने हे ट्रिगरदेखील लागू केले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांनी विमा योजनेला विरोध केला आहे. तसेच यंदा 'एल निनो'चे वर्ष आहे. यंदा गेल्या अनेक वर्षांतील कमी पाऊसमानाचा अंदाज आहे. सहाजिक याचा फटका पीक उत्पादनाला बसणार आहे. यापूर्वी २०२३ मध्ये 'एल निनो' होता. पावसाने सरासरी भरून काढली तरी अवेळी पाऊस, पावसातील खंड यामुळे शेतकऱ्यांना विमा भरपाई सर्वाधिक मिळाली होती. २०२३ मध्ये काही भागात पाऊस नसल्याने पेरणीच झाली नाही.

यासाठी काही मंडलातील शेतकऱ्यांनी १४ कोटी रुपये भरपाई मिळाली होती. तर २०१९ च्या 'एल निनो' वर्षात याच ट्रिगरमधून ११९ कोटी रुपये भरपाई शेतकऱ्यांना मिळाली होती. यंदा हा ट्रिगर नाही. पण यंदाची परिस्थिती बिकट आहे. अनेक भागात अजूनही पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. पुढे पेरणी होण्याची शक्यताही कमीच आहे. अशा परिस्थितीत हा ट्रिगर असणे आवश्यक होते. तसेच पावसात खंड पडल्यानंतर याच वर्षी शेतकऱ्यांना हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या ट्रिगरमधून २ हजार ५७१ कोटी रुपये भरपाई मिळाली होती. यंदाही अनेक भागात पावसात खंड आहे. पुढेही खंड पडण्याची शक्यता दाट आहे.

कारण यंदा २०२३ पेक्षा परिस्थिती बिकट आहे. स्थानिक आपत्तीमधूनही या वर्षी शेतकऱ्यांना १ हजार ६२७ कोटी रुपये भरपाई मिळाली होती. हा ट्रिगरही यंदा नाही. या सर्व ट्रिगरमधून मिळालेली भरपाई जवळपास ४ हजार ४०० कोटी रुपये होती. पण हे सर्व ट्रिगर्स यंदा नाहीत. तसेच तंत्रज्ञान आधारित उत्पादकतेच्या आकडेवारीमुळेही घोळ होत आहे. या सर्व कारणांनी पीकविमा योजनेला यंदा शेतकऱ्यांचा विरोध आहे.

### पॅरामेट्रिक विमा मॉडेल

परदेशी समितीने पॅरामेट्रिक विमा मॉडेल राबविण्याची शिफारस केली आहे. फळपीक विमा योजनेत जसे नैसर्गिक आपत्तीचा ट्रिगर लागू झाल्यानंतर ठरलेली भरपाई शेतकऱ्यांना मिळते, तसेच खरीप आणि रब्बी पिकांनाही लागू करावे अशी ही शिफारस आहे. सध्या विमा योजनेत शेतकऱ्यांना पीक कापणी प्रयोगावर आधारित भरपाई मिळते. कापणी प्रयोगातून उत्पादकता उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्यानुसार भरपाई मिळते. पण उत्पादकता उंबरठा उत्पादनापेक्षा कमी नसेल तर भरपाई मिळत नाही. परंतु पॅरामेट्रिक विमा मॉडेलनुसार पाऊस, पावसातील खंड, तापमान आदी नैसर्गिक आपत्तीचा ट्रिगर लागू झाल्यानंतर उत्पादनात किती घट येणार याचा विचार न करता ट्रिगर लागू झाल्यामुळेच ठरलेली भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल. आपल्याकडे पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा अशा प्रकारे राबविली जाते. राज्य सरकारने यंदा हळद पिकाचा पुनर्रचित हवामान आधारित फळपीक योजनेत समावेश केला आहे.

### हळदीप्रमाणे योजना शक्य

हळदीसाठी यंदा राबवल्या जाणाऱ्या योजनेत काही बदल करून ही योजना इतर खरीप आणि रब्बी पिकांसाठी राबवणे शक्य आहे. हळदीसाठी हेक्टरी १ लाख ८० हजार रुपये विमा संरक्षित रक्कम आहे. विमा संरक्षण घेण्यासाठी शेतकऱ्यांना ५ टक्के विमा हप्ता द्यावा लागतो. अशीच पद्धती इतर पिकांसाठीही लागू करता येईल. हळदीला एकूण चार हवामान धोक्यांसाठी ठराविक कालावधीसाठी विमा संरक्षण मिळणार आहे. म्हणजेच चार ट्रिगरमधून भरपाई मिळणार आहे.

**पहिला ट्रिगर : पावसाचा खंड**

हा ट्रिगर केवळ १५ जून ते ३१ जुलै दरम्यान लागू होतो. या कालावधीत सलग १५ दिवस पावसात खंड पडल्यास संबंधित विमा क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी २७ हजार रुपये विमा भरपाई मिळेल. यावेळी नुकसानीच्या पूर्वसूचना, पंचनामे किंवा कापणी प्रयोग होणार नाहीत. ट्रिगर लागू झाल्यानंतर ठरलेली रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल.

**दुसरा ट्रिगर : कमी पावसाचा**

हा ट्रिगर १ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत लागू होतो. या कालावधीत सलग ३० दिवस ५० मिलिमीटरपेक्षा कमी पाऊस झाल्यास संबंधित विमा क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना ३६ हजार रुपये विमा भरपाई मिळेल.

**तिसरा ट्रिगर : अवेळी पावसाचा**

हा ट्रिगर १ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत लागू होतो. या कालावधीत सलग ५ दिवस एकूण पाऊस ५० मिलिमीटर किंवा त्यापेक्षा जास्त पडल्यास विमा क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ९० हजार रुपये भरपाई मिळेल.

**चौथा ट्रिगर : जास्त तापमान**

हा ट्रिगर १ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत लागू होतो. या काळात सलग ३० दिवस तापमान ३० अंश सेल्सिअस किंवा अधिक राहिल्यास शेतकऱ्यांना २७ हजार रुपये भरपाई मिळेल.

**काय बदल आवश्यक ?**

हळदीच्या विमा योजनेतही काही बदल करणे आवश्यक आहे. तसेच ही योजना इतर खरीप आणि रब्बी पिकांसाठी राबवताना काही जोखीम बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. हळदीच्या विमा योजनेत हवामान धोक्यांचा अर्थात ट्रिगर लागू होण्याचा कालावधी निश्चित केलेला आहे. उदा. पावसातील खंड. हा ट्रिगर १५ जून ते ३१ जुलै दरम्यान लागू होतो. पण या कालावधीत केवळ पावसाचा खंड हा ट्रिगरच लागू होईल.

या कालावधीत अवेळी सलग ५ दिवस ५० मिलिमीटर पाऊस पडला तरी अवेळी पावसाचा ट्रिगर लागू होणार नाही. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात यंदा अनेक ठिकाणी सलग आठवडाभर पाऊस झाला. यामुळे हळद पिकाचे नुकसान झाले. पण तरीही या पावसामुळे झालेल्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना भरपाई मिळणार नाही. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान तर होणार पण भरपाई मिळणार नाही. अशा निकषांमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

तसेच खरीप आणि रब्बी पिकांसाठी अशी योजना राबवताना कीड-रोगांमुळे होणारे नुकसान, अतिवृष्टी, पूर अशी जोखीम बाबींचाही समावेश केल्यास योजना अधिक व्यापक होईल.

**अनिल जाधव**
८३८००८६१६४

### पीक कापणी प्रयोगातील त्रुटी

- पीक कापणी प्रयोगावर आधारित भरपाई शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात मिळत नाही.
- खरीप २०२५ मध्ये अनेक मंडलांत अतिवृष्टी होऊन पिकांचे नुकसान.
- नदी, आले, तलाच्या शेजारच्या क्षेत्रात मोठे नुकसान.
- काही शेतकऱ्यांची जमीन खरडून ८० ते ९० टक्क्यांपर्यंत नुकसान.
- पंचनामे वैयक्तिक न होता मंडलपातळीवर पीक कापणी प्रयोग झाले.
- पीक कापणी प्रयोगातून मंडळपातळीवर उत्पादनातील घट कमी आली.
- तंत्रज्ञान आधारित उत्पादकताही अधिक आली.
- पीक कापणी प्रयोग ठराविक भागात झाल्याने नुकसानीची पातळी खूपच कमी आली.
- मंडळातील बहुतांशी भागात नुकसान नुकसानही अनेक ठिकाणी भरपाई नगण्य मिळाली.

### यंदाची परिस्थिती बिकट

राज्यात यंदा कमी पावसाचे सावट आहे. जून महिन्यात राज्यात तब्बल ४६ टक्के कमी पाऊस होता. मराठवाड्यात तर केवळ ३१ टक्के पाऊस पडला आणि ६९ टक्के तूट होती. विदर्भातही ४९ टक्के तूट होती. तर मध्य महाराष्ट्रात तब्बल ५१ टक्के कमी पाऊस पडला. जुलैच्या पहिल्या आठवड्यात राज्याच्या काही भागात चांगला पाऊस झाला. मात्र मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागात पाऊस खूपच कमी आहे. मराठवाड्यात १ जूनपासून आतापर्यंत ३१ टक्के कमी पाऊस आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी आहे. मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातही अनेक जिल्ह्यांमध्ये आजही पावसात तूट आहे. जुलैतील पावसाने अनेक जिल्ह्यांमधील पावसातील तूट कमी झाली तरी पावसाचे वितरण आणि पावसाचे दिवस कमी आहेत. या पावसावर अनेक भागातील शेतकरी पेरणी करत आहेत. पण पुढे पावसात खंड पडण्याची शक्यता आहे. याचा परिणाम उगवण झालेल्या पिकावर होण्याची शक्यता आहे. तर मराठवाड्यात अनेक ठिकाणी पेरणी झालेले पीक उगवून आलेले नाही. अशी परिस्थिती शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीच्या प्रत्येक टप्प्यावर विमा संरक्षण हवे आहे. यापुर्वीच्या 'एल निनो' वर्षात पीकविमा योजनेने शेतकऱ्यांना चांगला आधार दिला आहे. यंदाही तीच योजना अपेक्षित आहे.

### आंध्र प्रदेशातील योजना

आंध्र प्रदेशात खरीप आणि रब्बी पिकांसाठीही पुनर्रचित हवामान आधारित पीकविमा योजना राबविली जाते. आंध्र प्रदेशात फळपीक तसेच कापूस, टोमॅटो, भुईमूग आदी पिकांसाठी हवामान आधारित विमा योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत विमा भरपाईच्या बाबी अर्थात ट्रिगर्स पुढीलप्रमाणे...



- **पाऊस :** कमी पाऊस, जास्त पाऊस, अवकाळी पाऊस, सतत पाऊस, पावसातील खंड, कमी पावसाचे दिवस
- **तापमान :** जास्त तापमान, कमी तापमान
- **सापेक्ष आर्द्रता.**
- **वाऱ्यांचा वेग.**

**वरील सर्व घटकांचा एकत्रित परिणाम.**

वरील सर्व जोखीम बाबी प्रत्येक पिकांसाठी लागू होण्याचा कालावधी निश्चित केलेला आहे. विम्याचा हप्ताही कमी आहे. ट्रिगर लागू झाल्यानंतर विमा संरक्षित रकमेतून ठरलेली रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होते. भरपाईचा ट्रिगर लागू झाल्यानंतर त्या विमा क्षेत्रातील शेतकऱ्यांना ठरलेली भरपाई नुकसानीची पातळीही कितीही असली तरी मिळते.

### काय फायदा होईल ?

- पीकविमा योजनेतील मानवी हस्तक्षेप दूर होऊन गैरप्रकार टाळता येतील.
- पंचनामे, पीक कापणी प्रयोग करण्याची गरज पडणार नाही.
- भरपाईचा ट्रिगर लागू झाल्यानंतर मंडळातील सर्व शेतकऱ्यांना ठरलेली रक्कम मिळेल.
- शेतकऱ्यांना वेळेत भरपाई मिळण्यास मदत होईल.
- हवामान धोक्यांची माहिती उपलब्ध होत असल्याने पारदर्शकता येण्यास मदत होईल.
- विमा कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप लावता येईल.

## ई-खरेदीतील वाढती फसवणूक चिंताजनक

एका बाजार संशोधन संस्थेच्या ताज्या अहवालानुसार देशातील तीस कोटी चाळीस लाख ऑनलाइन खरेदीपैकी जवळपास ८८ टक्के ग्राहकांना छुपे शुल्क, सक्तीचे ॲड, ड्रीप प्राइसिंग, खोट्या आणीबाणीचे नियम आणि वर्गणीदारांसाठी विणण्यात आलेल्या सापळ्यांमुळे प्रत्येकी अंदाजे ७८ ते ८७ रुपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. डिजिटल क्षेत्रातील अशा फसव्या पद्धतींना आळा घालण्यात सध्याच्या नियामक हस्तक्षेपांना आतापर्यंत खूप मर्यादित यश आले असून यामुळे लाखो ग्राहक प्रभावित होत आहेत. ऑनलाइन पेमेंट करणाऱ्या ६३ टक्के ग्राहकांना छुपे शुल्क भरल्याचा अनुभव येत आहे. खरेदीच्या अंतिम टप्प्यात ऑनलाइन ग्राहकांच्या बिलात अतिरिक्त शुल्क जोडले जाते. २०२४ या वर्षात याचे प्रमाण बावन्न टक्के एवढे होते. ज्यात दोन वर्षांमध्ये आणखी वाढ झाली आहे. देशामधील ऑनलाइन बाजारपेठ वरचेवर वाढत चाललेली असताना किरकोळ विक्रेत्यांना त्याची मोठी झळ पोहोचत आहे. ग्रामीण भागातदेखील ऑनलाइन खरेदीचे प्रमाण वाढले आहे. समाजमाध्यमांवर येणाऱ्या ऑनलाइन खरेदीच्या फसव्या जाहिरातींना भुलणाऱ्या ग्राहकांची वाढती संख्या चिंतेचा विषय झाला आहे. मोबाइलवरून खरेदीची चंगळ आणि सोया सहजपणे झाली असली तरी त्यातून होणाऱ्या फसवणुकीचे प्रकार कमी होण्यासाठी वेळीच उपाययोजना करण्याची गरज आहे. बदलत्या काळानुसार समाजातील खरेदीची मानसिकताही बदलत चालली आहे.

केवळ युवा वर्गच नाही तर सर्वच वयातील ग्राहक आता ऑनलाइन खरेदीला अधिक प्राधान्य देत आहेत. त्यामुळेच बनावट कंपन्यांचा मोठा सुळसुळाट वाढला आहे. सरकारकडून डिजिटल व्यवहाराला मोठे प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबले जात आहे. विशेषतः कोरोना काळापासून भारतीय ग्राहकांना ऑनलाइन खरेदीची सवय चांगलीच जडली आहे. ई-खरेदीचे जसे फायदे आहेत तसेच त्याचे तोटेदेखील आहेत. त्यामुळे ग्राहकांनी आपली फसवणूक टाळण्यासाठी अतिशय काळजीपूर्वक व्यवहार करायचा पाहिजे. अन्यथा फसवणुकीच्या घटना कमी न होता वाढतच जातील. पोलीस प्रशासनाच्या सायबर विभागानेदेखील अशा घटनांची तातडीने दखल घेतली पाहिजे. त्यामुळे ग्राहकांची संभाव्य फसवणूक टाळता येऊ शकेल. ई-खरेदी करताना अधिक सतर्कतेची आवश्यकता आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
मो.९४२०५६६४०४

## महापौरांचा प्रेरणादायी संदेश

अख्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्रीक्षेत्र पंढरपूर नगरीचे विठ्ठलरुख्मिणी यांची आषाढी वारी येत. त्यांच पार्श्वभूमीवर पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून 'सेवा हीच वारी, राम कृष्ण हरी'या टॅगलाईनद्वारे एक संदेश देण्यात आला. तो निश्चितच प्रेरणादायी आहे. आषाढी वारीच्या अनुषंगाने पुण्याचा जो वारसा आहे. तो जतन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. ९ आणि १० तारखेला पुण्यात पालखी मुक्काम होता. एकाचवेळी एकाच दिवशी जिथे पालखी मुक्काम आहे तेथे स्वतः महापौर आणि वारकरी सहभागी झाले. आणि जे याठिकाणी येवू शकत नव्हते ते ऑनलाईन पद्धतीने जॉईन झालेकोणत्याही प्रकारची प्रसिद्धी अथवा श्रेय मिळावे हा त्यामागचा हेतू नव्हता एक शुद्ध भावना होती पुण्यात देव येतात, देवाची माणसे येतात त्यामुळे पुण्याची जी संस्कृती आहे सेवा करण्याची ती यामाध्यमातून करुन महापौरांनी आपला संकल्प पूर्ण केला.

**राजू जाधव**

## 'एकशिक्षकी' शाळा वाढल्या

देशभरातील शाळांमधील पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांची नोंदणी आणि शिक्षकांशी संबंधित माहितीचा सर्वसमावेशक सांख्यिकीय डेटाबेस असलेला 'युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टम फॉर एज्युकेशन प्लस' २०२५-२६ चा अहवाल केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकताच प्रकाशित केला. अहवालात अंदाजे १४.६७ लाख शाळा आणि २४ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. २०२२-२३ च्या तुलनेत २०२५-२६ मध्ये शिक्षकांची संख्या १.०२ कोटींच्या वर गेली असून ही वाढ अंदाजे ८.३ इतकी आहे. शाळा सोडण्याचे प्रमाण प्राथमिक स्तरावर २.३ टक्क्यांवरून १.८ टक्क्यांपर्यंत तर माध्यमिक स्तरावर ८.२ टक्क्यांवरून ७.० टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. संगणक सुविधा असलेल्या शाळांचे प्रमाण २०२४-२५ मधील ६४.७ टक्क्यांवरून २०२५-२६ मध्ये ६९.९ टक्क्यांपर्यंत वाढले. ९८.५ टक्के शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत. एकूणच या अहवालात शालेय शिक्षणासंबंधी सकारात्मक आकडेवारी समोर आली आहे. मात्र देशभरात एकशिक्षकी शाळांची संख्या घटली असताना महाराष्ट्रात मात्र त्यात लक्षणीय वाढ झाली असल्याचे समोर आहे.

महाराष्ट्रातील एकशिक्षकी शाळांची संख्या २०२४-२५ मधील ८१२५ वरून वाढून २०२५-२६ मध्ये ९२६९ झाली आहे. याचाच अर्थ अवघ्या एका वर्षात राज्यात ११४४ एकशिक्षकी शाळांची भर पडली आहे. सध्या या एकशिक्षकी शाळांमध्ये १,७९,१०४ विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत शिक्षण तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे.

**प्रदीप मोरे**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# पुसद पाणीपुरवठा योजनेत कराराभंगाचा आरोप..!

## निकृष्ट पाईप वापरप्रकरणी चौकशीची मागणी

✦ जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. १३ : पुसद नगर परिषद हद्दीत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नगर परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते निखिल चिद्दरवार यांनी मुख्याधिकाऱ्यांना दुसरे स्मरणपत्र देत संबंधित ठेकेदाराकडून करारातील अटी व शर्तींचे उल्लंघन होत असल्याचा आरोप केला असून, संपूर्ण कामाची तातडीने चौकशी करून कठोर कारवाईची मागणी केली आहे.



"पाणीपुरवठा योजना ही शहराच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. निकृष्ट काम आणि करारभंग कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. प्रशासनाने तातडीने गुणवत्ता तपासणी करून दोषी ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अन्यथा नागरिकांसह तीव्र लोकआंदोलन उभारले जाईल."

— निखिल चिद्दरवार, माजी विरोधी पक्षनेते, नगर परिषद पुसद

स्मरणपत्रानुसार, गुजरातस्थित हिर कन्स्ट्रक्शन कंपनीला या योजनेचे काम देण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष कामात करारातील निकषांचे पालन होत नसल्याची बाब वारंवार निदर्शनास आणूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. योजनेत निकृष्ट दर्जाचे पाईप वापरले जात असल्याचा दावा करत, भविष्यात पाइपलाइन फुटणे, पाणीपुरवठा विस्कळित होणे तसेच नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यवतमाळ येथे यापूर्वी अशाच प्रकारची घटना घडल्याचा उल्लेख करत, पुसदमध्येही अशी वेळ येऊ नये म्हणून कामाची गुणवत्ता तातडीने तपासून दोषींवर करारानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# सोशल मीडियावर बौद्ध समाजाचा अवमान करणाऱ्या आरोपींवर कठोर कारवाई करा:-आजाद समाज पार्टी.!

✦ जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. १३ : सोशल मीडियाचा वापर करून महार (बौद्ध) समाज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी तसेच "जय भीम" या अभिवादनाचा अवमान करत जातीय द्वेष पसरविणाऱ्या आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी आजाद समाज पार्टी (कां.) युवा च्या वतीने पुसद शहर पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे करण्यात आली.



निवेदनानुसार, दिनांक ९ जुलै २०२६ रोजी रात्री १०.११ वाजता आरोपी रुपेश बोंबले यांच्या "SONU_PATIL_००१" या इन्स्टाग्राम आयडीवरून झालेल्या इंस्टाग्राम लाईव्ह दरम्यान आरोपी योगेश कल्याणकर यांनी महार (बौद्ध) समाज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आणि "जय भीम" या अभिवादना बाबत अत्यंत आक्षेपार्ह, जातीवाचक व विषावगोखोर वक्तव्ये करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने त्याचा जलद, निष्पक्ष व प्रभावी तपास करून आरोपींना कायद्यानुसार कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच सोशल मीडियावर जातीय विद्वेष पसरविणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्यासाठी सायबर यंत्रणेमार्फत विशेष देखरेख ठेवण्याचीही मागणी निवेदनातून करण्यात आली. आजाद समाज पार्टी (कां.) पुसद ने या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत, समाजात जातीय तेढ निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तीला कायद्याच्या चौकटीत कठोर उत्तर देण्याची गरज असल्याचे नमूद केले. आरोपींवर तातडीने कठोर कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी राजकुमार भगत आजाद समाज पार्टी का. युवा जिल्हाध्यक्ष यवतमाळ, विशाल डाके आजाद समाज पार्टी का. युवा जिल्हा महासचिव यवतमाळ, राहुल धुळे, अजय लोखंडे भीम आर्मी तालुका अध्यक्ष, वैभव सूर्यवंशी भीम आर्मी तालुका उपाध्यक्ष, आकाश चवरे, प्रसाद खंदारे, शुभम गवई, आकाश धुळे, वैभव खरतडे, तेजस बोखारे, सुमित आढाव, शांतिशील जाधव, संदेश कांबळे, राज कांबळे, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सहा वर्षांपासून अंधारात ३६१ दुर्तगति महामार्ग..!

## दिलीप बिल्डकॉम पथदिवे सुरू करा, शिवसेनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

✦ जनमाध्यम | प्रतिनिधी

राळेगाव, दि. १३ : राळेगाव शहराच्या मध्यभागातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ बीवरील पथदिवे गेल्या तब्बल सहा वर्षांपासून बंद असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रात्रीच्या वेळी या मार्गावर अंधाराचे साम्राज्य पसरत असून अपघातांचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तातडीने पथदिवे सुरू करण्याची मागणी केली आहे.



तालुकाप्रमुख विजय पाटील यांच्या सूचनेनुसार शहरप्रमुख शंकर गायधने यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. शहर संघटक योगेश मलोंडे, उपशहरप्रमुख देवराव नाखले, श्रीकांत कोदाणे, रवींद्र मेश्राम, सुनील क्षीरसागर, महिला शहर संघटिका पार्वता मुखरे, शारदा चुनारकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दिलीप बिल्डकॉम कंपनीने महामार्ग उभारणीदरम्यान सुमारे चार किलोमीटर अंतरावर पथदिवे बसविले मात्र ते आजपर्यंत सुरू झालेले नाहीत. या मार्गावर शासकीय कार्यालये, महावितरण कार्यालय, ग्रामीण रुग्णालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, शाळा, वसतिगृह तसेच अनेक व्यापारी आस्थापना असल्याने नागरिकांची मोठी वर्दळ असते. तरीही पर्यायी प्रकाशव्यवस्था नसल्याने रात्री हा मार्ग अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' ठरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. महादेवराव मुखरे, सुधाकर शिखरे, सनी छोरिया, प्रभाकर थोटे, धनराज श्रीरामे, रामभाऊ मसराम, सुरेश चाफेकर, अनिल नगराळे, देवा पांडव यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व अपघात टाळण्यासाठी ३६१ बी महामार्गावरील पथदिवे तातडीने सुरू करावेत, अशी ठाम मागणी शिवसेनेने केली आहे.

# उमरखेडच्या ज्येष्ठ डॉक्टरांचा 'सेवा सन्मान सोहळा' उत्साहात

✦ जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. १३ : "सेवा हीच ईश्वरपूजा" हा संदेश समाजापर्यंत पोहोचवत उमरखेड शहर व तालुक्यातील अनेक वर्षे निरपेक्षपणे रुग्णसेवा करणाऱ्या ज्येष्ठ डॉक्टरांचा 'सेवा सन्मान सोहळा–२०२६' रविवारी (दि. १२) आर्यवैश्य भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ डॉक्टरांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गंधेवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विनोद ग्यानचंदानी व डॉ. सारिका देशमुख उपस्थित होते. वरिष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. सतीश अग्रवाल (अमरावती) यांनी "डॉक्टरांच्या दैनंदिन जीवनातील स्ट्रेस मॅनेजमेंट" या विषयावर मार्गदर्शन करत वैद्यकीय व्यवसायातील ताणतणाव, मानसिक संतुलन आणि स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तर न्यूरोसर्जन डॉ. मयुरेश रामपूरकर (नांदेड) यांनी आधुनिक वैद्यकीय क्षेत्रातील बदलते तंत्रज्ञान, आव्हाने आणि डॉक्टरांची सामाजिक जबाबदारी यावर विचार मांडले. उमरखेड शहर व तालुक्यातील मोठ्या संख्येने डॉक्टर या सोहळ्यास उपस्थित होते. या उपक्रमामुळे सेवाभावी वैद्यकीय कार्याला नवी प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. आयोजनासाठी उमरखेड डॉक्टर असोसिएशन–२०२६ सन्मान टीमने विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. मंगेश नरवाडे यांनी, तर आभार डॉ. गजानन हिंगमिरे यांनी मानले.

## थोडक्यात



### वाकान मध्ये मतदार पुनरिक्षण मोहिमेला वेग..!

**२० जुलैपूर्वी ई-फॉर्म भरण्याचे आवाहन**

**महागाव :** विशेष मतदार यादी पुनरिक्षण (SIR) अभियानांतर्गत वाकान व परिसरातील पात्र नागरिकांनी २० जुलै २०२६ पूर्वी ई-फॉर्म भरून संबंधित बीएलओकडे जमा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. घरपोच उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या फॉर्मसह पासपोर्ट आकाराचा फोटो, आधार क्रमांक, पालकांच्या मतदान ओळखपत्रांचे EPIC क्रमांक व मोबाईल क्रमांक आवश्यक राहणार आहेत. अंतिम मुदत जवळ आल्याने विलंब न करता प्रक्रिया पूर्ण करून मतदार यादी अद्ययावत करण्यास सहकार्य करावे, असे बीएलओ अल्का पवार व सहकारी गोपाल चव्हाण यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी संबंधित बीएलओ किंवा निवडणूक कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### कॅल्क्युलेटरलाही मागे टाकणारा घाटंजीचा हिमांशू..!

**राज्यस्तरीय ॲबॅकसमध्ये 'मॅथ मॅजिशियन'चा सर्वोच्च मान**

**घाटंजी :** अमरावती येथील शिवाजी महाराज ऑडिटोरियम मध्ये १० जुलै रोजी झालेल्या प्रतिष्ठेच्या स्टेट लेव्हल समर २०२६ ॲबॅकस स्पर्धेत घाटंजीच्या अनिरा प्रोॲक्टिव्ह ॲबॅकस अकॅडमीने राज्यभरात उल्लेखनीय कामगिरी करत यवतमाळ जिल्ह्याचा मान उंचावला. अकॅडमीचा विद्यार्थी हिमांशू मानकर याने तब्बल ८०० स्पर्धकांमध्ये अव्वल ठरत 'मॅथ मॅजिशियन' हा स्पर्धेतील सर्वोच्च बहुमान पटकावला.

स्पर्धेत सहा मिनिटांत १०० गणिते अचूक सोडवण्याचे कठीण आव्हान होते. हिमांशूने एकही चूक न करता १०० पैकी १०० गुण मिळवत संपूर्ण प्रश्नपत्रिका अवघ्या ३ मिनिटे ३४ सेकंदांत पूर्ण केली. त्याच्या या वेगवान आणि अचूक कामगिरीने उपस्थितांची दाद मिळवली.

अनिरा प्रोॲक्टिव्ह ॲबॅकस अकॅडमीच्या ६० विद्यार्थ्यांपैकी ४५ विद्यार्थ्यांनी विविध श्रेणीं मध्ये मानाचे रँक मिळवले, तर १५ विद्यार्थ्यांना 'बेस्ट परफॉर्मन्स अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण यशामुळे अकॅडमीने यंदाच्या समर बॅच मध्ये १०० नवीन प्रवेशांचा विक्रमही नोंदविला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुख्य संस्थेकडून अकॅडमीला १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या यशामागे संचालक अनिकेत भोयर व अक्षरा मॅडम यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल यशाबद्दल पालक, नागरिक आणि विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून घाटंजी च्या शैक्षणिक क्षेत्रासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

# समाधानकारक पाऊस नसल्याने हळद लागवड धोक्यात कापूस सोयाबीन व इतर पिके उष्णतेमुळे करपू लागले

✦ जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे

महागाव, दि. १३ : तालुक्यात तसेच कासारबेहळ सेवा नगर परिसरात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने केलेली हळद लागवड आता तीव्र उष्णतेमुळे नासू लागले कापूस कोवळी रोपे करपू लागली आहे.



यंदा मान्सून ने सुरुवातीला हजेरी लावली असली तरी त्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने जमिनीतील ओलावा पूर्णपणे कमी झाला परिणामी कापूस सोयाबीन कोवळी पिके करपू लागली हळद सुद्धा जमिनीतच नासू लागली आहे. तर अनेक ठिकाणी पिकाचे मोठे नुकसान होत आहे विहिरी व बोअरवेलमधील पाणीसाठाही घटल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे. कापूस सोयाबीन हळद हे खर्चिक पिक असल्याने बियाणे मजुरी व खतावर मोठा खर्च करूनही अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढवण्याची भीती व्यक्त होत आहे. येत्या काही दिवसात चांगला पाऊस न झाल्यास कापूस सोयाबीन हळदीसह इतर खरीप पिकांनाही मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या परिस्थितीची शासनाने दखल घेऊन आवश्यक मदत व दिलासा देण्याची मागणी होत आहे. सध्या कासार बेहळ सेवा नगर परिसरातील आणि तालुक्यातील शेतकरी आकाशाकडे डोळे लावून पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# SIR, जनगणना आदी गैर-शैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान..!

## बाभुळगावच्या पालकांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

✦ जनमाध्यम | प्रतिनिधी

बाभुळगाव, दि. १३ : जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावून विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्याचे उद्दिष्ट शासन मांडत असताना, दुसरीकडे शिक्षकांकडून SIR, जनगणना व इतर गैर-शैक्षणिक कामे करून घेतली जात असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप बाभुळगाव येथील पालक व शाळा व्यवस्थापन समितीने केला आहे.



याबाबत तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करून शिक्षकांना अशा कामांतून मुक्त करण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या काही महिन्यांपासून जिल्हा परिषद शाळांतील शिक्षक वारंवार शासकीय कामांमध्ये गुंतल्यामुळे वर्गातील अध्यापनावर परिणाम होत आहे. याचा थेट फटका ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना बसत आहे. "खाजगी शाळांशी स्पर्धा करण्याची अपेक्षा असताना शिक्षकच वर्गात नसतील, तर पालकांनी जिल्हा परिषद शाळांवर विश्वास का ठेवावा?" असा सवालही पालकांनी उपस्थित केला. अत्यावश्यक कारणास्तव शिक्षकांची इतर कामांसाठी नियुक्ती करावी लागल्यास त्यांच्या जागी तातडीने पर्यायी शिक्षक उपलब्ध करून द्यावेत तसेच बी.एल.ओ.सह इतर प्रशासकीय कामे शिक्षकांऐवजी इतर कर्मचाऱ्यांकडून करून घ्यावीत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास तहसील कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही पालक व ग्रामस्थांनी दिला. यावेळी उर्दू शाळा समितीचे अध्यक्ष मोहम्मद जावेद, मराठी शाळा समितीचे अध्यक्ष अंकुश सोयाम, नगरसेवक नईम खान तसेच शेहेजाद शेख, धनराज छल्लानी, नियाज कुरेशी, मोहम्मद फैसल, इरफान खान आणि मोठ्या संख्येने पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# शहर पोलिसांनी २२ हरवलेले मोबाईल शोधून मालकाना दिले परत...!

## 'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत सुमारे २.७३ लाखांचा मुद्देमाल परत

✦ जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. १३ : यवतमाळ शहर पोलीस स्टेशनच्या पुढाकाराने हरवलेले मोबाईल शोधून नागरिकांना परत देण्याच्या मोहिमेला यश मिळाले आहे.

'ऑपरेशन प्रस्थान' अंतर्गत CEIR (Central Equipment Identity Register) पोर्टलच्या प्रभावी वापरातून शहर पोलिसांनी हरवलेले २२ मोबाईल शोधून काढत सुमारे २ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल मूळ मालकांच्या ताब्यात दिला.



पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून पोलीस व जनतेतील विश्वासाचे नाते अधिक दृढ करण्यासाठी जिल्हा पोलीस दलाकडून 'पोलीस समन्वय' उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी CEIR पोर्टलचा प्रभावी वापर करण्यात आला. यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात मोबाईल हरवल्याच्या तक्रारी दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या माध्यमातून संबंधित मोबाईलचा माग काढला. त्यानुसार १३ जुलै २०२६ रोजी आयोजित कार्यक्रमात उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी आणि पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर यांच्या हस्ते संबंधित तक्रारदारांना त्यांचे मोबाईल परत करण्यात आले. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यासाठी यवतमाळ शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर तसेच पोलीस अंमलदार रविंद्र नेवारे आणि अंकुश फेंडर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आठ दिवसांपासून दडी मारल्याने शेतकरी चिंतेत, दुबार पेरणीचे संकट

✦ जनमाध्यम | प्रतिनिधी

दिग्रस, दि. १३ : तालुक्यात आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. जुलै महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या जेमतेम पावसाने पुन्हा ओढ दिल्याने पेरणी केलेली पिके कोमेजून गेली आहेत. काही ठिकाणी बियाणे कुजले आहे, तर काही कोवळी पिके उन्हात मरू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले असून शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. तालुक्यातील काही भागात जून महिन्यात पावसाचा एकही थेंब पडला नाही. सगळी नक्षत्रे कोरडी गेली. जुलैच्या पहिल्या आठवड्यात तुरळक पाऊस झाला. त्या ओलाव्यावर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने कापूस, सोयाबीन, हळद या पिकांची पेरणी केली. मोठ्या प्रमाणावर खर्च करून शेतात पिके उभी केली. उसनवारी करून बियाणे, खते खरेदी केली. मात्र पिके उभी राहत नाहीत तोच पावसाने पाठ फिरवली. गेल्या आठ दिवसांपासून पावसाचा एकही थेंब पडलेला नाही. विहिरी उन्हाळ्यातच कोरड्या पडल्या आहेत. त्यामुळे शेतातील पिकांना पाणी कसे द्यायचे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. "पेरणीसाठी कर्ज काढले. आता बियाणेच कुजले तर पुन्हा खर्च कुठून करायचा? पाऊस नाही आला तर सगळी मेहनत वाया जाईल," असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र पाऊस लांबल्यास तालुक्यात मोठ्या प्रमाणात दुबार पेरणी करावी लागेल, असे चित्र आहे.

## निधन

### राम गंधे यांचे निधन..!

**यवतमाळ :** राम केशवराव गंधे [वय ६०] यांचे १२ जुलै रोजी सेवाग्राम येथील रुग्णालयात निधन झाले. गेल्या काही दिवसापासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. मृत्यूपश्चात त्यांच्या कुटूंबियांनी नेत्रदान केले.राम केशवराव गंधे मुंबई येथे एका खाजगी कंपनीत होते. त्यांच्यावर वर्धा येथे अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या मागे पत्रकार दिनेश गंधे व व्यवसायी सतीश गंधे व बराच मोठा आप्त परिवार आहे



# संत्राच्या बोगस कलमांमुळे शेतकऱ्यांना कोट्यवधींचा फटका

## बोगस कलम नर्सरी धारकांवर कारवाई करा आ.बच्चू कडू यांची विधानपरिषदेत मागणी

**चांदूरबाजार/वार्ताहर**

नागपूरचा संत्रा म्हणजे, विदर्भातील शेतकऱ्यांचे कॅश क्रॉप. मात्र मागील दहा वर्षांपासून, शेतकऱ्यांना संत्रा पिक धोक्यात आले आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांनी आपल्या संत्रा झाडावंर कुर्हाड चालविली आहे. संत्रा पीक धोक्यात येण्याचे मुख्य कारण म्हणजे, निकृष्ट दर्जाच्या संत्रा कलमा हे होय.अशा बोगस कलमांमुळे, शेतकऱ्यांना कोट्यवधींचा फटका बसत आहे.संत्रा कलमांच्या माध्यमातून, शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात आहे.सध्या नर्सरी व्यवसाय हा राज्यभर फोफावत आहे. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन, संत्रा कलमांची गुणवत्ता तपासा.बोगस कलम बांधणार्या नर्सरी धारकांवर कारवाई करा अशी मागणी आ.बच्चू कडू यांनी विधानपरिषदेत केली.



शासनाच्या फळबाग लागवड योजनेमुळे, संत्रा लागवडी खाली क्षेत्रात वाढ झाली आहे.परिणामी संत्रा कलमांच्या मागणी ही मोठ्याप्रमाणात वाढली आहे.याचाच फायदा घेऊन, नर्सरी धारकांची ही संख्या मोठ्या प्रमाणात वाढली.नफा कमविण्या नादात संत्रा कलमांची गुणवत्ता मात्रा घसरली. संत्रा कलम तयार करतांना संत्र्याचा डोळा बांधावयाचा खुंट, ईडीलिंबूच्याच जंबेरीचा असावा असा दंडक आहे.अशा कुंपणावर बांधावयाचा डोळाही ८ ते १२ वर्षांच्याच संत्रा झाडावरचा असावा.तेव्हाच दर्जेदार संत्रा कलम शेतकऱ्यांना मिळू शकते.मात्र मागिल २० वर्षांपासून संत्रा कलम तयार करण्यासाठी, गलगलच्या खुंटाचा वापर केल्या जात आहे.तसेच कोट्यवधी संत्रा कलम तयार करण्यासाठी संत्रा डोळे कमी पडतात. ही संत्रा डोळ्यांची तुट भरून काढण्यासाठी २० ते ३५ वर्षां पर्यंत वयाचे संत्रा झाडावरील डोळे कलम बांधण्यासाठी वापरल्या जात आहे.परिणामी शेतकऱ्यांना दर्जेदार संत्रा कलम मिळणे दुरापास्त झाले आहे.

शंभर टक्के गुणवत्ता असलेली दर्जेदार कलम मिळणे,हा शेतकऱ्यांचा हक्क आहे.मात्र राज्यात अनेक नर्सरी, कृषी विभागाचे परवानगी शिवाय सुरू आहेत. नर्सरी नियमांचे कोणतेही पालन न करत संत्रा कलम शेतकऱ्यांना विकत आहेत.अशा नर्सरी मधून शेतकऱ्यांना मूळ प्रजातीच्या नावाखाली चुकीच्या प्रजातींची कलमे विकल्या जात आहे.ही शेतकऱ्यांची फसवणूकच आहे.याला पायबंद घालण्यासाठी लाखो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन,कायद्यात तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यमान महाराष्ट्र फळरोप वाटीका व फळझाडे विक्री अधिनियम १९६९ मध्ये तातडीने कठोर दुरुस्ती करून नर्सरी व्यवसायात पारदर्शकता आनणे गरजेचं आहे.तसेच या कायद्यात दुरुस्ती करतांना फसवणूक करणाऱ्या नर्सरी धाकावर, फौजदारी गुन्हे दाखल करण्याची व त्यांना तुरुंगात पाठविण्याची ही तरतूद करण्यात यावी.अशी मागणी आ.बच्चू कडू यांनी विधानपरिषदेत केली आहे.या आधी ही माजी कृषी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांनीही संत्रा कलमांच्या डि.एन.ए.तपासण्याची मागणी केली होती.या मागणीमुळे त्यांना नर्सरी धारकांचा रोष पत्करावा लागला होता.

### मंत्र्यांकडून कार्यवाहीचे आश्वासन

फळ पीकांचे कलमांमध्ये फसवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे.याचा फटका संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसह आंबा,काजू,द्राक्ष, केळी,पेरू, बोर,जांभूळ,सीताफळ,मोसंबी,लिंबूआणि इतर ही सर्व फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना बसत आहे. यांचा गांभीर्याने विचार करून सर्व फळबाग उत्पादक शेतकऱ्यांसाठी, स्वतंत्र संरक्षण कवच तयार करण्याची आवश्यकता आहे.चुकीच्या कलमांमुळे शेतकऱ्यांची पाच ते सात वर्षे केलेले कष्ट वाया जाते.एवढेच नाहीतर पाच ते सात लाख रुपयांपर्यंत केलेली आर्थिक गुंतवणूक ही वाया जाते.हा शेतकऱ्यांच्या भवितव्याची खेळ आहे,असे आ.कडू यांनी विधानपरिषदेत सांगितले.तेव्हा त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची दखल घेत रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी लवकरच आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

# भविष्यासाठी लढणारी तरुणाई : स्पर्धा परीक्षा सुधारणांसाठी एल्गार

## उद्या चांदूर रेल्वेत कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

नीट, सीबीएसई, टीईटी यासोबत स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटी, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांवरील अन्यायाच्या निषेधार्थ कॉकरोच जनता पार्टी व विद्यार्थी कृती समिती, चांदूर रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जुलै रोजी, दुपारी १२ वाजता चांदूर रेल्वेच्या तहसील कार्यालय परिसरात शांतिपूर्ण आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. आंदोलनाच्या माध्यमातून परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणणे, पेपरफुटीला आळा घालणे आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी करण्यात येणार आहे.




आंदोलनात नीट, सीबीएसई, टीईटी आदी परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व पेपरफुटीविषयी कडक कायदे करण्यात यावे, सर्व स्पर्धा परीक्षा पारदर्शक पद्धतीने घेण्यात याव्यात तसेच एमपीएससी परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्या, महाराष्ट्र शासनामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांचे शुल्क कमी करण्यात यावे, सरकारी शाळा बंद करण्याऐवजी त्यांचा दर्जा उंचावावा व शिक्षणाच्या खासगीकरणाला आळा घालावा, स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियेसाठी निश्चित वार्षिक कॅलेंडर जाहीर करून निकालही निश्चित कालावधीत घोषित करावेत, पेपरफुटीच्या घटनांसाठी जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करून संबंधित मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये कोणताही भेदभाव होऊ नये, नीट मधील पेपर लीकप्रकरणी आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या परिवाराला प्रत्येकी ५० लाख ते एक कोटी रुपये देण्यात यावे व यानंतर पेपर लीक झाल्यास प्रति विद्यार्थ्यांना दहा हजार रुपये देण्यात यावे तसेच पेपर फुटल्यास ७२ तासाच्या आत पुन्हा पेपर घेण्यात यावे, पोलीस भरती २०२६ लवकर जाहीर करावी आणि वयवाढ करावी आदी मागण्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांचा आवाज लोकशाही मार्गाने शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी आहे. 'युवा क्रांती हीच पहिली पायरी आहे; न्यायासाठी एकत्र येऊया आणि आवाज शांतिपूर्ण पद्धतीने बुलंद करूया,' असे आवाहन युवक - युवती, नागरिकांना करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण करावा, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

# कृषी वीजपुरवठ्याचा खेळखंडोबा;आठ तासांचे वेळापत्रक कागदावरच!

## दोन-तीन तासच वीज मिळत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप; आंदोलनाचा इशारा

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

महावितरणच्या मुख्य कार्यालय, मुंबई येथून ८ तास कृषी वीजपुरवठ्याचे सुधारित वेळापत्रक लागू करण्यात आले असून अंजनगाव बारी उपकेंद्रांतर्गत सातरगाव एजी व निरसाना एजी फीडरवर सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीजपुरवठा देण्याचे आदेश आहेत. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना या आठ तासांपैकी केवळ दोन ते तीन तासच वीज मिळत असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, वेळापत्रक जाहीर केले असले तरी वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाब आणि सततच्या तांत्रिक बिघाडामुळे कृषी पंप चालत नाहीत. परिणामी खरीप हंगामातील पिकांना वेळेवर पाणी देता येत नसून मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. कृषी वीजपुरवठ्यासोबतच सिंगल फेज पुरवठाही नियमित नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.याशिवाय उपकेंद्रातील अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याची तक्रार नागरिक आणि शेतकऱ्यांनी केली आहे. नवीन कर्मचारी व तंत्रज्ञांची नियुक्ती होऊनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नसल्याचा आरोप होत आहे. समस्या उद्भवल्यानंतर अधिकारी वेळेवर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

मनदेव चव्हाण यांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले, 'महावितरणने कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्षात सलग आठ तास गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा करावा. शेतकऱ्यांची दिशाभूल थांबवून अधिकारी मुख्यालयी राहून जबाबदारीने काम करावेत. अन्यथा शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील.'शेतकऱ्यांनी अमरावती विभागीय कार्यालयाने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन नियमित वीजपुरवठा सुरू करावा, संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे.

# मेळघाटातील शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक थांबवा

## अ.भा. ग्राहक कल्याण परिषदेची मागणी

**धारणी/वार्ताहर**

मेळघाटातील आदिवासी शेतकरी बांधव यांच्या कडून युरिया खरेदी करतांना धारणी व चिखलदरा तालुक्यातील कृषी केंद्राकडून सक्तीने मका व इतर वस्तू खरेदी करण्यासाठी बंधनकारक करीत असल्याने त्यांची आर्थिक पिळवणूक थांबवण्याची मागणी अ. भा. ग्राहक कल्याण परिषदे तर्फे धारणी तालुका कृषी अधिकारी यांचे कडे निवेदना द्वारे करण्यात आली.

संघटनेकडे मेळघाटातील आदिवासी, निरक्षित शेतकरी यांचे कडून अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे नुकतीच धारणी येथे शेतकरी तक्रार निवारण बैठक राज्य चेअरमन गजानन मुदगल यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. सदरील बैठकी मध्ये प्रमुख अतिथी म्हणून राज्य सचिव अॅड. प्रभाकर वानखडे, राज्य प्रवक्ता संजय जाधव, जिल्हाध्यक्ष मयूर बासुंदे, जिल्हा कार्याध्यक्ष मोतीराम बेठे, संपर्क प्रमुख महेश पंडित आदी पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी शेतकरी व ग्राहक यांच्या विविध तक्रारी प्रत्यक्ष तहसीलदार व संबंधित अधिकारी यांना भेटून त्यांना न्याय मिळवून दिला.



बैठकीत तालुका कार्यकारिणीची निवड करून त्यांना नियुक्ती पत्र व आय. डी. कार्ड प्रदान करण्यात आले.

दरम्यान हरिसाल येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन ग्राहक जनजागृती अभियान राबविले. मेळघाट मधील शेतकरी यांना सोयाबीन व इतर बोगस धान्य, खते वाजवी पेक्षा अधिक किमतीने विक्री करण्यात येत असल्याची तक्रार संघटनेचे राज्य चेअरमन यांनी जिल्हा कृषी अधिकारी यांचेकडे दाखल केली आहे. शेतकरी यांच्या समस्या सोडविण्यासाठी चिखलदरा येथे एक ऑगस्ट रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाध्यक्ष मयूर बासुंदे यांनी दिली.

# अन्ननलिकेत अडकलेला तार काढून गायीला जीवनदान

**अमरावती/का.प्र.**



मोर्शी तालुक्यातील पारडी येथील ऋषभ निंभोरकर यांच्या गायीवर नांदुरा येथील गोकुलम गोरक्षण संस्थेत यशस्वी शस्त्रक्रिया करून तिचे प्राण वाचविण्यात आले. वेळेवर केलेले अचूक निदान आणि तातडीची शस्त्रक्रिया यामुळे गायीला नवजीवन मिळाले.

सदर गाय मागील एक महिन्यापासून घशाच्या गंभीर आजाराने त्रस्त होती. ती चारा अत्यंत कमी खात होती तसेच वारंवार पोट फुगण्याचा त्रास होत होता. विविध उपचार करूनही प्रकृतीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याने गायीला पुढील उपचारासाठी पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, अमरावती येथे दाखल करण्यात आले. मात्र तेथेही आवश्यक सुधारणा न झाल्याने गायीला नांदुरा येथील गोकुलम गोरक्षण संस्थेकडे पाठविण्यात आले.

गोकुलम गोरक्षण संस्थेत दाखल होताच तज्ज्ञ पशुवैद्यकीय चमूने गायीची सखोल तपासणी केली. त्यानंतर डिजिटल एक्स-रे काढण्यात आला. तपासणीदरम्यान गायीच्या अन्ननलिकेत तार अडकलेला असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे गायीला अन्न गिळताना त्रास होत असून त्याच कारणामुळे तिची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असल्याचे निदर्शनास आले. यानंतर संस्थेतील तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टरांनी कोणताही विलंब न करता गायीवर यशस्वी शस्त्रक्रिया केली. अन्ननलिकेत अडकलेला तार सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आला. शस्त्रक्रियेनंतर गायीला आवश्यक औषधोपचार व देखरेख देण्यात आली. सध्या गायीची प्रकृती समाधानकारक असून ती पूर्ववत चारा खाण्यास सुरुवात केली आहे.

यशस्वी उपचारानंतर गायीला सुरक्षितपणे मालकाच्या स्वाधीन करण्यात आले. यावेळी गायीचे मालक ऋषभ सोपान निंभोरकर यांनी गोकुलम गोरक्षण संस्थेच्या तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टर, वैद्यकीय चमू व सेवकांचे मनःपूर्वक आभार मानत संस्थेच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

# महाराष्ट्र देवस्थान समितीची केदारेश्वर मंदिरात तालुकास्तरीय बैठक

**अमरावती/का.प्र.**

बैठकी मध्ये संघटनात्मक प्रयत्न करण्याच्या विषयावर चर्चा झाली, महाराष्ट्र देवस्थान तालुकास्तरीय ११ जणांची समिती तयार करण्यात आली.विविध विषयावर चर्चा करण्यात आल्या आणि मंदिरांच्या दान व खरेदी मिळणाऱ्या जमीन व मालमत्ते वर मुद्रांक शुल्क माफी तीर्थक्षेत्र विकास कामांमध्ये देवस्थानचा सहभाग घेणे,मंदिरांच्या जमिनीकरिता सिलिंग व कुळ कायद्यापासून सुरक्षित करण्याकरिता सूट प्रमाणपत्राची अट रद्द करणे,मंदिराचे जमिनींना नुकसान भरपाई मिळणे, सर्व विषयांवर एक निवेदन तयार करून मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांना तहसीलदार वरून यांचे मार्फत पाठवण्याचे नियोजन करण्यात आले.

बैठकीला महाराष्ट्र देवस्थान समितीचे संघटक निलेश टवलारे, आशिष मारूडकर, कैलाशकुमार पनपालिया यांनी संबंधित केले सर्व विश्वस्तांकडून उपस्थिता नकडून व्यापक चर्चा संपूर्ण विषयावर झाला. बैठकीत अमोल काळे शंकर मानकर रोकडे , राजेश खोडसकर, संजय गुलाबराव बेले, मयूर महंत, राजेंद्र भाडे,विनोद वानखडे ,राम किरण हनुमान दास वरुड,रोहन ढोमणे,रमेश आकारते,गोविंद मालपे,नरेंद्र सिंगरखाडे पवन टेकाडे,सुभाष आगरकर,अरविंद राऊत,हर्षल गुल्हाने,अमोल गुर्जर,अनुप अग्रवाल,धर्मेंद्र दवे,लिलाधर गावंडे,तुषार डांगोरे,मनोहर यावले,ज्ञानेश्वर येवले,तुषार खेरडे,किर्तन देशमुख कैलास उपाध्याय,मुकेश मारोडकर,राहुल पांडे,अशोक देवते,किशोर चिमोटे, चेतन वरेकर,धीरज बहुरूपी,प्रवीण ठाकरे,रजनी भांडे ,स्वप्निल भोंडे यश पाटणे,निखिल बोंडे,संदीप आंबेडकर, नारायण पोहकर, गजानन शामराव नारिंग,ज्ञानेश्वर जवळे, राजेश पंजाबराव माकोडे इत्यादी व अन्य मंदिर विश्वस्त, पुजारी उपस्थित होते.



# वडूरा जि. प. शाळेत वर्गणीतून केले बोअर

## विद्यार्थ्यांची पाणी समस्या कायमची दूर; मुख्याध्यापकाचे यशस्वी प्रयत्न

**खल्लार/वार्ताहर**

नजिकच्या वडूरा येथिल जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा येथे पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग आहेत.या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्ण वेळ पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झालेली होती. विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी मिळावे यासाठी शाळेत बोअरवेलची असावे अशी संकल्पना शाळेचे मुख्याध्यापक विजय मकेश्वर यांच्या लक्षात आली .बोअरवेलसाठी येणाऱ्या खर्चाची पूर्तता मुख्याध्यापक मकेश्वर यांच्या पुढाकारातून करण्यात आल्याने विद्यार्थ्यांची पाणी समस्या कायमची दूर झाली आहे.



बोअरवेलसाठी येणारा खर्च कशातून करावा हा खरा प्रश्न निर्माण झाला होता. यासाठी विजय मकेश्वर यांनी माजी विद्यार्थी आणि समाजसेवक यांच्याशी संपर्क साधला.त्यांच्या प्रयत्नाला यश म्हणून चंडिकापूर येथिल समाजसेवक,उपसरपंच शिवसेनेचे (उबाठा) दर्यापूर तालुकाप्रमुख प्रमोद धनोकार यांनी स्वतःहून दहा हजार रुपये वडूरा गावाचे समाजसेवक जगदीश उंबरकर यांनी पाच हजार रुपये, वडूराचे सरपंच बाबुराव नितनवरे यांनी तीन हजार रुपये,गजानन नांदणे यांनी दोन हजार रुपये,ग्रामपंचायत अधिकारी सुनिल गावंडे यांनी दोन हजार रुपये दिले. या वर्गणीतून २२ हजार रुपये जमा झालेत. बोअरवेलचा खर्च ३२ हजार रुपये होता. जमा रक्कम २२ हजार होती.१० हजार रुपयाची अडचण निर्माण झाली होती.यात मुख्याध्यापक विजय मकेश्वर,विषय शिक्षिका वनमाला शेवतकर,सहाय्यक शिक्षिका मनिषा लोणकर यांनी १० हजार रुपयाची रक्कम जमा करुन बोअरवेलसाठी येणाऱ्या खर्चाची पूर्तता करुन शाळेत बोअरवेलचे काम पूर्ण केले. आता शाळेतील विद्यार्थ्यांची पिण्याच्या पाण्याची अडचण दूर झाली आहे.गावकऱ्यांचे, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य,तसेच गावातील समाजसेवक,शिक्षणप्रेमी ,शाळेविषयी तळमळ असणाऱ्या सर्वांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले.


# संक्षिप्त

## 'कलाविष्कार' वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम



**अमरावती-** अविष्कार नृत्य कला केंद्र पाचव्या वर्षात पदार्पण करत असल्याने 'कलाविष्कार' वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे २५ जूलै रोजी दुपारी ३ वाजता संचालिका अदिती मेहता यांनी केले आहे. हा कार्यक्रम नृत्य केंद्रातील विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आयोजित करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्यासाठी आणि गुरुपौर्णिमा तसेच आषाढी एकादशीच्या पावन पर्वाचा आनंद भक्तिमय वातावरणात साजरा करण्याची संधी या माध्यमातून मिळणार आहे. कार्यक्रमात कथ्थक,लोकनृत्य (फोक डान्स), सेमी-क्लासिकल नृत्य, अभंग, गजर, पसायदान आणि वारकरी परंपरेवर आधारित भावपूर्ण नृत्य-नाटिकेचे सादरीकरण करण्यात येणार आहे.गुरु-शिष्य परंपरेचा गौरव, संतपरंपरेतील भक्तीचा संदेश आणि भारतीय संस्कृतीचे जतन करत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, आत्मविश्वास वाढविणे व कला, संस्कार आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडविणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. कित्येक वर्षांची कलासाधना, गुरूंचे आशीर्वाद आणि वारीची भक्ती यांचा सुंदर संगम राहणार आहे.कार्यक्रमामध्ये वय वर्षे ४ पासून ते ६०–६५ पर्यंतच्या सर्व वयोगटातील विद्यार्थी-विद्यार्थिनींचे त्यांचे पालक या सर्वांचे भावपूर्ण व आकर्षक सादरीकरण होणार आहे.

## भगवान जगन्नाथ रथयात्रा शुक्रवारी



**अमरावती-** तिवसा येथील श्री श्री रुक्मिणी द्वारकानाथ मंदिर (इस्कॉन श्रीधाम कौंडण्यपूर) तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही शुक्रवार १७ जुलै रोजी जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे.जगन्नाथ रथयात्रेकरिता विधानसभा क्षेत्राचे आ.राजेश वानखडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.सोबतच महाराष्ट्रातील विविध भागातून सुद्धा अनेक वरिष्ठ भक्तांची मांदियाळी कौंडण्यपूर येथे येणार आहे. या रथयात्रेचे मुख्य यजमान म्हणून नागपूर येथील कांचन ठवकर यांना मान मिळाला आहे. जगन्नाथ रथयात्रेचा शुभारंभ सकाळी १०:०० वाजता होणार आहे त्यापूर्वी सकाळी ०८:३० वाजता पहनडी विजय कार्यक्रम संपन्न होईल. त्यानंतर ०९:०० वाजता भगवान जगन्नाथ, बलदेव, सुभद्रा महाराणी समवेत रथावर आरूढ होतील. त्यानंतर भगवान जगन्नाथ, बलदेव, सुभद्रा महाराणी यांना ५६ भोग अर्पण होईल आणि त्यानंतर महाआरती होईल. त्यासोबतच उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार समारंभ पार पडणार. त्यानंतर ०९:३० वाजता भगवान जगन्नाथ रथयात्रेचा शुभारंभ होईल. दुपारी २:०० वाजेपर्यंत रथयात्रा इस्कॉन कौंडण्यपूर येथे समापन येथे होणार आहे. जगन्नाथ रथयात्रेच्या समापनानंतर भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.

## बेलोरासह आजूबाजूच्या गावात वनप्राण्यांचा धुमाकूळ

**बेलोरा-** चांदूरबाजार तालुक्यातील बेलोरा, रिद्धपूर, बऱ्हाणपूर,चिंचोली काळे, वाठोंडा, राजुरा, बोराळा, बेसखेडा, तसेच आजूबाजूच्या परिसरात रानडुकराने शेतकऱ्यांनी पेरलेले तुरीचे पीक धोक्यात आले आहे.याशिवाय रोही, निलगाय, हरण, डुक्कर या वनप्राण्यांनी शेतकऱ्यांचे पेरलेले बियाणे फस्त केले आहे. वन्यप्राणी कळप सहित निघालेले रोपटे खात आहे. त्यामुळे शेतकऱ्याला रात्रंदिवस शेतात राहावे लागत आहे.

## बगीच्यात वृक्षारोपणाचा कार्यक्रम



**अमरावती-** संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने विवेकानंद कॉलनी अमरावती येथील गणपती मंदिर जवळच्या बगीच्यात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाला कॉलनाचे नगरसेवक व संस्थेच्या महिला सभासद उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या निमित्ताने पाण्याचं महत्त्व व बोअरवेल रिचार्ज करा आणि भूजल पातळी वाढवा असा संदेश जलक्रांती अभियान तर्फे देण्यात आला. कार्यक्रमात जलक्रांती अभियान हे पुस्तक व बहावाच्या बीया भेट दिल्या.

# १६ जुलैपासून डॉ. अर्जुन महानर यांचे बेमुदत अन्नत्याग आंदोलन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**



मेंढपाळ समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी चांदूर रेल्वे येथे मेंढपाळ समाजाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत समाजातील विविध समस्या, अडचणी आणि पुढील आंदोलनाची दिशा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.बैठकीत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला की, मेंढपाळ समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी व प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी डॉ. अर्जुन महानर हे १६ जुलैपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलनास सुरुवात करणार आहेत. शासनाने वारंवार निवेदने, पाठपुरावा आणि विनंत्या करूनही समाजाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याने हा लढा उभारण्यात येत असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

या आंदोलनाला संपूर्ण महाराष्ट्रातील मेंढपाळ समाजाने तन-मन-धनाने पाठिंबा द्यावा, मोठ्या संख्येने उपस्थित राहून समाजाच्या न्यायाच्या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. समाजाच्या हक्कांसाठी हा संघर्ष निर्णायक ठरणार असल्याचा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.बैठकीला मोठ्या संख्येने मेंढपाळ बांधव उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. अर्जुन नामदेवराव महानर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत आंदोलन यशस्वी करण्याचा निर्धार केला. शासनाने वेळेत सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही बैठकीत देण्यात आला.

# सरासरी पावसाचा भ्रम आणि विदर्भाचे वास्तव



✍ प्रदीप देशपांडे

**भा**रतीय शेतीसाठी पाऊस म्हणजे केवळ पाण्याचा स्रोत नाही; तो अर्थव्यवस्थेचा, अन्नसुरक्षेचा आणि ग्रामीण जीवनाचा कणा आहे. त्यामुळे मान्सूनच्या प्रगतीकडे देशाचे लक्ष लागलेले असते. मात्र यंदा समोर आलेले चित्र वेगळे आहे. राज्याच्या किंवा देशाच्या सरासरी पावसाचे आकडे समाधानकारक वाटत असले, तरी प्रत्यक्षात शेतात उभ्या असलेल्या पिकांची अवस्था वेगळी कथा सांगत आहे. कारण यंदाचा सर्वात मोठा प्रश्न **पाऊस कमी पडण्याचा नाही, तर तो अनियमित आणि असमान पडण्याचा आहे.**

सीआरआयएसआयएलच्या ताज्या अहवालाने याच धोक्याकडे स्पष्ट बोट ठेवले आहे.एल-निनोच्या प्रभावामुळे यंदाचा मान्सून सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता व्यक्त करताना अहवालात खरीप हंगामापुढील सर्वात मोठा धोका म्हणजे **असमान पावसाचे वितरण** असल्याचे नमूद करण्यात आले आहे. काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत दीर्घ कोरडे खंड हेच नव्या मान्सूनचे वास्तव ठरत आहे.

**सर्वाधिक फटका विदर्भाला**

जून महिन्याच्या बहुतांश काळात विदर्भ अक्षरशः पावसाच्या प्रतीक्षेत होता. अनेक जिल्ह्यांत ६० ते ८० टक्क्यांपर्यंत पावसाची तूट नोंदली गेली. बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये पेरण्या रखडल्या. अनेक शेतकऱ्यांनी पहिल्या पावसावर धाडसाने पेरणी केली; पण त्यानंतर आलेल्या दीर्घ खंडामुळे उगवलेली रोपे करपण्याची वेळ आली.

यानंतर जुलैच्या सुरुवातीला मुसळधार पावसाने राज्याचा सरासरी पावसाचा तुटवडा भरून निघाला. सरकारी आकडे सुधारले. महाराष्ट्र सरासरीच्या जवळ पोहोचला. पण प्रश्न असा आहे की, या आकड्यांचा विदर्भातील शेतकऱ्याला नेमका काय उपयोग? कारण ज्या भागात पेरणीच्या वेळी पाऊस हवा होता, तिथे तो नव्हता; आणि जिथे नंतर पाऊस झाला, तिथे तो अनेकदा अतिवृष्टीच्या स्वरूपात झाला. कृषीशास्त्र सांगते की पिकांना एकाच वेळी पडणारा मुसळधार पाऊस नव्हे, तर योग्य वेळी आणि सातत्याने पडणारा पाऊस आवश्यक असतो.

विदर्भातील कापूस, सोयाबीन आणि तूर ही पिके विशेषतः पावसाच्या सातत्यावर अवलंबून आहेत.

पेरणीनंतर दोन-तीन आठवड्यांचा कोरडा खंड आला तर उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होतो. त्यानंतर अचानक अतिवृष्टी झाली, तरी नुकसान भरून निघत नाही. उलट जमिनीतील पोषणद्रव्ये वाहून जातात, रोगराई वाढते आणि कीड नियंत्रणाचा खर्च वाढतो.

सीआरआयएएस आयएलनेही यंदा पावसाबरोबरच कीड आणि खतपुरवठ्याच्या समस्यांकडे इशारा दिला आहे. म्हणजेच संकट केवळ हवामानाचे नाही; तर संपूर्ण कृषी अर्थव्यवस्थेचे आहे.

विदर्भाच्या संदर्भात आणखी एक गंभीर बाब म्हणजे सिंचनाची मर्यादित उपलब्धता. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांना धरणे आणि कालव्यांचा आधार आहे. त्यामुळे पावसातील खंड काही प्रमाणात भरून काढता येतो. परंतु विदर्भातील मोठा शेतीक्षेत्र आजही पावसावरच अवलंबून आहे. त्यामुळे पावसातील प्रत्येक खंड हा थेट शेतकऱ्याच्या उत्पन्नावर घाव घालतो.

हवामान बदलामुळे मान्सूनचे स्वरूपही बदलत आहे. पूर्वी चार महिने कमी-अधिक प्रमाणात पाऊस पडायचा. आता काही दिवसांत महिनाभराचा पाऊस कोसळतो आणि त्यानंतर आठ-दहा दिवसांचा कोरडा कालावधी येतो. अशा परिस्थितीत 'सरासरी पाऊस' हा निकषच दिशाभूल करणारा ठरतो. शेतीसाठी पावसाचे एकूण प्रमाण नव्हे, तर त्याचे वेळेवर आणि समप्रमाणात वितरण महत्त्वाचे असते.

यामुळे सरकारनेही केवळ राज्याच्या सरासरी पावसाच्या आकड्यांवर समाधान मानण्याऐवजी जिल्हानिहाय आणि तालुकानिहाय परिस्थितीचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

विशेषतः विदर्भातील पिकांची स्थिती, पुनर्पेरणीची गरज, बियाणे उपलब्धता, पीकविमा दावे आणि आर्थिक मदतीसंदर्भात तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे.

विदर्भातील शेतकऱ्याची खरी भीती दुष्काळाची नाही; तर बेभरवशाच्या पावसाची आहे.

कारण दुष्काळ दिसतो, त्यावर उपाययोजना करता येतात. पण अनियमित पाऊस शेतकऱ्याला प्रत्येक टप्प्यावर नवे संकट देतो. सरकारच्या अहवालात राज्याचा पाऊस 'सामान्य' असू शकतो; पण विदर्भातील शेतकऱ्याच्या आयुष्यात तो अजूनही असामान्यच आहे. **सरासरी पावसाचे आकडे कागदावर हिरवे दिसू शकतात; मात्र शेतातील पिके केवळ आकड्यांवर नव्हे, तर वेळेवर पडणाऱ्या प्रत्येक थेंबावर जगत असतात. आणि यंदा त्या प्रत्येक थेंबाची सर्वाधिक प्रतीक्षा विदर्भानेच केली आहे.**

# बंधमुक्त इथेनॉल : आजची घोषणा नव्हे

## शरद जोशीं साहेबांची दोन दशकांपूर्वीची दूरदृष्टी



✍ विलास तुळशीराम ताथोड

**आ**ज देशभर इथेनॉलची चर्चा सुरू आहे. केंद्र सरकार २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य जाहीर करते, राज्य सरकारे इथेनॉल प्रकल्पांना प्रोत्साहन देतात, उद्योगपती गुंतवणूक जाहीर करतात आणि अनेक राजकीय नेते इथेनॉलला शेतकऱ्यांच्या समृद्धीचा नवा मार्ग म्हणून मांडतात. या चर्चेत एक मूलभूत प्रश्न मात्र अनेकदा दुर्लक्षित राहतो,हा विचार प्रथम कोणी मांडला?

इतिहासाचा प्रामाणिक अभ्यास केला तर उत्तर स्पष्ट मिळते. शेतकरी संघटनेचे संस्थापक, युगद्रष्टे नेते आदरणीय शरद जोशी यांनी जवळपास दोन दशकांपूर्वीच 'बंधमुक्त इथेनॉल' ही संकल्पना देशासमोर मांडली होती. त्यांनी इथेनॉलला केवळ पर्यायी इंधन म्हणून नव्हे, तर शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा,भारताच्या ऊर्जा स्वावलंबनाचा आणि ग्रामीण विकासाचा महामार्ग म्हणून पाहिले होते.

सन २००८ मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या शेतकरी संघटनेच्या ११व्या संयुक्त अधिवेशनात 'बंधमुक्त इथेनॉल' हा प्रमुख विषय होता. त्या अधिवेशनातील संदेश आजही तितकाच समर्पक वाटतो.त्यावेळी काढलेल्या पोस्टरवर मोठ्या अक्षरांत लिहिले होते.'महागडे पेट्रोल,बेरोजगारी व शेतकऱ्यांच्या दारिद्र्यावर रामबाण उपाय-बंधमुक्त इथेनॉल.'आज ज्या गोष्टी सरकारे धोरण म्हणून सांगत आहेत, त्या शरद जोशी यांनी तेव्हाच स्पष्ट केल्या होत्या.

शरद जोशींची दूरदृष्टी

शरद जोशी हे केवळ शेतकरी नेते नव्हते; ते अर्थकारणाचे सखोल अभ्यासक होते. जगभरातील कृषी धोरणे, मुक्त बाजारपेठ, ऊर्जा अर्थशास्त्र आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यांचा त्यांनी अभ्यास केला होता. त्यांना समजले होते की भारतातील शेतकरी केवळ धान्य उत्पादनावर अवलंबून राहिला, तर त्याचे उत्पन्न मर्यादित राहणार. शेतकऱ्याला नवे बाजार, नवी उत्पादने आणि मूल्यवर्धनाची संधी मिळाली पाहिजे.त्यातूनच त्यांनी 'शेततेल' ही संकल्पना मांडली. त्यांच्या मते शेतकरी फक्त अन्नदाता नसून तो देशाचा ऊर्जादाताही बनू शकतो. शेतात उगवणारे पीक केवळ अन्न म्हणून नव्हे तर इंधन म्हणूनही वापरले जाऊ शकते. यामुळे शेतकऱ्याला उत्पादनासाठी पर्यायी बाजारपेठ मिळेल आणि देशाचे परकीय चलनही वाचेल.

इथेनॉल म्हणजे नेमके काय?

इथेनॉल हे वनस्पतीजन्य कच्च्या मालापासून तयार होणारे जैवइंधन आहे. ऊस, मका, ज्वारी, साखरबीट, तुटलेले धान्य, खराब दर्जाचे धान्य आणि इतर अनेक कृषी उत्पादनांपासून ते तयार करता येते. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्याने इंधन आयात कमी होते, प्रदूषण कमी होते आणि स्थानिक शेतीला नवा बाजार मिळतो.शरद जोशींची भूमिका स्पष्ट होती.इथेनॉल उत्पादनावर सरकारी बंधने नसावीत. परवाने, कोटा, नियंत्रण आणि मक्तेदारी यामुळे शेतकऱ्यांचा विकास होत नाही. शेतकऱ्याला मुक्तपणे उत्पादन आणि विक्री करण्याचा अधिकार हवा. म्हणूनच त्यांनी 'बंधमुक्त इथेनॉल' हा शब्द वापरला.

**पेट्रोल आयातीवरचा भार**

भारत दरवर्षी मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करतो. यासाठी लाखो कोटी रुपये परदेशात जातात. याचा परिणाम व्यापार तूट,रुपयावरील दबाव आणि इंधनाच्या वाढत्या किमतींवर होतो.शरद जोशी यांनी हा प्रश्न फार आधी ओळखला होता. त्यांच्या मते, ज्या देशात लाखो शेतकरी आहेत, सुपीक जमीन आहे आणि विविध पिके घेण्याची क्षमता आहे, त्या देशाने इंधनासाठी पूर्णपणे परदेशावर अवलंबून राहणे योग्य नाही. इंधनाचा काही भाग शेतकरीच तयार करू शकतो. आज ऊर्जा स्वावलंबन हा राष्ट्रीय विषय झाला आहे. पण शरद जोशींनी त्याचा विचार अनेक वर्षांपूर्वी केला होता.

**शेतकऱ्याला हमीची बाजारपेठ**

भारतीय शेतीतील सर्वात मोठी समस्या म्हणजे उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. कधी कांदा रस्त्यावर फेकावा लागतो, कधी टोमॅटो, कधी मका, कधी ज्वारी. उत्पादन वाढले की भाव पडतो आणि शेतकरी अडचणीत येतो.इथेनॉल उद्योगामुळे या पिकांना पर्यायी बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. जर धान्य किंवा इतर पिकांना अन्न बाजारपेठेत भाव नसेल, तर त्यांचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी करता येईल. त्यामुळे भाव कोसळण्याची शक्यता कमी होते.हीच शरद जोशींची आर्थिक विचारसरणी होती. स्पर्धात्मक बाजारपेठ निर्माण झाली की शेतकऱ्याचा माल स्वस्तात विकला जात नाही.

**ग्रामीण भागात उद्योग**

इथेनॉल उद्योग म्हणजे केवळ कारखाना नाही. त्याच्याशी वाहतूक, प्रक्रिया, साठवण, तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, देखभाल, रोजगार आणि सेवा क्षेत्र जोडलेले असते. त्यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होऊ शकतो. आज बेरोजगारीवर चर्चा होते. शरद जोशी यांनी त्यावरही उपाय सुचवला होता. त्यांनी सांगितले होते की शेतीला उद्योगाशी जोडले तर रोजगार शहरात नव्हे, गावात निर्माण होईल.

**पर्यावरणपूरक विकास**

आज जग कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहे. जैवइंधनाचा वापर वाढविण्यावर भर दिला जात आहे. इथेनॉल हे तुलनेने स्वच्छ इंधन मानले जाते.शरद जोशींच्या काळात 'कार्बन न्यूट्रॅलिटी' ही संकल्पना इतकी लोकप्रिय नव्हती. तरीही त्यांनी पर्यावरणपूरक ऊर्जा आणि शेती यांचा संबंध ओळखला होता. त्यामुळे त्यांची विचारसरणी आज अधिकच महत्त्वाची वाटते.

**केवळ ऊस नव्हे**

अनेकांना वाटते इथेनॉल म्हणजे फक्त ऊस. पण शरद जोशींचा विचार त्यापेक्षा व्यापक होता. त्यांनी विविध पिकांपासून इथेनॉल निर्मितीची संधी पाहिली. महाराष्ट्रातील कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांनाही या उद्योगाचा लाभ मिळावा, अशी त्यांची भूमिका होती.यामुळे विविध भागातील शेतीला नवे आर्थिक बळ मिळू शकले असते.

**सरकारची भूमिका आणि वास्तव**

आज सरकार इथेनॉल मिश्रण वाढविण्याचा प्रयत्न करत आहे. हे स्वागतार्ह आहे. मात्र, जर इथेनॉल उद्योग काही मोजक्या कंपन्या किंवा कारखान्यांपुरता मर्यादित राहिला, तर त्याचा पूर्ण फायदा शेतकऱ्याला मिळणार नाही.शरद जोशींची मागणी वेगळी होती. शेतकऱ्यालाच उत्पादन, प्रक्रिया आणि विक्रीचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. सरकारने नियंत्रक नव्हे तर सुलभकर्ता असले पाहिजे.

**आजची गरज**

आज शेतकऱ्याचे उत्पन्न वाढवायचे असेल तर केवळ अनुदान, कर्जमाफी किंवा नुकसानभरपाई पुरेशी नाही. शेतकऱ्याला बाजारपेठ, तंत्रज्ञान आणि मूल्यवर्धनाची संधी द्यावी लागेल.इथेनॉल हा त्यातील एक महत्त्वाचा मार्ग आहे. पण तो खऱ्या अर्थाने यशस्वी होईल, जेव्हा शेतकरी त्याचा केंद्रबिंदू असेल.

**इतिहासाचे स्मरण आवश्यक**

आज अनेक नेते इथेनॉलबाबत बोलत आहेत. त्यात काही चुकीचे नाही. पण या विचाराचा इतिहास सांगणेही तितकेच आवश्यक आहे. कारण ज्या कल्पनेची आज अंमलबजावणी होत आहे, तिचे बीजारोपण शरद जोशी यांनी अनेक वर्षांपूर्वी केले होते.२००८ च्या औरंगाबाद अधिवेशनातील 'बंधमुक्त इथेनॉल'चा नारा हा केवळ घोषवाक्य नव्हता; तो भारतीय शेतीच्या भविष्याचा आराखडा होता.

शरद जोशी यांची विचारसरणी नेहमीच काळाच्या पुढे होती. त्यांनी शेतीला उद्योगाशी जोडण्याचा आग्रह धरला, शेतकऱ्याला जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवून देण्याची भूमिका घेतली, तंत्रज्ञानाचे स्वागत केले आणि ऊर्जा क्षेत्रातही शेतकऱ्याचा सहभाग असावा, अशी भूमिका मांडली.

आज इथेनॉल हा राष्ट्रीय चर्चेचा विषय आहे. पण या चर्चेची खरी सुरुवात कुठे झाली, हे विसरून चालणार नाही. बंधमुक्त इथेनॉल ही केवळ इंधनाची संकल्पना नव्हती; ती शेतकऱ्याच्या आर्थिक स्वातंत्र्याची, मुक्त बाजारपेठेची आणि ग्रामीण भारताच्या पुनरुत्थानाची संकल्पना होती.

आज गरज आहे ती केवळ इथेनॉलचा वापर वाढविण्याची नाही, तर शरद जोशी यांनी मांडलेल्या मूळ तत्त्वांचा स्वीकार करण्याची शेतकऱ्याला उत्पादनाचे, प्रक्रिया उद्योगाचे आणि बाजारपेठेचे संपूर्ण स्वातंत्र्य देण्याची. कारण शेतकरी सक्षम झाला, तरच भारत खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि ऊर्जा स्वावलंबी बनेल.

आजचे इथेनॉल धोरण हे जर शेतकऱ्याच्या हातात आर्थिक सत्ता देणारे ठरले, तरच शरद जोशी यांच्या 'शेततेल' आणि 'बंधमुक्त इथेनॉल' या दूरदर्शी स्वप्नाला खरी आदरांजली ठरेल.

राज्य कार्यकारणी सदस्य, शेतकरी संघटना
अकोला
मो.नं.७०२०५८५२६१

# सोनम वांगचूक यांना मरू द्यायचे का....?



✍ हेरंब कुलकर्णी

**सो**नम वांगचुक यांच्या उपोषणाचा आज १६ वा दिवस आहे. त्यांचे वजन जवळपास आठ किलो कमी झाले आहे. आता रक्तदाबही घसरतो आहे. धोक्याच्या पातळीकडे त्यांची वाटचाल सुरू झाली आहे.. २०तारखेला संसदेवर मोर्चा आहे परंतु त्यासाठी अजून ७ दिवस ते तग धरतील का?इतका गंभीर प्रश्न त्यांची प्रकृती बघितल्यावर वाटतो.

७०० शेतकरी मृत्यू पावले तरीही शेतकरी आंदोलनाची दखल न घेतलेले सरकार वांगचुक यांच्यासाठी चर्चा करून माघार घेईल ही शक्यता आता अजिबात दिसत नाही.. सरकारचे वागणे त्यांच्या पूर्वीच्या असंवेदनशील वागण्याशी सुसंगतच आहे पण सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे ज्या २२लाख नीट परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी वांगचुक यांनी प्राण पणाला लावले आहेत ते २२लाख विद्यार्थी कुठे आहेत?

हा माणूस आपल्यासाठी आज मृत्यूकडे निघाला असेल तर २२ लाख विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांनी सक्रिय व्हायला नको का?प्रत्येक मोठ्या शहरात नीटच्या विद्यार्थ्यांनी पाठिंबा व्यक्त करणारे निदर्शने साखळी उपोषण केले असते तरीही वांगचुक यांच्या आंदोलनाला यथार्थता प्राप्त झाली असती... आज कुठूनच प्रतिसाद न आल्याने सरकार विरुद्ध वांगचुक असे होऊन तो विषय दुर्लक्षित करणे अधिक सोपे झाले आहे.

पहिल्या दिवशी कॉकरोच पार्टीच्या आंदोलनाची प्रचंड दखल देणाऱ्या माध्यमांनी ही आता पाठ फिरवली आहे. त्यामुळे वांगचुक यांच्या आंदोलनाचा हेतूच आता दुर्लक्षित होत आहे. अशावेळी त्यांनी आज उपोषण मागे घेऊन वीस तारखेच्या आंदोलनावर लक्ष केंद्रित करावे कारण सध्याची प्रकृती पाहता वीस तारखेपर्यंत पोहोचणे कठीण वाटते...

ज्यांच्यासाठी लढायचे तो विद्यार्थी वर्ग जर असा वागणार असेल तर इथून पुढे कोणीही सामाजिक व्यक्ती अशी आंदोलने करेल का? हा सगळ्यात गंभीर प्रश्न पडतो. बावीस लाख मुले परीक्षा देतात त्यातली काही मुले आत्महत्या करतात माध्यमे हा प्रश्न उचलून धरतात पण आपल्यासाठी एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचा माणूस प्राण पणाला लावतो आहे, यासाठी २२लाखातील विद्यार्थी आणि त्यांचे पालक याकडे दुर्लक्ष करतात हे संतापजनक आहे..

कॉंग्रेस पक्षासह अपवाद वगळता प्रमुख राजकीय पक्षांनी याकडे जे दुर्लक्ष केले आहे तेही अनाकलनीय आहे. कॉकरोच पार्टी हा काही स्पर्धक ठरणार नाही किंवा जरी स्पर्धक म्हणून पुढे आला तरी वांगचूक स्वतंत्र भूमिका असलेली व्यक्ती आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आदरस्थानी असलेल्या या माणसाला सर्व राजकीय पक्षांनी समर्थन द्यायला हवे.. पण विरोधी पक्षांची भूमिकाही अनाकलनीय आहे.उपोषण हे हृदय परिवर्तन करणारे शस्त्र आहे .समोरच्यावर जर त्याचा परिणाम होणार नसेल तर त्या शस्त्राचा वापर थांबवून प्रतिष्ठेचा प्रश्न आहे थांबवायला हवा व जनतेमध्ये जाऊन आपली भूमिका मांडायला हवी.वांगचुक या देशाला हवे आहेत. विद्यार्थी असे का वागतात? जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन विद्यार्थी चळवळीने उभे केले होते.

आसाममध्ये विद्यार्थी चळवळीने पुढाकार घेऊन तेथे तर विद्यार्थ्यांचे सरकार आले होते विद्यार्थी वर्ग जर इतका उदासीन असेल,त्याला स्वप्न पडणार नसतील,चुकीला चूक म्हणावे वाटत नसेल तर देशाचे भवितव्यच चिंताजनक बनेल..

# न्यायासनाचा मान आणि वकिलीचा स्वाभिमान



## न्यायासाठी संघर्ष की अहंकारासाठी?

✍ ॲड. धनंजय देशमुख

**न्या**यालयात न्यायाधीश आणि वकील यांच्यात होणारी शाब्दिक चकमक ही वैयक्तिक संघर्ष नसते; ती न्यायाच्या शोधाची प्रक्रिया असते. ज्या न्यायालयात प्रश्न विचारले जात नाहीत,जिथे युक्तिवाद होत नाही, जिथे कायद्याची कसोटी लागत नाही, तिथे न्याय नव्हे तर केवळ औपचारिकता उरते. विचारांच्या संघर्षातूनच सत्य अधिक स्पष्ट होते आणि न्याय अधिक सक्षम बनतो.

सृष्टीचाच नियम आहे.दोन तारे भिडल्याशिवाय तिसरा तारा निर्माण होत नाही. त्याचप्रमाणे दोन भिन्न कायदेशीर विचारांची टक्कर झाली, तर्कांची परीक्षा झाली आणि तथ्यांची कसोटी लागली, तरच न्यायाचा प्रकाश अधिक तेजस्वी होतो.त्यामुळे न्यायालयातील मतभेद हे व्यक्तींमध्ये नसून विचारांमध्ये असावेत. न्यायालयात आवाजाचा विजय नसतो; कायदा, तर्क आणि विवेक यांचा विजय असतो.

वकिलाचे कर्तव्य न्यायालयाला खूश करणे नाही; तर कायदा, पुरावे आणि सत्य निर्भयपणे न्यायालयासमोर मांडणे हे आहे. न्यायाधीशांचे कर्तव्य वकिलाला गप्प बसवणे नाही; तर प्रत्येक युक्तिवाद संयमाने ऐकून कायदा आणि पुराव्यांच्या आधारे न्याय देणे हे आहे. या प्रक्रियेत कठोर प्रश्न विचारले जाऊ शकतात, तीव्र प्रतिवाद होऊ शकतो, पण त्यामागे न्यायाचा हेतू असला पाहिजे; अहंकाराचा नव्हे.

न्यायाधीश हे अत्यंत सन्माननीय घटनात्मक पदावर असतात. त्यांच्या पदाचा आदर हा प्रत्येक वकिलाचा धर्म आहे. परंतु आदर म्हणजे अंधस्वीकार नव्हे. न्यायालयात कायद्याच्या चौकटीत प्रश्न विचारणे, निर्णयातील त्रुटी दाखवून देणे, विरोधी मत मांडणे आणि आवश्यक असल्यास अपील किंवा पुनर्विचार मागणे हे वकिली व्यवसायाचे मूलभूत कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे वकिलांनीही न्यायालयीन शिष्टाचार, संयम आणि भाषेची मर्यादा कधीही सोडू नये.न्यायासन म्हणजे व्यक्ती नव्हे; ते संविधानाने दिलेल्या न्यायदानाच्या अधिकाराचे आणि निष्पक्ष न्याय देण्याच्या कर्तव्याचे प्रतीक आहे. न्यायासन हे सत्तेचे सिंहासन नाही, तर संविधान, कायदा आणि विवेक यांच्या अधीन राहून न्याय करण्याचे पवित्र व्यासपीठ आहे. त्या आसनाचा मान व्यक्तीमुळे नसतो; त्या आसनावरून दिल्या जाणाऱ्या निष्पक्ष न्यायामुळे असतो.

लोकशाहीत कोणतीही व्यक्ती, कोणतेही पद किंवा कोणतीही संस्था संविधानापेक्षा मोठी नाही. भारताच्या राज्यघटनेच्या उद्देशिकेची सुरुवात 'We, the People of India' या शब्दांनी होते. या चार शब्दांत भारतीय लोकशाहीचे संपूर्ण तत्त्वज्ञान सामावलेले आहे. याचा अर्थ भारताची सार्वभौम सत्ता जनतेमध्ये निहित आहे. न्यायपालिका, विधिमंडळ आणि कार्यपालिका या तिन्ही संस्था संविधानाने दिलेल्या अधिकारांच्या मर्यादेत कार्य करतात. संविधान हेच सर्वोच्च आहे; व्यक्ती नव्हे.

न्यायालय हे जनकल्याणासाठी आहे. ते कोणत्याही व्यक्तीचे साम्राज्य नाही आणि कोणत्याही वकिलाची वैयक्तिक रंगभूमीही नाही. न्यायासनाचा मान राखणे जितके आवश्यक आहे, तितकेच वकिलीच्या स्वाभिमानाचे रक्षण करणेही आवश्यक आहे. कारण न्यायाधीश आणि वकील हे न्यायरथाची दोन चाके आहेत. एक चाक दुसऱ्याला कमी लेखू लागले, तर न्यायाचा प्रवास अडखळतो.

कधी कधी न्यायाधीशांनीही हे लक्षात ठेवले पाहिजे की कठोर प्रश्न विचारणारा प्रत्येक वकील न्यायालयाचा विरोधक नसतो; तो न्यायाचा शोध घेणारा असतो. आणि वकिलांनीही हे समजून घेतले पाहिजे की प्रत्येक प्रतिकूल निरीक्षण हा वैयक्तिक अपमान नसतो; तो न्यायप्रक्रियेचा एक भाग असू शकतो. परस्पर आदर, कायद्यावरील निष्ठा आणि संयम या तीन मूल्यांवरच न्यायव्यवस्थेचा पाया उभा आहे.

एखादा निर्णय झाला म्हणजे न्याय पूर्ण झाला, असे नेहमीच म्हणता येत नाही. म्हणूनच अपील, पुनर्विचार आणि पुनरावलोकन यांसारख्या घटनात्मक व्यवस्था अस्तित्वात आहेत. जर चूक झाली असेल, तर ती दुरुस्त करण्याचे धैर्यही न्यायव्यवस्थेकडे असले पाहिजे. कारण न्यायव्यवस्थेचे अंतिम ध्येय केवळ निर्णय देणे नसून योग्य आणि न्याय्य निर्णय देणे हे आहे.

न्यायालयातील युक्तिवाद हा अहंकाराचा संघर्ष नसून कायद्याच्या ज्ञानाची देवाणघेवाण आहे. न्यायासनाचा मान अबाधित राहिला पाहिजे; पण वकिलीचा स्वाभिमानही तितकाच जपला गेला पाहिजे. न्यायालयात भीतीचे वातावरण नसावे; कायद्याचा आदर असावा. व्यक्तिपूजा नसावी; संविधानपूजा असावी. वकील हा न्यायालयाचा अधिकारी आहे, तर न्यायाधीश हा संविधानाचा विश्वस्त आहे. दोघांनीही हे लक्षात ठेवले पाहिजे की त्यांच्या प्रत्येक शब्दाकडे एक सामान्य नागरिक आशेने पाहत असतो.

शेवटी, विजय न्यायाधीशांचा किंवा वकिलांचा नसतो; विजय न्यायाचा असतो.

न्यायव्यवस्थेचा खरा गौरव तेव्हाच वाढतो, जेव्हा न्यायासनावर बसणारा न्यायाधीश आणि न्यायासाठी उभा राहणारा वकील दोघेही स्वतःपेक्षा संविधानाला मोठे मानतात. कारण भारतात सर्वोच्च जर कोणी असेल, तर ते ना एखादी व्यक्ती आहे, ना एखादे पद सर्वोच्च आहे भारतीय संविधान आणि त्यामागील सार्वभौम जनता 'We, the People of India.'

मो.९२८४३८२१०२

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सच

अकोला
जिल्हा विशेष

# लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषणाचा आरोप ; पोलिस कर्मचाऱ्यावर गुन्हा

**– विवाहास नकारानंतर तरुणीचा आत्महत्येचा प्रयत्न**
**– प्रकृती चिंताजनक, कर्मचारी सुटीवर जाऊन बेपत्ता**

■ प्रतिनिधी | बाळापूर ■

अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथे एका पोलिस कर्मचाऱ्यावर घरमालकाच्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, या प्रकरणी बाळापूर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवाहाचे आश्वासन देऊन संबंध प्रस्थापित केल्यानंतर लग्नास नकार दिल्याने मानसिक धक्का बसलेल्या तरुणीने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.



पोलिसांकडे दाखल झालेल्या तक्रारीनुसार, तक्रारदाराच्या घरात भाडेकरू म्हणून राहणारा पोलिस कर्मचारी पवन वडगावे याने त्यांच्या मुलीशी विवाह करण्याचे आश्वासन दिले होते. त्या विश्वासावर त्याने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही काळानंतर संबंधित तरुणीने विवाहाचा आग्रह धरल्यानंतर आरोपीने लग्नास नकार दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या घटनेमुळे तरुणी तीव्र मानसिक तणावाखाली गेली. नैराश्याच्या भरात तिने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, कुटुंबीयांनी वेळीच धाव घेतल्याने तिचा जीव वाचला. तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

पीडित तरुणीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून बाळापूर पोलिसांनी पोलिस कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक अर्चित चांडक व बाळापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. तपासात समोर येणाऱ्या पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**▶▶ गुन्हा दाखल होताच कर्मचाऱ्याचा पळ**

या प्रकरणाची कुणकुण लागताच संबंधित पोलिस कर्मचारी दोन-तीन दिवसांपूर्वी रजेवर गेला आणि त्यानंतर बेपत्ता झाल्याची माहिती आहे. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली असून, नातेवाईक व परिचितांकडे चौकशी सुरू आहे. आरोपीला लवकरच ताब्यात घेण्याच्या हालचाली पोलिसांनी वेगाने सुरू केल्या आहेत.

**▶▶ पोलिस दलाच्या प्रतिमेवर पुन्हा प्रश्नचिन्ह**

नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या पोलिस दलातील कर्मचाऱ्यावरच अशा स्वरूपाचे गंभीर आरोप झाल्याने बाळापूरसह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अलीकडील काळात पोलिस कर्मचाऱ्यांशी संबंधित काही वादग्रस्त प्रकरणे समोर आल्याने पोलिस दलाच्या प्रतिमेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. मात्र, या प्रकरणात तपास पूर्ण होऊन न्यायालयीन प्रक्रियेनंतरच आरोपांचे सत्य स्पष्ट होणार आहे.

# बोगस सोयाबीन बियाणेप्रकरणी आर्थिक फसवणुकीचे गुन्हे दाखल करा

## बाधित शेतकऱ्यांना एकरी ४८ हजार रुपये भरपाईची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात खरीप हंगामात बोगस सोयाबीन बियाण्यांच्या कथित पुरवठ्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणातील संबंधित कंपन्यांवर आर्थिक फसवणुकीचे अजामीनपात्र गुन्हे दाखल करावेत, तसेच बाधित शेतकऱ्यांना संबंधित कंपन्यांकडून प्रति एकर ४८ हजार रुपये नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर यांनी केली. यासंदर्भात सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी प्रशासनाला विविध सूचना दिल्या.



या बैठकीस जिल्हाधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी, कृषी निविष्ठा विक्रेते, बियाणे उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, शेतकरी तसेच मूर्तिजापूरचे आमदार हरीश पिंपळे उपस्थित होते. अकोला, मूर्तिजापूर आणि बार्शीटाकळी तालुक्यांतील अनेक शेतकऱ्यांना निकृष्ट अथवा बोगस सोयाबीन बियाण्यांचा फटका बसल्याने उगवण न झाल्याची प्रकरणे समोर आली असून, त्यामुळे अनेकांना दुबार पेरणी करावी लागल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

आमदार सावरकर यांनी कृषी विभागाच्या कार्यपद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित केले. बियाण्यांच्या नमुन्यांची वेळेत तपासणी न होणे,

**आमदार रणधीर सावरकर यांची प्रशासनाला सूचना**

'साथी' पोर्टलवर नोंदणी नसतानाही बियाण्यांची विक्री होणे आणि कारवाईस विलंब झाल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. या संदर्भात संबंधित अधिकारी आणि बियाणे विक्री करणाऱ्या यंत्रणांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी त्यांनी मागणी केली.

तसेच बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांचे स्वरूप अधिक गंभीर करून आर्थिक फसवणुकीचे अजामीनपात्र गुन्हे दाखल करावेत, संपूर्ण प्रकरणाची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडे (ईओडब्ल्यू) सोपवावी आणि दोषी कंपन्यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करावी, अशीही मागणी त्यांनी केली.

बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे आणि जिल्ह्यातील बोगस बियाण्यांच्या विक्रीचा सविस्तर अहवाल तयार करून जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बियाण्यांची विक्री करताना आवश्यक पडताळणी करण्याची जबाबदारी विक्रेते आणि संबंधित अधिकाऱ्यांनी पार पाडावी, असेही सावरकर यांनी नमूद केले. बैठकीत आमदार हरीश पिंपळे यांनीही शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांसह संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, कृषी विभागाच्या कामकाजातील त्रुटींची दखल घेत संबंधित बाबींची तपासणी करून आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असे बैठकीत प्रशासनाकडून सांगण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

> 'शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर कारवाईस विलंब होणे योग्य नाही. बोगस बियाण्यांमुळे झालेल्या नुकसानीबाबत संबंधित कंपन्यांना जबाबदार धरून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल.'
>
> **आ. रणधीर सावरकर,**
> अकोला पूर्व मतदारसंघ

# जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस तेल्हाऱ्यात ; निकृष्ट बियाण्यांच्या घावाने बळीराजा दुहेरी संकटात !

**९८९.८ मिमी पावसाने शेतीला जीवदान; पण उगवण फसल्याने दुबार पेरणीचा डोंगर, शेतकऱ्यांचा संताप अनावर**



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

यंदाच्या खरीप हंगामात अकोला जिल्ह्यात सर्वाधिक पावसाची नोंद तेल्हारा तालुक्यात झाली. जून महिन्यापासून आतापर्यंत तब्बल ९८९.८ मिमी पाऊस कोसळल्याने सुरुवातीला शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. वेळेत पाऊस झाल्याने सोयाबीन, कापूस आणि अन्य खरीप पिकांच्या पेरण्या मोठ्या प्रमाणात पूर्ण झाल्या. मात्र, या आनंदावर निकृष्ट सोयाबीन बियाण्यांनी अक्षरशः पाणी फेरले असून, बळीराजा आता 'सर्वाधिक पाऊस' आणि 'बोगस बियाणे' या दुहेरी संकटाच्या कात्रीत सापडला आहे.

यंदा निसर्गाने साथ दिली, पण बियाण्यांच्या गुणवत्तेने दगा दिल्याचे चित्र तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाहायला मिळत आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात सोयाबीनची उगवण अत्यंत कमी झाली, तर काही ठिकाणी उगवणच झाली नाही. परिणामी, हजारो रुपयांचा अतिरिक्त खर्च करून शेतकऱ्यांना पुन्हा दुबार पेरणी करावी लागली. आधीच उत्पादन खर्च, खतांचे वाढते दर आणि आर्थिक अडचणींनी होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर हा आणखी एक मोठा घाव ठरला आहे.

काही भागांत मुसळधार पावसामुळे पेरण्या वाहून गेल्या, तर अनेक ठिकाणी निकृष्ट बियाण्यांमुळे उगवण फसली. म्हणजेच, पाऊस झाला तरी संकट आणि बियाणे निकृष्ट निघाले तरी संकट, अशी दुहेरी कोंडी शेतकऱ्यांसमोर उभी राहिली आहे. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम अनेकांसाठी आर्थिकदृष्ट्या अधिकच कडू ठरत असल्याचे वास्तव समोर आले आहे. दरम्यान, निकृष्ट बियाण्यांविरोधात कृषी विभागाकडे तक्रारींचा ओघ वाढत असून, संबंधित कंपन्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी तीव्र होत आहे. शेतकऱ्यांनी नुकसानभरपाईची मागणीही लावून धरली आहे. कृषी विभागाने केवळ पंचनाम्यांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष शेतात जाऊन उगवणीची पाहणी करावी, दोषी कंपन्यांवर दंडात्मक कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. सध्या पिकांची स्थिती काही प्रमाणात सुधारलेली दिसत असली, तरी हवामानातील अनिश्चितता कायम आहे. पुढील काळात अतिवृष्टी, सततचा पाऊस किंवा पावसाचा खंड पडल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कृषी विभागाने नियमित पीक पाहणी, तांत्रिक मार्गदर्शन आणि आवश्यक मदत तातडीने उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे मत कृषी क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. यंदा तेल्हारा तालुक्याने जिल्ह्यात सर्वाधिक पावसाची नोंद केली, ही आनंदाची बाब असली तरी निकृष्ट बियाण्यांनी हा आनंद हिरावून घेतला आहे. निसर्गाची साथ लाभूनही बियाण्यांच्या दर्जाहीनतेमुळे शेतकरी संकटात सापडत असेल, तर ही केवळ शेतीची नव्हे तर संपूर्ण कृषी व्यवस्थेच्या उत्तरदायित्वाची गंभीर बाब असल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

# खेट्रीत एसआयआर प्रक्रियेसाठी सरपंचांचा पुढाकार

## दवंडीद्वारे जनजागृती, ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील खेट्री गावात सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेला गती देण्यासाठी सरपंच जहूर खान यांनी पुढाकार घेत ग्रामस्थांमध्ये व्यापक जनजागृती मोहीम राबविली. गावात दवंडी देऊन बीएलओंकडून एसआयआरचे फॉर्म घेतलेल्या नागरिकांनी ते अचूक भरून आवश्यक कागदपत्रांसह लवकरात लवकर जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले.

सरपंच जहूर खान यांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन करत प्रत्येक पात्र नागरिकाने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे सांगितले. त्यांच्या या पुढाकाराला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, अनेक नागरिकांनी तातडीने फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

ग्रामस्थांकडून मिळणाऱ्या सकारात्मक प्रतिसादामुळे बीएलओंनाही एसआयआरचे काम सुरळीतपणे पार पाडता येत असल्याचे चित्र आहे. गावातील एकही पात्र नागरिक या प्रक्रियेपासून वंचित राहू नये, यासाठी जनजागृतीसह आवश्यक मार्गदर्शनही करण्यात येत आहे. प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून एसआयआर प्रक्रिया निर्धारित कालावधीत यशस्वीरीत्या पूर्ण होईल, असा विश्वास सरपंच जहूर खान यांनी व्यक्त केला. गावात एसआयआर प्रक्रियेला चांगली गती मिळाल्याचे दिसून येत आहे.

# शुभदा जोशी यांचे मरणोत्तर नेत्रदान

**अकोला :** महानगरात सन २०१४ पासून मरणोत्तर नेत्रदान साठी सेवारत रोटरी नेत्रदान केंद्राच्या वतीने स्थानीय जुने राधाकिसन प्लॉट येथील रहिवासी, अकोला अर्बन बँकेच्या माजी संचालिका, जेष्ठ समाजसेवी शुभदा शरदचंद्र जोशी यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. शुभदा जोशी यांचे सोमवार दि १३ जुलै रोजी निधन झाले. त्या ८९ वर्षाच्या होत्या. त्यांनी आपल्या हयातीत मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला होता. त्या अकोला अर्बन बँकेचे अध्यक्ष शांतनु जोशी यांच्या मातोश्री होत्या. त्यांचा हा संकल्प त्यांच्या कुटुंबियांनी पूर्ण केला. यासाठी मृतकाचे नेत्र गोलक संकलित करण्या साठी रोटरी नेत्रदान केंद्राचे प्रमुख डॉ जुगल चिरानिया यांना पाचारण करण्यात आले.

**Change In Name**
I Have Change My Name From
**JIGNESH VINOD MEHATA**
-- TO --
**JIGNESH VINOD RAI MEHTA**
MY Residential Address is - Shanti Apartment Near Jain Mandir Devrao Baba Chal Rajput Pura Akola Maharashtra 444001

**Change In Name**
Old Passport No is M8591302
I Have Change My Name From
**SYED SOHAIL**
-TO-
**SYED SOHAIL SYED JEELANI**
My Residential Address is - Huda Apartment First Floor Mankarna Plot Akola Maharashtra 444001

**Change In Name**
I Have Change My Name From
**SANJAYKUMAR BABULALJI SHARMA**
- TO -
**SANJAY BABULAL SHARMA**
MY Residential Address is - Bajrang Daal Mill Nagpur Jin Akola Maharashtra 444001

# कावड व पालखी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर १६ जुलैला आढावा बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रावण महिन्याला दि. १३ ऑगस्ट २०२६ पासून प्रारंभ होत असून, अकोला जिल्ह्यात शहरी व ग्रामीण भागात पारंपरिक कावड व पालखी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियोजन तसेच भाविकांसाठी आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पूर्वतयारी आढावा बैठक दि. १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. सर्व संबंधित विभागांनी आपल्या विभागामार्फत करण्यात आलेल्या नियोजनाच्या माहितीसह बैठकीस उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

श्रावण महिन्यात १७ ऑगस्ट रोजी पहिला श्रावण सोमवार, २४ ऑगस्ट रोजी दुसरा श्रावण सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी तिसरा श्रावण सोमवार (श्री क्षेत्र धारगड यात्रा) तसेच ७ सप्टेंबर रोजी चौथा श्रावण सोमवार असून या दिवशी अकोला शहर व ग्रामीण भागात कावड व पालखी मिरवणुका निघणार आहेत. या कालावधीत मोठ्या संख्येने शिवभक्त गांधीग्राम येथील पूर्णा नदी पात्राजवळ एकत्र येतात. मध्यरात्रीनंतर कावडधारी पूर्णा नदीचे पवित्र जल कावडीत भरून अकोला शहरातील श्री राजराजेश्वर मंदिरात नेऊन भगवान महादेवांच्या पिंडीवर जलाभिषेक करतात.

मिरवणुकीचा मार्ग आपातापा नाका, रेल्वे पूल, शिवाजी महाविद्यालय, अकोट स्टँण्ड, मामा बेकरी, वियानी चौक, कपडा बाजार, सराफा लाईन, गांधी चौक, कोतवाली चौक, लोखंडी पूल, काळा मारोती टर्न, जय हिंद चौक ते श्री राजराजेश्वर मंदिर असा राहणार आहे. या संपूर्ण मार्गावर कायदा व सुव्यवस्था राखणे, वाहतूक नियंत्रण, आरोग्य, अग्निशमन, वीज, पाणीपुरवठा तसेच अन्य आपत्कालीन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध विभागांच्या समन्वयातून नियोजन करण्यात येणार आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार अंकुश मोहनलाल शर्मा यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

**मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: -** मौजा उमरी, प्रगणे अकोला, ता. जि. अकोला येथील महानगरपालीका अकोला च्या हद्दिमधील मालमत्ता कं. ४५५७ नविन व १११९/२ जुना प्लॉट क्रं. ३९ चा दक्षिणेकडील भाग ज्याची एकूण आराजी ५९. २४ चौ. मी. म्हणजेच ६३७.०० चौ. फुट इतकी असुन त्याची चतु: सिमा :- पुर्वेस: रोड, पश्चिमेस: दामानी हॉस्पिटल, उत्तरेस: याच प्लॉट चा उर्वरीत भाग, दक्षिणेस: प्लॉट कं. ४०,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २४,९५,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्त्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१

**जाहीर नोटीस**

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**एन. एस. बारी यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर. बाळापुर, बाळापुर, अकोला.**

प्रोसेस नं. १५६९/२०२६

दिवाणी किरकोळ अर्ज/१६६/२०२६
विठ्ठल नारायण बोरकर वि. कोणीही नाही.
पुढिल तारिख : १०-०८-२०२६

**अर्जदार :** १. श्री विठ्ठल नारायण बोरकर वय अं ६१ वर्ष धंदा शेती रा. गायगांव ता. बाळापूर जि. अकोला २. द्वारका तुकाराम वरणकर वय अं ५५वर्ष धंदा घरकाम रा. घूसर ता. जि. अकोला ३. यमुना शामराव नादोकार वय अं ४८वर्ष धंदा घरकाम रा. काजिखेड ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत नारायण गणुजी बोरकर हे दिनांक २६.०३.२०२६ रोजी मौजे गायगांव ता. बाळापूर जि.अकोला येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार हे मय्यत नारायण गणुजी बोरकर यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही न्यायालयात स्वत: अथवा कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या वकीलामार्फत दिनांक १०/०८/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १०.०७.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क. स्तर, बाळापुर

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**पाणी पुरवठा विभाग**

**निविदा सुचना क्र. १०, सन २०२६-२७**

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मनपा निधी अंतर्गत दि. १३/०७/२०२६ रोजी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (संपर्क- ७७०९०४९३५१)
संकेतस्थळ - www.amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापू/ १६०/२०२६,
पाणी पुरवठा विभाग, अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : १३/०७/२०२६

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०५५/२०२६ — प्रोसेस नं.८६४९/२०२६
चौ.ता. १८/०८/२०२६ — दिनांक : १०/०७/२०२६

**अर्जदार :** १. ललितकुमार राजकुमार चौहान २. जयश्री राजकुमार चौहान ३. रेवती राजकुमार चौहान तिघेही रा. आर. एल. टी. कॉलेज, सिव्हिल लाइन, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजकुमार सदाशिवराव चौहान
**पत्ता :-** रा. आर. एल. टी. कॉलेज, सिव्हिल लाइन, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजकुमार सदाशिवराव चौहान यांचे दि. ०५/०५/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०५५/२०२६ — प्रोसेस नं. ८६४९/२०२६
चौ.ता. १८/०८/२०२६ — दिनांक : १०/०७/२०२६

**अर्जदार :** १. ललितकुमार राजकुमार चौहान २. जयश्री राजकुमार चौहान ३. रेवती राजकुमार चौहान तिघेही रा. आर. एल. टी. कॉलेज, सिव्हिल लाइन, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजकुमार सदाशिवराव चौहान
**पत्ता :-** रा. आर. एल. टी. कॉलेज, सिव्हिल लाइन, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजकुमार सदाशिवराव चौहान यांचे दि. ०५/०५/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २१६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# प्रशासन झोपेत, शेतकरी रडत!

## बंधाऱ्यांच्या फळया न काढल्याने पिकांचे मोठे नुकसान

# दोषींवर कठोर कारवाई करा; शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या-खा.अमर काळे

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यातील कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या फळया वेळेवर न काढल्यामुळे पुराचे पाणी शेतांमध्ये शिरून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा आरोप करत खा. अमर काळे यांनी जलसंधारण विभागावर तीव्र टीका केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसल्याचे सांगत त्यांनी दोषींवर कठोर कारवाई आणि नुकसानग्रस्तांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.



कोल्हापुरी बंधारे हे सिंचन आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी महत्त्वाचे असले तरी पावसाळ्यापूर्वी त्यांच्या फळया काढणे ही विभागाची नियमित जबाबदारी आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून या प्रक्रियेकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने नदीकाठच्या शेतांमध्ये पुराचे पाणी साचून उभी पिके पाण्याखाली गेल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याबाबत जलसंधारण विभागाला यापूर्वी लेखी सूचना देण्यात आल्या होत्या. तरीही अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही. परिणामी अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांवर आणखी एक मोठे संकट कोसळले आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून त्यांना शासनाकडून त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी ठाम मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे.

## गटविकास अधिकारी पोहोचले बांधावर

**विरूळ आकाजी/जनमाध्यम**

शेतकऱ्यांच्या अडचणी कार्यालयात बसून नव्हे तर शेताच्या बांधावर जाऊन समजून घ्याव्यात, याचे प्रत्यंतर आर्वी पंचायत समितीचे नवनियुक्त गटविकास अधिकारी शिवशंकर इंगोले यांनी दिले. रोजगार हमी योजनेतून उभारण्यात आलेल्या सिंचन विहिरींची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी लाभार्थी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत विहिरींच्या कामाची गुणवत्ता, उपयोगिता तसेच प्रलंबित बिलांबाबत माहिती घेतली.

विरूळ गावातील युवराज राऊत, मीना घालनी,गुणवंत उमक,लता धोंगडे,ज्ञानेश्वर चवरे, रामदासी मानकर,ज्योती येडे, विलास कठाणे आणि आशा चाफले यांच्यासह अनेक लाभार्थ्यांच्या विहिरी पूर्ण झाल्या असून अंतिम बिले मंजुरीच्या टप्प्यात आहेत. शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांसमोर आपल्या अडचणी मांडल्या. त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले.

पाहणीदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी पंकज मनभे, रोजगार सेवक अविनाश तेलंगे आणि अक्षय कोमटी उपस्थित होते. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी साधलेला संवाद हा केवळ पाहणीपुरता न राहता शेती विकासाला बळ देणारा ठरावा, अशी अपेक्षा यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केली.



## तीन महिन्यांतच रस्ता उखडला,निकृष्ट कामाचा पर्दाफाश

### अपघातांची मालिका सुरुः संतप्त ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील माणिकवाडा–तारासावंगा हा प्रमुख संपर्क रस्ता सध्या मृत्यूचा सापळा बनला असून प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे वाहनचालकांचा जीव धोक्यात आला आहे. रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि त्यात साचलेले पावसाचे पाणी यामुळे दररोज अपघाताचा धोका निर्माण होत असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



या मार्गावरून दररोज शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच दुचाकी आणि चारचाकी वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी डांबरीकरण पूर्णपणे उखडून गेले असून संपूर्ण मार्ग खड्ड्यांच्या जाळ्यात बदलला आहे. पावसामुळे खड्डे पाण्याखाली गेल्याने त्यांचा अंदाज येत नसल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, अवघ्या तीन महिन्यांपूर्वी या मार्गावरील सुमारे दोन किलोमीटरचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्ता पुन्हा उखडला आहे. रस्त्याच्या कडेला मुरूमही न भरल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे. सार्वजनिक पैशांचा अपव्यय करून निकृष्ट काम करणाऱ्यांवर कारवाई होणार की नाही, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. जिल्हा परिषद बांधकाम विभागाने तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत, रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी आणि निकृष्ट कामाची चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशारा शिवसैनिक सुरेश खवशी यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे.

## संक्षिप्त

### संशयास्पद युवक पोलिसांच्या ताब्यात

**वर्धा**-दयालनगर स्टेशनफैल परिसरात रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत चोरी करण्याच्या तयारीत असलेल्या एका युवकाला शहर पोलिसांनी संशयावरून ताब्यात घेतले. गस्तीदरम्यान पोलिसांना एक युवक संशयास्पदरीत्या अंधारात लपून बसलेला दिसला. त्याची चौकशी केली असता त्याने समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली. आरोपीची ओळख ओम दिगांबर पठाडे (२२, रा. सालोड हिरापूर) अशी पटली. परिसरात चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांनी सतर्कता वाढविली असून संशयितांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून रात्रीच्या गस्तीत आणखी वाढ करण्याची मागणी केली आहे.

### दहशत माजविणारा गावगुंड जेरबंद

**समुद्रपूर**-नागरिकांना शिवीगाळ करून चाकूचा धाक दाखवत परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या गावगुंडाला पोलिसांनी अटक केली. गव्हा कोल्ही येथील पारधी बेडा परिसरात ही कारवाई करण्यात आली. रामकृष्ण मनोहर फुलमाळी (५०, रा. गव्हा कोल्ही) हा नागरिकांना अडवून शिवीगाळ करत चाकू दाखवून धमकावत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडील धारदार चाकू जप्त करण्यात आला.

### मध्यस्थी करणाऱ्या तरुणाला मारहाण

**सिंदी(रेल्वे)**-दोन जणांतील वाद मिटविण्यासाठी मध्यस्थी करण्यास गेलेल्या तरुणाला दोघांनी मिळून बेदम मारहाण केल्याची घटना नाग मंदिराजवळील पुल परिसरात घडली. प्रशांत गवळी याचा फैजान अजीज शेख आणि फैजान उर्फ याकुब सय्यद यांच्याशी शाब्दिक वाद सुरू होता. हा वाद शांत करण्यासाठी आशिष मध्यस्थी करण्यास गेला. मात्र, दोघांनी त्याच्यावरच संताप व्यक्त करत शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. जखमीने पोलिसांत तक्रार दाखल केली असून घटनेची नोंद घेण्यात आली आहे. पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## अण्णाभाऊ साठे नगर जयंतीसाठी समिती स्थापन



**वर्धा/जनमाध्यम**

बहुजन रयत परिषद, वर्धा यांच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी रेस्ट हाऊस, वर्धा येथे बैठक घेण्यात आली. बैठकीत जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा निर्धार करण्यात आला सुशांत खडसे यांची अध्यक्षपदी, दीपक डोंगरे यांची सचिवपदी, प्रशांत डोंगरे यांची सहसचिवपदी तर धर्मा पडघान यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी विदर्भ तथा जिल्हाध्यक्ष अजय डोंगरे, विदर्भ कार्याध्यक्ष राजू बावणे, जिल्हा उपाध्यक्ष किशोर वाघमारे व ओमप्रकाश बावणे, महिला अध्यक्षा हिरा खडसे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय तिळले, जिल्हा सचिव विनोद आमटे, देवळी तालुकाध्यक्षा सरला डोंगरे, वर्धा शहर महिला अध्यक्षा प्रीती कांबळे, आर्वी तालुका अध्यक्ष सुभाष सरकटे, अण्णाभाऊ साठे पुतळा समितीचे सचिव चंद्रकांत तिळले, सुनील पोटफोडे, गोपाल पोटफोडे यांच्यासह बहुजन रयत परिषदेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोल्हा काळी शिवारात नियोजनशून्य कामाचा फटका

### दहा शेतकऱ्यांचा शेतात जाण्याचा मार्ग बंद... आंदोलनाचा इशारा

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील माणिकवाडा येथील कोल्हा काळी शेतशिवारात नाल्याच्या खोलीकरणाच्या कामामुळे शेतकऱ्यांची वर्षानुवर्षे वापरात असलेली पायवाटच नाहीशी झाली आहे. परिणामी शेतात जाण्याचा एकमेव मार्ग बंद झाल्याने दहा शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले असून प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



शेतकरी सुरेश खवशी यांच्या सर्व्हे क्रमांक ६४ मधून नाला ओलांडून शेतात जाण्यासाठी रस्ता होता. सुमारे दोन महिन्यांपूर्वी नाल्याचे खोलीकरण करण्यात आले. मात्र काम पूर्ण करताना पर्यायी रस्ता किंवा पायवाट उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे पूर्वीचा मार्गच बंद झाला. यात भर म्हणजे अलीकडील मुसळधार पावसामुळे नाल्याला पूर आल्याने खोलीकरण केलेला भाग आणखी खोल झाला आणि पायवाट पूर्णपणे वाहून गेली. आता शेतकऱ्यांना दुसऱ्यांच्या शेतातून वळसा घालून शेतात जावे लागत असून पेरणी मशागत आणि इतर शेतीकामे अडचणीत आली आहेत.

बाधित शेतकऱ्यांनी संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून कायमस्वरूपी रस्ता किंवा पायवाट उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केली आहे. अन्यथा शेतीचे मोठे नुकसान होणार असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान शिवसैनिक सुरेश खवशी यांनी शासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेतली नाही तर शेतकऱ्यांसह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला आहे.

### जन्मभूमी वर्धा... कर्मभूमी पुणे' या नात्याला मायेची ऊब

# पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या संस्थेत वर्धा येथील तीनशे वारकऱ्यांना वैदर्भीय पुरणपोळीचा पाहुणचार

**पुणे**-वारी म्हणजे केवळ पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनाची वाटचाल नव्हे, तर माणुसकी, सेवा, समता आणि प्रेमाचा अखंड उत्सव होय. अनाथांच्या जीवनात मायेचा दीप प्रज्वलित करणाऱ्या पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ यांनी जपलेली हीच मानवतेची परंपरा आजही त्यांच्या संस्थेत तेवढ्याच प्रेमाने आणि आत्मीयतेने जोपासली जात आहे. त्यांच्या जन्मभूमी असलेल्या वर्धा जिल्ह्यातून संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा-२०२६ निमित्त आळंदी ते पंढरपूर पायी वारी करणाऱ्या तब्बल ३०० वैदर्भीय वारकऱ्यांचे सासवडजवळील कुंभारवळण येथील ममता बाल सदन (बालगृह) येथे पारंपरिक वैदर्भीय पुरणपोळीच्या स्वादिष्ट भोजनाने स्वागत करण्यात आले. माईंच्या विचारांची ही सेवा-परंपरा सलग २७ वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे. पुरंदर तालुक्यातील कुंभारवळण येथील संस्थेत वारकऱ्यांचा दोन दिवस मुक्काम होता. पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदनचे अध्यक्ष दिपक गायकवाड, ममता सपकाळ, सुजाता गायकवाड, अधीक्षिका स्मिता पानसरे यांनी अत्यंत आत्मीयतेने वारकऱ्यांचे स्वागत केले. वारकऱ्यांसाठी वैदर्भीय परंपरेनुसार पुरणपोळी,चपाती,पातोळीची भाजी, कढी, पालक व कांदा भजी, वरण-भात, सलाड अशा रुचकर भोजनाची व्यवस्था करण्यात आली. रात्री काल्याचे कीर्तन, हरिपाठ आणि भक्तिरसाने ओथंबलेल्या वातावरणात वारकरी संप्रदायाचा आध्यात्मिक सोहळा रंगला.'ज्ञानोबा-तुकाराम'च्या अखंड जयघोषात ही दिंडी जेजुरीमार्गे पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली. यावेळी आश्रमातील मुलींनी पावली, फुगडी आणि अभंगांच्या गजरात वारकऱ्यांना भावपूर्ण निरोप दिला.



पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ या मूळच्या वर्धा जिल्ह्यातील, तर त्यांची कर्मभूमी पुणे जिल्हा होती. त्यामुळे आपल्या माहेरच्या भूमीतून येणाऱ्या वारकऱ्यांचा सन्मानपूर्वक पाहुणचार करण्याची परंपरा त्यांनी स्वतः सुरू केली होती. त्यांच्या आकस्मिक निधनानंतरही ही सेवा खंडित होऊ न देता, त्यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदनचे अध्यक्ष दिपक गायकवाड यांनी ती अधिक समर्पित भावनेने पुढे चालविली आहे. माईंच्या संस्कारांचा, सेवाभावाचा आणि माणुसकीच्या वारशाचा हा जिवंत अविष्कार म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जाते.

वर्धा जिल्ह्यातील दिंडी क्रमांक २१७ मधील जवळपास ३०० वारकरी मागील २७ वर्षांपासून संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होत आहेत. यंदाही श्री संत ज्ञानेश्वर माउली पायदळ वारकरी दिंडी मंडळ, वर्धा यांच्या वतीने दिंडी मालक ह.भ.प. कवडूजी महाराज कठाने आणि दिंडी चालक लक्ष्मण महाराज तराळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही दिंडी आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान करत आहे.संस्थेच्या वतीने दिंडी मालक ह.भ.प. कवडूजी महाराज कठाने यांचा सपत्नीक वस्त्र, साडी-चोळीने गौरव करण्यात आला. यावेळी पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदनचे अध्यक्ष दिपक दादा गायकवाड,सुजाता गायकवाड, अधीक्षिका स्मिता पानसरे संस्थेचे संचालक गोपाल गायकवाड, प्रसन्न गायकवाड, संजय गायकवाड, पवन गायकवाड तसेच आश्रमातील मुली, कर्मचारी आणि सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिंडीमध्ये ह.भ.प. शुभम महाराज फुलभोगे, ह.भ.प. गौरव महाराज ठाकरे, ह.भ.प. अक्षय महाराज हरणे, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज खंडाते, ह.भ.प. प्रवीण महाराज मोहिजे, ह.भ.प. संजय महाराज ठाकरे, दिंडीचे विणेकरी ह.भ.प.बाबारावजी महाराज निर्मळ ह.भ.प. प्रवीण महाराज मोहिते, ह.भ.प.रामकृष्ण महाराज टेकाळे,ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज खंडाते यांच्यासह तीनशे वारकरी सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ममता बाल सदन संस्थेच्या मुलींनी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# हरित भविष्यासाठी कुटुंब एकत्र

### रोटरीच्या वृक्षारोपणाने दिला समाजाला आदर्श

**वर्धा/जनमाध्यम**

नागपूर रोडवरील पॅरिस सिटी टाउनशिप येथे रोटरी क्लब गांधी सिटी वर्धाच्या वतीने आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनासोबतच संस्कारांची अनोखी परंपरा अनुभवायला मिळाली. एका बाजूला आईने आपल्या चिमुकल्या मुलीचा हात धरून वृक्षारोपण केले तर दुसऱ्या बाजूला पती पत्नीने एकत्र येत हरित भविष्यासाठी संकल्प केला. या भावनिक क्षणांनी उपस्थितांच्या मनावर वेगळी छाप उमटवली. कार्यक्रमाच्या प्रारंभी क्लबचे सचिव संजय मानमोडे यांनी प्रमुख अतिथी शहरातील ख्यातनाम नेत्रतज्ज्ञ डॉ मोना सुने यांचे स्वागत केले. त्यानंतर सहायक प्रांतपाल मनोज मोहता यांच्या उपस्थितीत विविध मान्यवरांनी परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. कार्यक्रमातील सर्वाधिक लक्षवेधी क्षण म्हणजे रोटेरियन टीना पारीख यांनी आपल्या लहान मुलीसह केलेले वृक्षारोपण. आईने मुलीचा हात धरून मातीमध्ये रोपटे लावताना पर्यावरण जपण्याचे संस्कारही तिच्या मनात रुजवले. पुढील पिढीपर्यंत निसर्गप्रेम पोहोचविण्याचा हा प्रेरणादायी संदेश उपस्थितांना भावला. क्लबचे अध्यक्ष संदीप कदम यांनीही वृक्षारोपण केले. त्यांच्या सोबत प्राध्यापिका डॉ नीलम कदम यांनी सहभाग




नोंदवत प्रत्येक सामाजिक उपक्रमात कुटुंबाच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या सहभागाने वृक्षारोपणाला कौटुंबिक मूल्यांची सुंदर जोड मिळाली.

क्लबचे जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाजू यांनी रोटरी पर्यावरण आणि संस्कार यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून पाहायला मिळाल्याचे सांगितले. यावेळी मोहन मानमोडे मुरलीधर बेलखोडे यांच्यासह क्लबचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून एक वृक्ष दोन पिढ्या आणि अनंत हरित भविष्याचा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचला.

# इंदिरा गांधी पुतळा सुशोभीकरणाच्या कामाला गती

### पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची पाहणी

**वर्धा/जनमाध्यम**

सेवाग्राम विकास आराखड्याअंतर्गत सुरू असलेल्या इंदिरा गांधी पुतळ्याच्या सुशोभीकरणाच्या कामाची पालकमंत्री तथा राज्याचे गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, गृहनिर्माण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी रविवारी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामाच्या प्रगतीचा आढावा घेत संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांना दर्जेदार कामासह निर्धारित मुदतीत प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.



या कामासाठी ४८.९० लाख रुपयांची तांत्रिक मान्यता देण्यात आली असून कंत्राट प्रक्रियेनंतर प्रत्यक्ष काम वेगाने सुरू आहे. पाहणीदरम्यान डॉ. भोयर यांनी कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट करत सर्व तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले.

यावेळी बोलताना त्यांनी सेवाग्राम विकास आराखड्याअंतर्गत सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण, स्वच्छता आणि नागरिकांसाठी आकर्षक व सुरक्षित सुविधा निर्माण करण्यावर शासनाचा भर असल्याचे सांगितले. या विकासकामांमुळे सेवाग्राम परिसराच्या सौंदर्यात भर पडेल आणि नागरिकांना अधिक दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या पाहणीवेळी नगर परिषद उपाध्यक्ष प्रदीप ठाकूर, नगरसेवक सोहनसिंग ठाकूर, बांधकाम सभापती राखी पांडे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता मोकलकर,कनिष्ठ अभियंता गौरव तडस, नगर परिषदेचे अधिकारी, पदाधिकारी तसेच संबंधित मान्यवर उपस्थित होते.

### तरुणाचा मृत्यू

**वर्धा**-जुनोना गावात पायी जात असताना अचानक भोवळ आल्याने खाली पडलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सागर संजय चलपे (३३) असे मृतकाचे नाव आहे. तो पायी जात असताना अचानक भोवळ येऊन रस्त्यावर कोसळला.

### जाहिर सूचना

मी अयफाज रहिम शेख मु.पो.केळझर ता.सेलू जि.वर्धा येथील रहिवासी असुन माझ आधारकार्ड वरिल नाव अयफाज रहिम शेख असे आहे आणी लिव्हिंग सर्टिफिकेट वरिल नाव शेख अयफाज शेख रहिम शेख असे आहे. या दोन्ही नावाची व्यक्ती मी एकच आहे. तरी क्रुपया या जाहिरातीद्वारे सुचित करतो.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २२७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मनपा आयुक्त बंगल्याच्या संरक्षण भिंतीवर बोलेरोची धडक

## -सुदैवाने जीवितहानी टळली


**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीहून भाजीपाला घेऊन आर्वीकडे निघालेल्या एमएच-४० बीजी-१३०२ क्रमांकाच्या बोलेरो पिकअपचा सोमवारी कॅम्प परिसरात अपघात झाला. समोरून येणाऱ्या तवेरा वाहनाला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बोलेरो थेट महापालिका आयुक्तांच्या बंगल्याच्या संरक्षण भिंतीवर जाऊन धडकली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मिळालेल्या माहितीनुसार, बोलेरो पिकअप अमरावतीहून भाजीपाला घेऊन आर्वीकडे जात होती. कॅम्प परिसरात समोरून येणाऱ्या तवेरा वाहनाला धडक टाळण्यासाठी चालकाने वाहन वळविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यावेळी वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बोलेरो रस्त्याच्या कडेला गेली आणि थेट महापालिका आयुक्तांच्या बंगल्याच्या संरक्षण भिंतीवर



जोरदार धडकली. अपघाताचा मोठा आवाज ऐकताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत चालकाला वाहनातून सुरक्षित बाहेर काढले. या अपघातात चालकास कोणतीही गंभीर दुखापत झाली नसून मोठी दुर्घटना टळली. मात्र बोलेरो पिकअपचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण आणि इतर बाबींचा तपास सुरू असून, या घटनेमुळे काही काळ परिसरात नागरिकांची गर्दी झाली होती.

# काउचपफीची आतापर्यंतची सर्वात मोठी '१०० Homes १०० Bedrooms Mega Sale' सुरू



## -मर्यादित स्टॉकवर आकर्षक ऑफर्स

**अमरावती :** प्रीमियम फर्निचर उत्पादक व आयातदार काउचपफी फर्निचर्स यांनी ग्राहकांसाठी '१०० Homes १०० Bedrooms Mega Sale' सुरू केली आहे. ही विशेष मोहीम फक्त पहिल्या १०० घरांसाठी असून सर्व ऑफर्स मर्यादित कालावधी आणि मर्यादित स्टॉक उपलब्ध असेपर्यंत लागू राहतील.

ग्राहकांना १०० हून अधिक बेडरूम सेट्स पाहण्याची संधी मिळणार असून सुरुवातीची किंमत ४९,९०० आहे. प्रीमियम आणि इम्पोर्टेड मॉडेल्समध्ये King Size Hydraulic Bed, 6 Door Wardrobe, 2 Side Tables आणि Pinterest Style Dressing Table यांचा समावेश आहे. सर्व बेडरूम सेट्सवर मोफत इंस्टॉलेशनची सुविधा दिली जात आहे.

याशिवाय ५९,९००, ६९,९००,८५,०००,१,२९,००० आणि १,४९,००० या विविध किंमत श्रेणींमध्येही आधुनिक व प्रीमियम बेडरूम सेट्स उपलब्ध आहेत.

कंपनीच्या मते, काउचपफीचे ध्येय ग्राहकांना Honest Pricing मध्ये उत्कृष्ट दर्जाचे फर्निचर उपलब्ध करून देणे आहे. उत्पादक तसेच आयातदार असल्यामुळे भारतीय व इम्पोर्टेड डिझाइन्सचा मोठा संग्रह एकाच ठिकाणी उपलब्ध आहे.

Big Monsoon Sale अंतर्गत निवडक सोफा, डायनिंग टेबल, सेंटर टेबल, रिक्लायनर, मंदिर, ऑफिस फर्निचर आणि इतर उत्पादनांवर Flat 50% पर्यंत सूट दिली जात आहे.

कंपनीने नुकतेच नवीन ऑफिस फर्निचर शोरूम सुरू केले असून येथे ऑफिस सोफा, ऑफिस टेबल, एर्गोनॉमिक ऑफिस चेअर्स, कॉन्फरन्स टेबल, लॉबी सेट्स, Height Adjustable Tables, ऑफिस कपाटे, बुक रॅक्स तसेच कार्यालयासाठी आवश्यक सर्व प्रकारचे फर्निचर उपलब्ध आहे.

विशेष ऑफर अंतर्गत एक ऑफिस चेअर खरेदी करा आणि एक ऑफिस चेअर मोफत मिळवा.

होम डेकोर विभागात Modern Artifacts, आकर्षक Brass Article Gallery, Brass Murti, Brass Chairs, Brass Décor, देवांच्या मूर्ती, फाउंटन, कृत्रिम फुले, वासे, प्लँटर्स, बॉल क्लॉक्स, डेकोरेटिव्ह फ्रेम्स आणि पेंटिंग्स उपलब्ध आहेत. Artifacts ची सुरुवात फक्त १४९ पासून होत असून निवडक होम डेकोर उत्पादनांवर Buy 1 Get 1 ऑफर देखील उपलब्ध आहे.

१ लाख चौ. फूट प्रीमियम फर्निचर व गिफ्ट मॉलमध्ये घर, ऑफिस आणि होम डेकोरसाठी आवश्यक सर्व वस्तू एकाच छताखाली उपलब्ध आहेत. 100 Homes. 100 Bedrooms Mega Sale, Flat 50% Monsoon Offers, Home Decor Buy 1 Get 1 आणि Office Chair Buy 1 Get 1 या सर्व ऑफर्स मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध आहेत.

काउचपफी फर्निचर्स, ड्रीमलैंड बिझनेस पार्क, राहतगाव रोड, अमरावती येथे स्थित आहे.

कंपनीचे संचालक अनिलकुमार अग्रवाल आणि अमित अग्रवाल यांनी अमरावती व परिसरातील नागरिकांना कुटुंबासह एकदा काउचपफी शोरूमला भेट देऊन या विशेष ऑफर्सचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# गोसेवा, वृक्षारोपण आणि तुलादानाने दिनेश अग्रवाल यांचा वाढदिवस साजरा



**अमरावती :** लायन्स क्लब अमरावती रिअलचे क्लब ॲडमीन लायन दिनेश अग्रवाल यांचा वाढदिवस श्री गोरक्षण संस्था, गोसदन, दस्तूर नगर, अमरावती येथे विविध सामाजिक व सेवाकार्यांचे आयोजन करून उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी दिनेश अग्रवाल यांचे वडील मुरलीधर अग्रवाल, माता लीलादेवी अग्रवाल आणि कन्या वैष्णवी अग्रवाल यांचे ढेप (पेंड), गूळ आणि केळ्यांनी तुलादान करण्यात आले. यानंतर गोमातेला गूळ, केळी व ढेप भरवून गोसेवा करण्यात आली.

वाढदिवसाचे औचित्य साधून लायन दिनेश अग्रवाल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या माध्यमातून त्यांनी पर्यावरण संरक्षण आणि गोसेवेचा मोलाचा संदेश दिला. याप्रसंगी क्लबच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

या कौतुकास्पद उपक्रमाला लायन्स क्लब अमरावती रिअलचे अध्यक्ष डॉ. दीपक कऱ्हे, सचिव श्याम जाडिया, जितेंद्र झा, पंकज दुबे, चंद्रदत्त मिश्रा, लक्ष्मीकांत जोशी, चेतन पटेल, राजा किंगराणी, सुरेंद्र मावळे, नितीन टवराले, कंचन अग्रवाल, नेहा उदासी (प्रेसिडेंट), कशिश किंगराणी (ट्रेझरर), कल्याणी भेटाळू, ज्योती कऱ्हे यांच्यासह क्लबचे अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'विदर्भाचा राजा'चा भूमीपूजन सोहळा १६ जुलै रोजी

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक खापर्डे बगीचा, इर्विन चौक येथील प्रसिद्ध 'न्यू आझाद गणेशोत्सव मंडळ' तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही 'विदर्भाचा राजा'चा भव्य भूमीपूजन तसेच पाद्यपूजन सोहळा अत्यंत हर्षोल्लासात साजरा करण्यात येणार आहे.



हा मंगलमय सोहळा दिनांक १६ जुलै २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

मंडळाचे अध्यक्ष दिनेश बुब यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार आहे. अमरावती येथील इर्विन चौकातील न्यू आझाद गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणात या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या धार्मिक व ऐतिहासिक सोहळ्याला परिसरातील गणेशभक्तांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

वि.४ थे सहदिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांच्या न्यायालयात ०३.०८.२०२६

**अर्जदार -** **नथ्थुसा कळमकर (मयत)**

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **रामेश्वर खंडेलवाल (मयत)**

**बनाम -**

**१अ)** सिताराम रामेश्वर खंडेलवाल, रा.जुना कॉटन मार्केट रोड, अमरावती
१ब) शांताबाई बिसनलाल खंडेलवाल (कुलवाल) रा.चावल मंडी, ता.अचलपूर, जि.अमरावती
१क) शंकुंतलाबाई पुरनमल कनोगा, रा.गांधी नगर, भीलवाडा, राजस्थान
१ड) पुष्पाबाई ईश्श्वरलाल खुटेटा, रा.रश्मी बाग, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद
२ब) आशा दिनेशकुमार खुटेटा, रा.कोटेगुडीयम, आंध्रप्रदेश
२ई) कमलाबाई द्वारकादास मेठी, रा.नारायणपेठ, धुमाल बिल्डीग, पुणे-२
३अ) रमेश परसराम चिखलीकर, रा.६४ न्यू रामदास पेठ सेंट्रल बॅकेसमोर हायकोर्ट, नागपूर
३ब) सुरेश परसराम चिखलीकर, रा.क्वॉर्टर नं.११ पीडब्ल्यूडी कॉर्टर, टोपेनगर समोर कॅम्प.अम.
३क) किशोरी मधुकरराव मासोदकर, रा.मयुरी अपार्टमेंट कोथरूड, पुणे
३ड) श्रीमती रजनी सुधाकरराव खडतकर, रा.कोथरुड, पुणे

ज्याअर्थी उपरिनामित अर्जदार यांनी या न्यायालयाकडे प्रकरण पुनर्स्थापित करणेबाबत अर्ज केला आहे.

त्याअर्थी याद्वारे तुम्हाला फर्माविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाविरुध्द कारण दाखवण्याकरीता दिनांक ०३.०८.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे, तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापुर्वी बजावणीकरीता पत्ता देण्यात कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणारनाही.

आज दि.०९.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर, अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४४५/२०२६ ने.ता.१९.०८.२०२६

**अर्जदार -** १. उध्दव विनोदराव मोरे, वय ३३ वर्षे, धंदा - नोकरी
रा.असराणी लेआऊट, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
२. वैशाली अंकेश वानखडे
वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ व २ चे वडील **नामे विनोद छत्रपती मोरे** हे दि.**१३.०५.२०२६** रोजी अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटल, मासोद, जि.अमरावती येथे मयत झाले. तसेच अर्जदार नं.१ व २ चे आई **नामे शालिनी विनोदराव मोरे** हे दि.**१७.११.२०२५** रोजी झेनिथ हॉस्पीटल, अमरावती जि.अमरावती येथे मयत झाली. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०९.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## दि अमरावती जि.प.शिक्षक सहकारी बॅंक लि.अमरावती

***कॉग्रेस नगर रोड, रेल्वे पुलाजवळ, अमरावती***

***फोन नं. ०७२१-२६७४६८४, २६७१०४३***

***-निविदा सुचना-***

दि अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बॅंक लि., अमरावती च्या मुख्यालय व मुख्यशाखा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाच्या इमारतीमध्ये स्थलांतर करण्यात येत असून सदर भाडयाच्या इमारतीमध्ये बॅंकेच्या आवश्यकतेनुसार केबिन, काऊंटर, पार्टीशन, टेबल व इतर आवश्यक फर्निचरची कामे साहित्य व मजुरीसह करुन ठेवण्यासाठी नोंदणीकृत प्रतिष्ठानांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

दि.१४/०७/२०२६ ते दि.२०/०७/२०२६ पर्यत रु.५००/- GST सहचा भरणा करुन बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्रीस उपलब्ध राहील. दि.२१/०७/२०२६ ला दुपारी ४.०० वाजेपर्यत बॅंके मध्ये भरलेले निविदा फॉर्म स्विकारले जाईल.

नियम, अटी तथा कामाचे अंदाजपत्रक मुख्यालय, अमरावती येथे पहावयास मिळेल. निविदा उघडणे वा रदद करणे इत्यादी अधिकार बॅंकेने राखुन ठेवले आहे.

अमरावती
दिनांक-१३/०७/२०२६

***अध्यक्ष*** ***सरव्यवस्थापक***
***दि.अम.जि.प.शिक्षक सह बॅंक लि., अमरावती***

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१२६७/२०२६**
**श्रीमती शोभा अधिक एक विरुध्द निरंक**
**पुढील ता.१४.०८.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. **Shobha Prakashrao Sable**
Age 60 Yrs. Occu.: Housewife
2. **Swati Ganesh Gawande**
Age 37 Yrs. Occu.: Household,
Both R/o. Sutgirni Road, Sai Nagar,
Amravati, Tq. & Dist. Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रकाश राजाराम साबळे** हे **दि.२०.०६.२०२०** रोजी अचलपूर, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **शोभा अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती शोभा अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०१.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

## DISTRICT CONSUMER DISPUTED REDRESSAL COMMISSION, AMRAVATI

**Under the Consumer Protection Act, 2019**

Tel. No.:- 0721-2662158
Email- Confro-am-mh@nic.in
Website :

AT BEHIND CIRCUIT HOUSE
OLD BYPASS ROAD, JAIL ROAD, CAMP
DISTRICT-AMRAVATI
MAHARASHTRA

CONSUMER CASE NO. DC/468/CC/206/2024

Shri Shrikant Pundlirao Korde --- Petitioner/ Appellant

Versus

M/s. Aasha Builders & Developers and 2 --- Opposite Party / Respondent(s)

To,

**Opposite Party/ Respondent Name :**
1. M/S. AASHA BUILDERS AND DEVELOPERS AND 2 THROUGH ITS PARTNERS, SANJAY VAIKUNTHRAO VARHADE, R/O. C/O. ASHOK IJALKAR, SHANTI NAGAR, OLD BY PASS ROAD, CHAITNYA COLONY, AMRAVATI (MAHARASHTRA)

**Notice**

**WHEREAS** the complaint above-mentioned has been filed in the **Amravati** by the Complaint abvove named (copy whereof is enclosed)

AND WHEREAS the Petition camp up for admission hearing on 27-03-2026, and the same was admitted and the court has directed to issue notice to the opposite party(s), (Copy of Order is Enclosed).

Now, Therefore, TAKE NOTICE THAT THE matter above mentionede will be listed for directions/hearing before the **Amravati on 07/08/2026 at 10.30 A.M.**

NOW, THEREFORE, TAKE FURTHER NOTICE that you may file your version of the case with affidavit duly signed in three sets and enter appearance in person on through /counsel / agent within thirty days from the date of receipt of this notice.

A copy of your version of the case be served on the Complainant at the address given hereunder and proof of service thereof is to be filed in the Registry at the time of filing your version. The reply of the complaint be filed online at https://e-jagriti.gov.in portal and also to the complaint's counsel via emai, additionally.

TAKE FURTHER NOTICE that in default of your appearance the matter will be heard and determined ex-parte.

Dated Amravati, **on this 01/07/2026.**

STAMP

**REGISTRAR**

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३०५/२०२६ ने.ता.११.०८.२०२६

**अर्जदार :** **१.** डॉ.हेमंत भानुदास फुके, वय ६४ धंदा - सेवानिवृत्त
रा.चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
२. अनिल भानुदास फुके, वय ६१ धंदा - शेती
रा.चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
३. सुनिल भानुदास फुके, वय ५७ धंदा - शेती
रा.चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **सुधाकर भानुदास फुके, वय ६३ वर्षे, व्यवसाय - सेवावृित्त**
**रा.रुक्मिणी नगर, समर्थ कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत डॉ.भानुदास मारोतराव फुके** यांचा मृत्यू दिनांक **२८.०२.२०२६** रोजी चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३०५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.०७.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४२३/२०२६ ने.ता.२०.०८.२०२६

**अर्जदार -** १. वच्छला शंकरराव मालवे, वय ६२ वर्षे, धंदा -
रा.न्यू तापडीया नगर, अकोला, ता.जि.अकोला
२. सुशिला प्रल्हाद झकर्डे, वय ६० वर्षे, धंदा -
रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. कांता बळीराम सोळंके, वय ४९ वर्षे, धंदा -
रा.शिरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** १. मारोतराव बळीराम सोळंके, वय ६८ वर्षे, धंदा -
२. दादाराव बळीराम सोळंके, वय ५८ वर्षे, धंदा -
दोघेही रा.शिरखेड, ता.मोशी, जि.अमरावती
३. गोकुळा प्रल्हादराव खानंदे, वय ६५ वर्षे, धंदा -
रा.थुगांव पुर्णा, ता.भातकुली, जि.अमरावती
४. हिरु अरुण मालवे, वय ५५ वर्षे, धंदा -
रा.विचोरी, ता.मोर्शी, जि.अमरावती

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ते ३ व गैरअर्जदार नं.१ ते ४ चे वडील **नामे बळीराम चंद्रभान सोळंके** हे दि.**०५.०८.२०१९** रोजी शिरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाले. तसेच अर्जदार नं.१ ते ३ व गैरअर्जदार नं.१ ते ४ यांची आई **नामे यमुना बळीराम सोळंके** हे दि.**१२.०७.२०२५** रोजी राहते घरी, शिरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाली. मयत **बळीराम चंद्रभान व यमुना बळीराम सोळंके** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०९.०६.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२९६/२०२६
**हसीनाबी अधिक सात -वि- निरंक**
पुढील ता.१२.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Haseenabi Israil Khan, Age 77 Yrs. Occu.: Housewife
2. Razique Kha Israil Khan, Age 44 Yrs. Occu.: Labourer
Both R/o Mulla Pura, Shirala, Amravati.
3. Farzana Parveen Mo.Ashfak, Age 36 Yrs. Occu.: Housewife
R/o Asatpur, Amravati.
4. Sabir Khan Israil Khan, Age 53 Yrs. Occu.: Labourer
5. Aadil Kha Israil Khan, Age 43 Yrs. Occu.: Labourer
6. Aabid Khan Israil Khan Age 44 Yrs. Occu.: Labourer
7. Rizwana Parveen Aqeel Khan, Age 41 Yrs. Occu.: Housewife
No.4 to 7 R/o Mulla Pura, Shirala, Amravati.
8. Raisa Bano Abdul Kalim, Age 56 Yrs. Occu.: Housewife
R/o Madina Madars, Haidar Pura, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Isaraila Kha Miya Kha हे दिनांक 14.06.2024 रोजी **शिराळा, जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Haseenabi Israil Khan+7 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Haseenabi Israil Khan+7 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२८१/२०२६
**श्रीमती नलिनी अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१७.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Nalini Jagatrao Ingle (Widow), Age 74 Yrs. Occu.: Household work
2. Manish Jagatrao Ingle (Son), Age 51 Yrs. Occu.: Nil
3. Ravi Jagatrao Ingle (Son), Age 50 Yrs. Occu.: Service
1 to 3 all R/o Near Ganpati Mandir, New Vivekanand Colony, Amravati
4. Shubhangi Sandeepkumar Borkar(Daughter)
Age 48 Yrs. Occu.: Household work
R/oSmriti Nagar, Bhilai (Tq.Dist.Bhilai)(Chhatisgarh)

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **जगतराव राजारामजी इंगळे** हे दिनांक 26.03.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **नलिनी अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नलिनी अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

सक्सेशन क्र.१३६५/२०२६ चौ.ता.१७.०८.२०२६

**अर्जदार :**
1. Smt.Deepa @ Sindhutai Wd/o Dilip Wane,
Age 60, Yrs. Occu.: Household
2. Ashwini D/o Dilip Wane (Before Marriage)
Sau.Ashwini W/o Nitesh Gangasagar (After Marriage)
Age 32 Yrs. Occu.: Service
3. Ku.Kajal D/o Dilip Wane, Education
All R/o.Ambika Apartment G-2, New Colony, Dastur Nagar
Rukhmini Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Life Insurance Corporation of India
Through the Concerned Officer "Jeevan Anand"
Shrikrushna Peth Near Dafrin Hospital, Amravati.

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालायात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत **दिलीप देविदास वाणे** यांचे निधन दिनांक **१९.०३.२०२६** रोजी अमरावती येथे झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत व ईतर कोणीही मयतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, ह्याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (प्रशासन)**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१११५/२०२६
**दिप्ती व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०७.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Dipti Pramod Agrawal, Age 44 Yrs. Occu.: Household
R/o Jaistambh Square, New Vasti Badnera, Tq.Dist.Amravati
2. Shashank Pramod Agrawal (Minor), Age 15 Yrs. Occu.: Student
Age 48 Yrs. Occu.: Household work
R/o Jaistambh Square, New Vasti Badnera, Tq.Dist.Amravati
Tthrough its guardian Mother,Dipti Pramod Agrawal that is Appli.No.1

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **प्रमोद पाकिरचंद अग्रवाल** हे दिनांक 21.06.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **दिप्ती व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **दिप्ती व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६०**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पावसाचा दिलासा तरीही शेती संकटात!

## 'क्रिसिल'चा इशारा; जुलैचा उत्तरार्ध कोरडा राहणार

**नवी दिल्ली-** जूनमधील पावसाच्या मोठ्या तुटीनंतर जुलैच्या सुरुवातीला झालेल्या मुसळधार पावसामुळे यंदाच्या 'मॉन्सून'बाबतच्या चिंता काही प्रमाणात कमी झाल्या असल्या, तरी 'एल निनो' मुळे शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील धोक्याची टांगती तलवार अद्याप कायम असल्याचा इशारा 'क्रिसिल'च्या अहवालात देण्यात आला आहे.

या अहवालानुसार, जूनमधील पावसाच्या तीव्र तुटीनंतर जुलैच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला असला, तरी यामुळे खरीप हंगामावरील संकट पूर्णपणे टळले आहे, असा निष्कर्ष काढता येणार नाही. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) जुलै महिन्यातील पाऊस दीर्घकालीन सरासरीपेक्षा ६ टक्के कमी राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे त्यामुळे जुलैच्या उत्तरार्धात पावसाचा जोर कमी होऊन हवामान तुलनेने कोरडे राहू शकते, अशी शक्यता या अहवालात वर्तविण्यात आली आहे. 'क्रिसिल'च्या मते, यंदा मॉन्सून ३५ दिवसांत संपूर्ण देशभर पोहोचला, जो दीर्घकालीन सरासरीच्या जवळपास आहे. मात्र केवळ मोसमी पावसाची प्रगती हा शेतीच्या दृष्टीने पुरेसा निकष नसून, पावसाचे प्रमाण आणि त्याचे भौगोलिक वितरण अधिक महत्त्वाचे ठरते. पावसातील टोकाची तूट किंवा अतिरेक या दोन्ही परिस्थिती पेरण्या, पिकांची वाढ आणि ग्रामीण उत्पन्नावर विपरीत परिणाम करू शकतात.

### खरीप पेरणी पिछाडीवर

५ जुलैपर्यंत देशातील एकूण खरीप पेरणी गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे २१ टक्क्यांनी कमी असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. तेलबिया, कापूस, कडधान्ये, भरड धान्ये आणि इतर धान्यांच्या पेरणीत सर्वाधिक घट नोंदविण्यात आली आहे. तथापि, गेल्या काही आठवड्यांतील पावसामुळे देशातील एकूण पावसाची तूट ४० टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत (८ जुलैपर्यंत) कमी झाली आहे. मात्र जूनमधील पावसाची तूट २०१४ या तीव्र ठरलेल्या 'एल निनो' वर्षाशी तुलनात्मक असल्याचे 'क्रिसिल'ने नमूद केले आहे. त्या वर्षीही संपूर्ण हंगामात पावसाच्या कमतरतेमुळे कृषी उत्पादनावर परिणाम झाला होता.

### या राज्यांमध्ये अधिक ताण

'क्रिसिल'ने विकसित केलेल्या 'डेफिशियंट रेनफॉल इम्पॅक्ट पॅरामीटर' (ड्रीप) या निर्देशांकानुसार, पावसाची तूट आणि सिंचनक्षेत्र यांचा एकत्रित विचार करून शेतीक्षेत्रावरील ताणाचे मूल्यांकन करण्यात आले आहे. या निर्देशांकानुसार पुढील राज्यांमध्ये शेतीवरील ताण अधिक असल्याचे दिसून आले आहे: कर्नाटक, बिहार, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश,तेलंगणा, हरियाणा.

### तूर, भरड धान्यांना फटका

या अहवालानुसार, तूर आणि भरड धान्ये यांच्यावर सर्वाधिक ताण असून, सिंचन सुविधा उपलब्ध असल्याने ऊस, तसेच तुलनेने अधिक सहनशील सोयाबीन आणि भुईमूग पिकांवर परिणाम कमी असल्याचे दिसून आले आहे. सध्याच्या 'एल निनो'च्या परिस्थितीत पावसाची कमतरता आणि काही भागांत अतिवृष्टी अशी दोन्ही टोकाची स्थिती उद्भवू शकते. त्यामुळे जुलैच्या सुरुवातीचा पाऊस दिलासादायक असला, तरी पुढील काही आठवड्यांतील पावसावरच खरीप हंगामाचे भवितव्य अवलंबून राहणार असल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे.

# हिवरा फाटा कॉलेज थांब्यावर एसटी थांबवा

## तिन्ही आगार व्यवस्थापकांकडे विद्यार्थ्यांची मागणी

**आसेगाव पूर्णा / वार्ताहर**

आसेगाव पूर्णा येथील हिवरा पूर्णा मार्गावरील छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच डेबू इंग्लिश स्कूल या शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षणासाठी परिसरातील शेकडो विद्यार्थी एसटी बसने ये-जा करतात. मात्र, आसेगाव पूर्णा येथे थांबणाऱ्या अमरावती, परतवाडा व दर्यापूर आगाराच्या बसेस हिवरा फाटा (कॉलेज स्टॉप) येथे थांबत नसल्याने विद्यार्थ्यांना दररोज पायपीट करावी लागत असल्याची तक्रार विद्यार्थी व पालकांनी केली आहे.

येसुर्णा, सावळापूर, रावळगाव, वाढोना, खैरी, दोनोडा, रामा, पूर्णानगर, मार्की, भुगाव, मेघनाथपूर, राजना, बोरगाव पेठ, तळणी, वासनी व तामसवाडी या गावांतील विद्यार्थी या शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षणासाठी येतात.

बसचा अधिकृत स्टॉप असतानाही बस न थांबल्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात असून तासिका बुडत आहेत. उन्हाळा, पावसाळा व हिवाळ्यातही विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

### विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या

हिवरा फाटा (कॉलेज स्टॉप) येथे सर्व एसटी बसेसना नियमित थांबा द्यावा.शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची पायपीट थांबवावी. निवेदनावर तातडीने निर्णय घेऊन विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करावी. मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा.

याबाबत संबंधित शाळा व महाविद्यालयाच्या वतीने अमरावती, परतवाडा व दर्यापूर आगार व्यवस्थापकांना निवेदने देण्यात आली आहेत. मात्र अद्याप कोणतीही सकारात्मक कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.विद्यार्थ्यांच्या सोयीचा विचार करून आसेगाव पूर्णा येथे थांबणाऱ्या सर्व बसेस येताना व जाताना हिवरा फाटा (कॉलेज स्टॉप) येथे नियमित थांबविण्याची मागणी विद्यार्थी, पालक व शैक्षणिक संस्थांनी केली आहे. अन्यथा येत्या काळात आंदोलन छेडण्याचा इशाराही महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी दिला आहे.

## संक्षिप्त

### एकादशी पर्वावर महाअभिषेक व आरती

**कुऱ्हा-** विदर्भाची पंढरी आई रुख्मीणी मातेचे माहेर अशा प्राचीन



पुरातन श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री. विठ्ठल रुख्मीणी मंदीरामध्ये दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी योगिनी पंधरवाडी एकादशीच्या पर्वावर श्री विठ्ठल रुख्मीणी महाअभिषेक विधीवत पुजा विजयराव माणिकराव डहाके व परिवार यांचे हस्ते करण्यात आली. याप्रसंगी मंदीराचे विश्वस्त हिम्मतराव टाकोने व अशोक पवार, तसेच मंदीरातील सर्व कर्मचारी यांचा शेला नारळ देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर एकादशी निमीत्त वारकरी भजनी भाविक भक्तांना भजनाचा कार्यक्रम होऊन आरती व प्रसाद वाटण्यात आला. या एकादशी अभिषेक व अन्नदान करणारे विजयराव डहाके (कुऱ्हा) यांचा श्री विठ्ठल रुख्मीणी संस्थान तर्फे शाल नारळ व साडी-चोळी देऊन विश्वस्त यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विठ्ठल रुख्मीणी संस्थानचे अध्यक्ष ना.बा. अमाळकर, विश्वस्त हिम्मतराव टाकोणे, अशोक पवार, विश्वस्त, तसेच संस्थानचे व्यवस्थापक प्रशांत गावंडे व सर्व कर्मचारी आणि वारकरी, महिला वारकरी भक्त मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### वाचनालयात हेमंत निखाडे यांचा सत्कार

**तिवसा-** राज्य शासनाच्या कृषी विभागाचा सर्वोच्च वसंतराव नाईक शेतीमित्र पत्रकारिता पुरस्कार नुकताच तिवसा येथील पत्रकार हेमंत किसनराव निखाडे यांना मुंबई येथे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते व कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यासह अनेक मंत्रीमहोदयांच्या उपस्थितीत सपत्नीक प्रदान करण्यात आल्याबद्दल त्यांचा राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आरती राजेश वानखडे, नगरसेवक अनिल थुल, छाया दंडाळे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी रामदासपंत देशमुख, लता देशमुख, राजा देशमुख, अंकुश देशमुख,स्वप्नील कुऱ्हेकर,सुमित अनासाने,राहुल धडांगे,सुनील बहादरपुरे,मधुकर पिंगळे,अक्षय गडलिंग,पत्रकार प्रशिक शापामोहन,अमोल खाकसे,सुनील घोरमाडे व अन्य नागरिक उपस्थित होते.



### प्राची वंजारीची नवोदय विद्यालयात निवड

**खल्लार-** नजिकच्या गौरखेडा (चांदई) येथील मिलिंद विद्यालयातील वर्ग दहावीची विद्यार्थिनी कु.प्राची किशोर वंजारी हिची अमरावती येथील जवाहर नवोदय विद्यालय वर्ग अकरावी प्रवेशासाठी निवड झाली आहे. प्राची किशोर वंजारीने मिलिंद विद्यालयात वर्ग पाचवीपासून ते दहावीपर्यंत शिक्षण घेतले असून शिक्षकांच्या मार्गदर्शनातून तिने वर्ग दहावी मध्ये नवोदय विद्यालयाच्या प्रवेश पात्रता परीक्षेला बसून चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केली.परीक्षेमध्ये घवघवीत यश प्राप्त केल्याबाबत राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर,व अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर,संचालिका डॉ. शुभांगी अभ्यंकर विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. बी.वानखडे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

### शेतातील वादातून चौघांकडून मारहाण

**चिखलदरा-** तालुक्यातील टेंब्रुसोडा येथे शेतातील गाळे विक्रीच्या कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीला लोखंडी टॉमी, बांबू व काठ्यांनी मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी चिखलदरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.राजकुमार नानाजी जांबू (वय ४२, रा. टेंब्रुसोडा) यांच्या वडिलांच्या नावावरील शेतातील गाळे विक्रीबाबत विचारणा केल्यानंतर शिवीगाळ करत हल्ला केला. काळ्या उर्फ पांडुरंग बल्लुजी डेकाडे याने लोखंडी टॉमीने दोन्ही पायांवर मारहाण केली. रामेश्वर पांडुरंग डेकाडे याने बांबूने हात व पाठीवर, देवानंद पांडुरंग डेकाडे याने सागाच्या काठीने डोक्यावर, तर अशोक पांडुरंग डेकाडे याने सागवानाच्या काठीने हात व पायावर मारून जखमी केले. वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## भरधाव वाहनाच्या धडकेत शेतकऱ्याचा मृत्यू

**मोर्शी -** तालुक्यातील अंबाडा-साईवाडा मार्गावर झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. या प्रकरणी भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख नयुम शेख नजीर (वय ५२, रा. अंबाडा, ता. मोर्शी) यांचे मोठे बंधू शेख कदीर शेख नजीर हे एमएच-४९-बीजी-३६६७ क्रमांकाच्या वाहनाने शेताकडे जात असताना लकडे यांच्या शेताजवळ एमएच-२७-बीएक्स-६३३४ क्रमांकाच्या सिलेंडर वाहतूक करणाऱ्या वाहनाने जोरदार धडक दिली. अपघातानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.या अपघातास संबंधित वाहनचालकाचा भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालविणे कारणीभूत असल्याचे मोर्शी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## शेतातील मोटारपंप व केबलची चोरी

**तिवसा-** येथील मौजा निंभोरा देऊळवाडी शेतशिवारात अज्ञात चोरट्यांनी शेतातील मोटारपंप व केबल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तिवसा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३(२) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी आनंद शेषराव (वय ५१, रा. निंभोरा देऊळवाडी, ता. तिवसा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या सर्वे



क्रमांक ५३/२ मधील दोन एकर शेतातील विहिरीवर सिंचनासाठी बसविण्यात आलेला ३ एचपी एपीएस कंपनीचा मोटारपंप (किंमत ६,००० रुपये) आणि ५० फूट केबल (किंमत १,५०० रुपये) असा एकूण ७,५०० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. ही घटना १२ जुलै रोजी उघडकीस आली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर-ट्रॉली जप्त

**ब्राह्मणवाडा थडी -** येथील पोलिसांनी लेंडी नाला, देवीनगर-घाटलाडकी परिसरात कारवाई करत अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर-ट्रॉली जप्त केला. या प्रकरणी तीन जणांविरुद्ध विविध कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय रामकृष्ण वागद्रे (वय ३२), भुरा उर्फ सौरभ रामकृष्ण वागद्रे (वय ३०, दोघेही रा. घाटलाडकी) आणि अमोल विष्णू चामलाटे (वय ३२, रा. बेलमंडळी) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. आरोपी हे विनापरवाना ट्रॅक्टर (क्र. एमएच-२७-डीए-४९९७) व ट्रॉली (क्र. एमएच-२७-डीडी-१५२५) मधून सुमारे एक ब्रास रेतीची अवैध वाहतूक करत असल्याचे पोलिसांना आढळून आले.

कारवाईदरम्यान सुमारे ६ लाख रुपयांचा ट्रॅक्टर, १ लाख रुपयांची ट्रॉली आणि १० हजार रुपयांची रेती असा एकूण ६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी बीएनएस कलम ३०३(२) तसेच पर्यावरण संरक्षण कायदा, जनरल सॅन्ड नियम आणि संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास ब्राह्मणवाडा थडी पोलिस करीत आहेत.

## विद्यापीठातील हिंदी अनुवाद अभ्यासक्रमाकरीता प्रवेश प्रक्रिया सुरु

**अमरावती/का.प्र.**

आजच्या स्पर्धात्मक युगात स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी आधुनिक ज्ञानाची गरज लक्षात घेता, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिंदी विभागाद्वारे 'एम.ए. (अनुवाद हिंदी)' हा विशेष व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांचा बहुआयामी व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगाराच्यादृष्टीने अत्यंत प्रभावी ठरत आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त अमरावती विद्यापीठातच हा विशेष अभ्यासक्रम उपलब्ध असून यामध्ये एकूण ३० जागा आहेत.

केंद्र सरकारच्या विविध कार्यालयांमध्ये 'राजभाषा अधिकारी' आणि 'अनुवादक' यांसारख्या प्रतिष्ठापूर्ण पदांवर नोकरी मिळवण्याची सुवर्णसंधी. विविध क्षेत्रांत वाव: पत्रकारिता, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट, टेलिकॉम, बँकिंग, विमा कंपन्या आणि परदेशात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. अभ्यासक्रमात यूजीसीच्या निर्देशानुसार सेट/नेट परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा समावेश केल्यामुळे विद्यार्थी प्राध्यापक पदासाठी पात्र होऊ शकतात. द्विभाषिक प्रशिक्षण: या अभ्यासक्रमात इंग्रजी आणि मराठी भाषेतून हिंदी भाषांतराचे विशेष प्रशिक्षण दिले जाते, जेणेकरून मराठी भाषिक विद्यार्थीही यात उत्तम करिअर करू शकतात. विभागाचा माजी विद्यार्थी अनिकेत बोरकर 'हिंदुस्तान एरॉनॉटिकल इंजिनिअरिंग विभाग, नाशिक' येथे राजभाषा अधिकारी म्हणून कार्यरत आहे. मराठी भाषिक असूनही माजी विद्यार्थिनी सरिता नंदेश्वर ही 'भारतीय संसद, लोकसभा, नवी दिल्ली' येथे कार्यरत आहे. माजी विद्यार्थी डॉ. श्यामप्रकाश पांडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून सेवा देत आहेत. जवळपास ३० विद्यार्थ्यांनी आचार्य (पीएच.डी.) पदवी प्राप्त केली असून, ७० हून अधिक विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारच्या विविध कार्यालयांत नोकऱ्या मिळवल्या आहेत.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, एन.टी. शिष्यवृत्तीव्यतिरिक्त, केंद्र सरकारची 'हिंदीतर भाषिक शिष्यवृत्ती' देखील विद्यार्थ्यांना दिली जाते. तसेच विभागातर्फे विद्यार्थ्यांना रेमिडियल वर्ग, सेट/नेट परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांसाठी निःशुल्क मार्गदर्शन दिले जाते.मर्यादित जागा असल्यामुळे इच्छुक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लवकरात लवकर आपला प्रवेश निश्चित करावा. अधिक माहिती व प्रवेशासाठी प्रभारी विभागप्रमुख डॉ. माधव पुटवाड यांच्याशी (मो. क्र. ९४२३६५०६०२) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची भेट

## राजर्षी शाहू महाराज वाचनालयाचा स्तुत्य उपक्रम

**तिवसा/वार्ताहर**

सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या तिवसा शहरातील विनाअनुदानित श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय सामाजिक संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गरजू, अभ्यासू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची भेट देण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.हा शालेय साहित्य वाटप कार्यक्रम आरती रा. वानखडे, नगरसेवक अनिल थुल व छाया दंडाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी



व त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा व गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.गुणवंतांचे कौतुक आणि मान्यवरांचा सत्कार कार्यक्रमाचे औचित्य साधून नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या परीक्षेत ८२ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केल्याबद्दल मानसी दीपक सहारे हिचा रामदासपंत देशमुख व लता रा. देशमुख यांच्याकडून ५ हजार रुपयांचे रोख बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

वाचनालयाला नेहमीच सहकार्य करणारे रामदासपंत देशमुख यांचाही सपत्नीक शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. हा सेवाभावी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे माजी विद्यार्थी व सध्या शासकीय सेवेत कार्यरत असलेले अक्षय गडलिंग, रोशन राऊत, पंकज इंगळे तसेच वाचनालयाचे सभासद अंकुश देशमुख, प्रफुल बनसोड, बाळा देशमुख, मंगल ठाकूर, विक्रांत इंगळे, दीपक धानोरकर, स्वप्नील कुऱ्हेकर,पंकज कळमकर, सुनील बहादरपुरे, अंकुश गायकवाड, राहुल धडांगे व राजाभाऊ देशमुख यांनी मोलाचे आर्थिक सहकार्य केले.या सोहळ्याला सुधाकरराव सहारे,मयूर वानखडे, संजय वाट, मधुकरराव पिंगळे, सुमित अनासाने, गोपाल फरकाडे, पत्रकार हेमंत निखाडे, प्रशिक मकेश्वर, सुनील घोरमाडे,अमोल खाकसे, सतीश नंदनवार, कुणाल गौरखेडे, हृषीकेश गंधे, सचिन काळे, प्रिया डहाके, मोनिका येवले यांच्यासह गावातील अनेक नागरिक आणि वाचनालयाचे वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अक्षय गडलिंग यांनी केले तर आभार अलोणे यांनी मानले.



## राष्ट्रसंतांना 'भारतरत्न' मिळण्याकरिता गुरुदेवभक्तांची वज्रमूठ!

**तिवसा-** जगाच्या कल्याणा थोर संतांच्या विभूती,देह कष्टविती परोपकारे'या विचारा प्रमाणेच आपलं संपूर्ण आयुष्य राष्ट्राला वाहून घेतलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना मरणोत्तर 'भारतरत्न' मिळावा या मागणी करिता गुरुदेवभक्तांनी आता एका बैठकीत वज्रमूठ बांधली आहे. बैठकीत 'भारतरत्न समिती'ची लवकरच स्थापना करून पुढील दिशा ठरवली जाणार असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.सभेच्या अध्यक्षस्थानी संघटक प्रल्हादराव पारिसे गुरुजी, मुख्य सल्लागार, व्याख्याते रवी मानव,नगरसेवक अमर वानखडे, सामाजिक कार्यकर्ते मुकुंद पूनसे, महाराष्ट्र शासन पद्मश्री पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ.संजय आदमने वर्धा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मस्थळ स्मृती समिती सचिव सुनील देशमुख, कथाकार शिवदास श्रृंगारे महाराज, संगीताचार्य गोपाल सालोडकर, पत्रकार जानराव मनोहर, अरुणराव तडस, नामदेवराव ठाकरे,सुरेशराव पवार, शंकरराव मोहोळ,उमेश परिसे, अमोल बोके,रमेश मुकदम, प्रमोद भोगे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी गुरुदेव भक्त उपस्थित होते. राष्ट्रसंतांना भारतरत्न मिळेपर्यंत लढा थांबणार नाही,असा निर्धार यावेळी उपस्थित गुरुदेव भक्तांच्या वतीने करण्यात आला.

# अमरावती विभागातील सर्वाधिक ६५० सामूहिक कॉपी व इतर गैरप्रकारांचा मुद्दा गाजला विधानसभेत

**अमरावती/वार्ताहर**

राज्यामध्ये बारावीच्या परीक्षेदरम्यान सामूहिक कॉपी व इतर गैरप्रकार प्रकाराची राज्यामध्ये सुमारे १ हजार ४६९ सामूहिक कॉपीची प्रकरणे निदर्शनास आली असून त्यापैकी सर्वाधिक ६५० प्रकरणे अमरावती विभागात व ५०१ प्रकरणे छत्रपती संभाजीनगर विभागात आढळली आहेत. भविष्यात परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता अबाधित राखण्यासाठी व सामूहिक कॉपी व इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली? असा प्रश्न आ.सुलभा खोडके यांनी राज्यविधिमंडळा समक्ष उपस्थित केला.

आ.सुलभा खोडके यांनी राज्यविधिमंडळाला अवगत केले कि,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त व निकोप वातावरणात होण्यासाठी प्रभावी कार्यवाही व उपाययोजना करणे आवश्यक आहे. मात्र दरवर्षी या परीक्षांदरम्यान गैरप्रकार घडत असल्याचे समोर येत



आहे.मंडळामार्फत 'कॉपीमुक्त अभियान' राबविण्यात येत असतांना तसेच बहुतांश परीक्षा केंद्रामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले असतांनाही मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार घडत आहेत. सर्वाधिक ६५० प्रकरणे अमरावती विभागात व ५०१ प्रकरणे छत्रपती संभाजीनगर विभागात आढळली आहेत. भविष्यात परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता अबाधित ठेवणे, सामूहिक कॉपी व इतर गैरप्रकारांना आळा घालणे, तांत्रिक देखरेख अधिक प्रभावी करणे आवश्यक आहे. यामुळे राज्यामध्ये सुमारे १ हजार ४६९ सामूहिक कॉपीची गैरप्रकरणांमध्ये संबंधित परीक्षा केंद्रांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करणार का ? असा प्रश्न आ.सुलभा खोडके यांनी पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने राज्यविधिमंडळासमक्ष उपस्थित केला.

शालेय शिक्षण मंत्री ना. दादाजी भुसे यांनी सांगितले कि,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत सुमारे १०० कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून अमरावती विभागातील ८, नागपूर विभागातील ३, छत्रपती संभाजीनगर विभागातील ३ तसेच लातूर विभागातील १ प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश मंत्री महोदयांनी दिले आहे.

तसेच राज्यातील दहावी-बारावीच्या परिक्षा कॉपीमुक्त व निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी व बोर्ड परीक्षांचे आयोजन गुणवत्तापूर्ण व सुरक्षित वातावरणात होण्यासाठी जिल्हास्तरावरील नियंत्रण व समन्वय समितीची पुर्नरचना करून दक्षता समितीचे जबाबदारी व कार्य निश्चित करण्याचे आदेश मंत्रिमहोदयांनी दिले आहेत.

# ४८ कोटींच्या दंडाचे ‘अनधिकृत लाभार्थी’ किती ?

**-शासनाच्या तिजोरीत एक रुपयाही नाही; वसुलीऐवजी दिरंगाईवर प्रश्नचिन्ह**

## -एसडीओंकडून अपील स्वीकारल्याची चर्चा, सातबाऱ्यावर बोजा असूनही निलामीचा मुहूर्त कधी?

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील आदिवासी शेतकरी विलास कालू चिमोटे यांच्या गट क्रमांक २७ व ३८ मधील कथित अतिरिक्त गौण खनिज उत्खनन प्रकरणात तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावूनही शासनाच्या तिजोरीत अद्याप एक रुपयाही जमा झालेला नसल्याने संपूर्ण प्रकरणावर संशयाचे गडद सावट निर्माण झाले आहे. महसूल प्रशासनाकडून दंड वसुलीबाबत सातत्याने होत असलेली दिरंगाई, आदेश असूनही कारवाईतील संथ गती, अपील प्रक्रियेतील घडामोडी आणि मालमत्तेवरील बोजा चढवूनही पुढील टप्पा रखडल्याने आता जिल्ह्यात एकच प्रश्न विचारला जात आहे तो म्हणजे या ४८ कोटींच्या दंडाचे अनधिकृत लाभार्थी नेमके किती?. या प्रकरणात जमीनमालक विलास कालू चिमोटे आणि भाडेपट्टाधारक संतोष चांडक यांच्यावर दंडाची जबाबदारी निश्चित करण्यात आली. सुरुवातीला खनिकर्म संचालनालयाच्या मोजणीनुसार ६४ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. त्याविरोधात न्यायालयात आव्हान दिल्यानंतर पुनर्मोजणी झाली आणि दंडाची रक्कम ४८ कोटींवर आली. मात्र, तब्बल १६ कोटी रुपयांची घट कशाच्या आधारे झाली, याबाबत महसूल विभागाने स्वतंत्र अपील किंवा पुनर्विचाराची भूमिका घेतल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे सुरुवातीच्या आणि पुनर्मोजणीनंतरच्या पंचनाम्यांतील फरकाबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. यानंतर हेच ४८ कोटींचे दंड आदेशही न्यायालयात आव्हान देण्यात आले. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी उच्च न्यायालयाने संबंधित प्राधिकरणाकडे चार आठवड्यांत अपील




करण्याचे निर्देश दिले.

विशेष म्हणजे, या आदेशात दंड वसुलीवर कोणताही स्थगिती आदेश नसल्याचे सांगितले जाते. त्यामुळे महसूल प्रशासनाला वसुलीची प्रक्रिया सुरू ठेवण्यास कोणताही अडथळा नसल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

मात्र प्रत्यक्षात घडलेले चित्र वेगळेच असल्याची चर्चा आहे. न्यायालयाने दिलेल्या चार आठवड्यांचा कालावधी उलटून अनेक महिने लोटल्यानंतरही दंड वसुलीची ठोस कारवाई दिसून आली नाही. दुसरीकडे, अकोटचे उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदारांना महसूल वसुलीसाठी आरआरसी प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिल्याचे सांगितले जाते. त्यानंतर तहसीलदारांनी संबंधितांना मागणी नोटीस बजावली आणि दंड वसुलीची प्रक्रिया वेग घेईल, अशी अपेक्षा निर्माण झाली. मात्र पुढे पुन्हा कारवाईचा वेग मंदावल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले.

याच काळात सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली ती अपील प्रक्रियेची. शासनाच्या नियमांनुसार गौण खनिज दंडाविरोधात अपील करताना दंडाच्या रकमेतील ठरावीक हिस्सा जमा करण्याची तरतूद असल्याचा दावा केला जात आहे. अशा परिस्थितीत संबंधित अपील कोणत्या अटींवर स्वीकारण्यात आले, आवश्यक रक्कम जमा झाली होती का, याबाबत महसूल प्रशासनाने अधिकृत भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून होत आहे. या प्रक्रियेमुळे दंड वसुली आणखी लांबणीवर गेल्याचा आरोपही केला जात आहे.

दरम्यान, दंडाची नोंद सुरुवातीला प्रामुख्याने आदिवासी जमीनमालकाच्या गट क्रमांक २७ व ३८ वरच करण्यात आल्याची चर्चा आहे. भाडेपट्टाधारकाच्या मालमत्तांबाबत मात्र सुरुवातीला ठोस हालचाल दिसून आली नाही, उलट मालमत्ता सापडत नसल्याचा बनाव रचण्यात आल्याचा आरोप स्थानिक स्तरावर करण्यात आला. नंतर ’जनमाध्यम’ने विविध वृत्तांमध्ये संबंधित मालमत्तांचे तपशील समोर आणल्यानंतर त्या मालमत्तांवरील सातबाऱ्यावर नाईलाजाने बोजा चढविण्यात आल्याचे सांगितले जाते. त्यामुळे सुरुवातीला ही माहिती प्रशासनाला उपलब्ध नव्हती का ? की कारवाईस जाणूनबुजून विलंब करण्यात आला ? यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

आता परिस्थिती अशी आहे की, संबंधित मालमत्तांवर बोजा चढविण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे सांगितले जात असले तरी समपहरणाची नोटीस बजावल्यानंतरही पुढील महत्त्वाचा टप्पा असलेली मालमत्ता जप्ती व निलामी अद्याप झालेली नाही. परिणामी, कोट्यवधी रुपयांच्या दंडाची प्रत्यक्ष वसुली नेमकी कधी होणार, त्यासाठी तहसीलदार कोणत्या शुभमुहूर्ताची वाट पाहत आहेत ? हा यक्ष प्रश्न यानिमित्ताने अकोटकरांना पडला आहे.

या संपूर्ण प्रकरणात महसूल विभागाच्या प्रत्येक टप्प्यावर झालेल्या विलंबामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनीही या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याची चर्चा असताना तो अहवाल अद्याप सार्वजनिक झाला नसल्यानेही विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. एसआयआरच्या कामांचा व्याप असल्याचा बहाणा करीत सदर अहवाल गुलदस्त्यातच ठेवण्यात आल्याची चर्चा यानिमित्ताने आणखीन रंगली आहे.

एकूणच, ४८ कोटी रुपयांचा दंड, न्यायालयीन प्रक्रिया, वसुलीतील विलंब, अपील स्वीकृती, सातबाऱ्यावरील बोजा आणि रखडलेली निलामी या सर्व घटनांची साखळी पाहता, या प्रकरणात नेमके काय घडले आणि शासनाच्या महसुलाची जबाबदारी निश्चित करण्यासाठी पुढे कोणती कारवाई होणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### आदिवासी जमिनीच्या प्रकरणातही प्रश्न कायम

मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ या आदिवासी जमिनीबाबत यापूर्वी तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांनी शासनाच्या परवानगीशिवाय नोंदणीकृत भाडेपट्टा झाल्याचा उल्लेख अधिकृत नोंदीत केल्याचे सांगितले जाते. त्यानंतरही या व्यवहाराची स्वतंत्र चौकशी, जमिनीची मोजणी किंवा संबंधित जबाबदाऱ्यांची पडताळणी याबाबत अपेक्षित गतीने अकोट एसडीओ यांच्याकडून कारवाई झाली नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे आदिवासी जमिनीच्या संरक्षणाबाबत प्रशासनाची भूमिका नेमकी काय, हा प्रश्नही पुन्हा ऐरणीवर आला आहे. तर आता त्याच्याच बाजूला असलेल्या आणखीन एक आदिवासी बांधव हा संबंधिताच्या जाळ्यात अडकला असून त्याच्याही जमिनीवर क्रशर टाकण्यात आल्याने याप्रकरणी आदिवासी बांधवांच्या जमिनीच्या संरक्षणाच्या बाबतीत अकोला महसूलचे अधिकारी किती गंभीर आहे हे दिसून येते.

# तिवसा येथे ५५ लाखांचा प्रतिबंधित गुटखा व ट्रक जप्त

**-दोन आरोपी अटकेत, १३० पोत्यांचा साठा हस्तगत**

**-नागपूरहून अमरावतीमार्गे होत होती अवैध वाहतूक**



**तिवसा/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) तिवसा तालुक्यात धडक कारवाई करत प्रतिबंधित गुटख्याची मोठी खेप जप्त केली. नागपूरहून ट्रकमधून अवैधरित्या वाहतूक करण्यात येणारा तब्बल ३९ लाख रुपयांचा गुटखा आणि १६ लाख रुपये किमतीचा ट्रक असा एकूण ५५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून गुटखा पुरवठा साखळीबाबतही चौकशी सुरू आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. त्यावेळी गुप्त बातमीदाराकडून एमएच-०१-सीव्ही-६२८२ क्रमांकाच्या अशोक लेलँड ट्रकमधून नागपूरहून प्रतिबंधित गुटखा आणला जात असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे नागपूर-अमरावती महामार्गावरील सुमित हॉटेलजवळ सापळा रचून ☞(पान २ वर)

# गोपालनगरातील इटालियस कॅफेवर भरोसा सेलचा छाप

**-पाच प्रेमी युगुलांसह १० जण ताब्यात**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गोपालनगर परिसरातील इटालियस कॅफेवर भरोसा (महिला) सेलने सोमवारी सायंकाळी धाड टाकून पाच प्रेमी युगुलांसह एकूण १० युवक-युवतींना ताब्यात घेतले. बंदिस्त केबिनमध्ये आक्षेपार्ह कृत्ये सुरू असल्याच्या तक्रारींनंतर ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणात कॅफेचे संचालक अमोल राहुल सूर्यवंशी (रा. कॉंग्रेसनगर) यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. पोलिसांकडे काही दिवसांपासून ☞(पान २ वर)





# ‘बोगस बियाणे कंपन्यांनवर शासनाने त्वरित कठोर कारवाई करावी अन्यथा कार्यालय जाळून टाकणार !’ - बच्चू कडू

## -बूस्टर प्लांट जेनेटिक्स प्रा. लि.चा परवाना कायमस्वरूपी रद्द करा



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील शेतकरी नैसर्गिक संकटांशी झुंज देत असताना बोगस आणि निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपन्या त्यांच्या आयुष्याशी खेळत आहेत. निकृष्ट बियाण्यामुळे केवळ पीकच नष्ट होत नाही, तर शेतकऱ्याचे संपूर्ण वर्ष उद्ध्वस्त होते. पेरणी, मशागत, खते, औषधे, मजुरी, सिंचन, उत्पादन आणि कर्जाचा बोजा यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडतो. त्यामुळे बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्यांना कोणतीही दया न दाखवता कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी आमदार बच्चू कडू यांनी केली आहे.

बच्चू कडू यांनी सातत्याने उचलून धरलेल्या या प्रश्नाची दखल घेत कृषी विभागाने महत्त्वाची कारवाई सुरू केली असून, बोगस बियाणे पुरवठा करणाऱ्या तीन कंपन्यांविरुद्ध राज्यातील तीन वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये फौजदारी स्वरूपाचे एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई शेतकऱ्यांच्या न्यायाच्या लढ्याचा पहिला टप्पा असला, तरी एवढ्यावर थांबून चालणार नाही. दोषी कंपन्यांचे परवाने कायमस्वरूपी☞(पान २ वर)

> ’ज्या कंपन्या शेतकऱ्यांच्या घामाची लूट करतात, त्यांना व्यवसाय करण्याचा अधिकारच नाही. शेतकऱ्यांचा संसार उद्ध्वस्त करणाऱ्यांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे. शासनाने त्वरित कठोर निर्णय घेतला नाही, बोगस बियाणे पुरवणाऱ्या कंपन्यांचे कार्यालय जाळून टाकणार. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी हा लढा कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाही.
>
> -आ.बच्चू कडू

# अमरावतीच्या मुलीचा सेलूमध्ये संशयास्पद मृत्यू

**माहेरच्यांनी लावला गळा दाबून हत्येचा आरोप, -पती , सासू - सासरेसह पाच अटकेत**

अमरावती/प्रतिनिधीः-

वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील हेलोडी (बोरगाव) येथे सीमा सुरक्षा दलात कार्यरत असलेल्या एका जवानाच्या २२ वर्षीय नवविवाहित पत्नीचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. मनिषा विनोद मोहिते असे मृत महिलेचे नाव असून तिच्या माहेरच्यांनी तिची आत्महत्या नसून सासरच्यांनी गळा दाबून हत्या केल्याचा गंभीर आरोप केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेने मृत महिलेच्या नातेवाईकांनी जाहीर संताप व्यक्त केल्याने आरोपीस पोलीस संरक्षण देण्यात आले. माहितीनुसार मनिषाचा विवाह २७ मार्च २०२४ रोजी बीएसएफ जवान विनोद मोहिते यांच्याशी रिती रिवाजानुसार झाला होता. मनिषाचे माहेर अमरावती जिल्ह्यातील आहे. नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, लग्नानंतर अवघ्या दोन महिन्यांतच मनिषाचा हुंड्यासाठी छळ सुरू झाला. सासरचे लोक तिला मारहाण करत, जीवे मारण्याची धमकी देत आणि सातत्याने गाडी व रोख रकमेची मागणी करत असत. मुलीच्या सुखासाठी पालकांनी वेळोवेळी सुमारे ५ लाख रुपये दिले, तरीही तिचा छळ थांबला नाही.



या प्रकरणी पोलिसांनी पती विनोद मोहिते, सासू, सासरे, दीर आणि नणंद यांच्या विरुद्ध हुंडाबळी, शारीरिक-मानसिक छळ आणि हत्येचा गुन्हा दाखल केला असून प्राथमिक तपासाच्या आधारे पाच जणांना ताब्यात घेतले आहे. रात्री त्यांना अटक करण्यात आली आहे. ५ आरोपी अटकेत आहे. महिलांना आज सकाळी अटक करण्यात आली असून आज दुपारी त्यांना सेलू न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

**महिन्याभरापूर्वी गेली होती सासरी-**

माहेरच्यांनी सासरच्यांवर अत्यंत गंभीर आरोप केला आहे. वर्ष २०२५ मध्ये मनिषा तीन महिन्यांची गरोदर असताना, तिच्या पतीने गर्भातील मूल आपले मानण्यास नकार दिला होता. इतकेच नव्हे तर मारहाणी दरम्यान तिच्या पोटावर☞(पान २ वर)

# साईनगरातील ‘कॅफे बर्गर ब्रँड’वर राजापेठ पोलिसांची धाड

**-चार प्रेमी युगुलांवर कारवाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील साईनगर, सतीधाम परिसरातील कॅफे बर्गर ब्रँडवर राजापेठ पोलिसांनी सोमवारी (१३ जुलै) धाड टाकून आक्षेपार्ह अवस्थेत आढळलेल्या चार प्रेमी युगुलांवर कारवाई केली. या प्रकरणी संबंधित युवक-युवतींविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून, कॅफेचालिका ऐश्वर्या अमन मिश्रा (रा. शिवाजीनगर) हिच्याविरुद्धही कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, साईनगर येथील कॅफे बर्गर ब्रँडमध्ये काही युवक-युवती अश्लील चाळे करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे यांनी डीबी पथक आणि महिला पथकासह संबंधित कॅफेवर अचानक धाड टाकली. कारवाईदरम्यान कॅफेमध्ये चार प्रेमी युगुले आक्षेपार्ह अवस्थेत आढळून आली. त्यानंतर संबंधित आठ युवक-युवतींवर महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तसेच अशा प्रकारच्या कृत्यांना जागा उपलब्ध करून दिल्याप्रकरणी कॅफेचालिका ऐश्वर्या अमन मिश्रा हिच्याविरुद्धही पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-२) श्याम घुगे आणि सहाय्यक ☞(पान २ वर)

# ४५ वर्षीय व्यक्तीची गळफास घेऊन आत्महत्या

**अमरावती/प्रतिनिधीः-:** शहरातील खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अकोली रोड स्थीत वल्लभ नगर परिसरात ४५ वर्षीय व्यक्तीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मृताचे नाव अतुल ओमकार राऊत (वय ४५, रा. वल्लभ नगर, अकोली रोड, अमरावती) असे आहे. रविवारी रात्री त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार, अतुल राऊत यांनी राहत्या घरी गळफास☞(पान २ वर)



# निवडणुकीच्या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या बीएलओवर गुन्हा दाखल

**धारणी तालुक्यातील चोपण येथील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-**

जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील चोपण येथील जिल्हा परिषद शाळेचे सहाय्यक शिक्षक सुनील नारायण काळे यांच्यावर निवडणूक कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी अखेर एफआयआर दाखल करण्यात आला. जिल्ह्यातील एखाद्या बीएलओवर अशा प्रकारे थेट गुन्हा दाखल होण्याची ही पहिलीच घटना असल्याने संपूर्ण शैक्षणिक व शासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.सहाय्यक शिक्षक सुनील नारायण काळे यांच्या कडे मतदार नोंदणी आणि निवडणूक विभागाशी संबंधित अत्यंत महत्त्वाची अशी बीएलओची जबाबदारी सोपवण्यात आली होती. निवडणूक विभागा कडून आवश्यक ती मतदार यादी सुधारणा व गणना पत्रिका ताब्यात घेतल्यानंतर, काळे यांनी आपल्या वरिष्ठांना किंवा संबंधित अधिकाऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता चक्क कर्तव्या वरून गायब होण्याचा मार्ग निवडला. चोपण गावात एकूण ३४१ मतदार आहेत, मात्र शिक्षकाच्या या बेजबाबदार आणि मनमानी कारभारामुळे गावात एकही मतदार अर्ज भरला गेला नाही.

जलसंपदा अधिकारी जयंत शिरभाते यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवला आहे. सुनील काळे (३४ वर्ष) हे सहाय्यक शिक्षक असून त्यांना निवडणूक आयोगाचे मतदार संघनिहाय मदतीसाठी बीएलओ पद दिले ☞(पान २ वर)

# निकृष्ट बियाण्यांनी शेतकऱ्यांचे स्वप्न उद्ध्वस्त

**न्यायासाठी शेतकऱ्यांची एसडीओ कार्यालयावर धडक**

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांमुळे मोठे संकट ओढवले आहे. कर्ज काढून, मोठ्या आशेने शेतात पेरणी केलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या शेतात तब्बल १० ते १२ दिवस उलटूनही सोयाबीनची उगवण न झाल्याने त्यांच्या स्वप्नांवर अक्षरशः पाणी फिरले आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या राजुरा, निंभा, धानोरा (मोगल), दिघी (कोल्हे), एकपाळा, सोनोरा (भिलटेक), टोंगलाबाद, पळसखेड, वाई व इतर गावातील ☞(पान २ वर)



# सातनूर ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करा

**सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन**

**अमरावती/प्रतिनिधीः-** वरूड तालुक्यातील सातनूर ग्रामपंचायती मध्ये कथित भ्रष्टाचार आणि सरकारी निधीचा दुरुपयोग झाल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते पवन किसनराव चौधरी यांच्या सह ग्रामस्थांनी आज सोमवार १३ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन या प्रकरणाची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, भ्रष्टाचाराची तक्रार करूनही चौकशी अर्धवट सोडून देण्यात आली.



उलट तक्रारदारांनाच विविध प्रकरणांमध्ये अडकवण्याचा प्रयत्न झाला. गेल्या ४-५ वर्षांपासून सातनूर ग्रामपंचायतीच्या विकास कामांमध्ये अनियमितता, सरकारी निधीचा दुरुपयोग आणि नियमबाह्य कामांच्या तक्रारी येत आहेत. तक्रारदार पवन चौधरी यांनी ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांसोबत☞(पान २ वर)

# डॉ.आंबेडकर स्मारकाला हायकोर्टाची हिरवी झेंडी

**१० वर्षांचा निर्णायक लढा, गट्टाणी यांची याचिका फेटाळली**

**अमरावती/प्रतिनिधीः-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इर्विन चौकातील स्मारकाच्या जागेसाठी गेली १० वर्षे सुरू असलेला न्यायिक वाद अखेर संपला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्मारकाच्या बाजूने ऐतिहासिक निकाल दिला. या निर्णयामुळे अमरावतीतील आंबेडकरी अनुयायांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे गेल्या अनेक वर्षांपासून



राजकीय आणि सामाजिक चर्चेचा विषय होते. जमीन अधिग्रहणावरून निर्माण झालेल्या वादामुळे स्मारकाचे काम रखडले होते. आता न्यायालयाचा☞(पान २ वर)